# मिरा भाईंदर महानगरपालिका

स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय,
छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (प.) ता.जि. ठाणे 401 101
नगरसचिव विभाग
ईमेल - nagarsachiv.mbmc@gmail.com


जा.क्र.मनपा/सचिव/मा.अ./ ९८ /2020 दिनांक :- ३० / ९ /2020

प्रति,
**श्री. विनोद दामोदर शेवंते**
**बी-401, रितुग्लोरीअस बिल्डींग,**
**ऑरेंज हॉस्पीटलजवळ,**
**मिरारोड (पूर्व), 401 107**

**विषय :-** **केंद्र शासनाचा माहितीचा अधिकारी 2005.**
**बडतर्फ जनसंपर्क अधिकारी श्री. सचिन चवाथे यांना पुन्हा कामावर घेण्याबाबत केलेल्या पत्रव्यवहाराबाबत.**

**संदर्भ :-** **1) आपणांकडील दि. 19/03/2020 रोजीचा महिती अधिकारातील अर्ज.**
**2) आपणांकडील दि. 10/06/2020 रोजीचा प्रथम अपिल अर्ज.**

**महोदय,**

उपरोक्त विषयान्वये आपण संदर्भित पत्र क्र. 01 अन्वये बडतर्फ जनसंपर्क अधिकारी सचिन चवाथे यांनी पुन्हा कामावर घेणेबाबत केलेला पत्रव्यवहार, त्यावर प्रशासनाने दिलेल्या उत्तराची/कार्यवाहीची सत्यप्रत तसेच मा. महासभा व मा. स्थायी समितीने केलेले सर्व ठराव, गोषवारा, इतिवृत्तांताच्या सत्यप्रतींची मागणी केलेली होती. उक्त अर्जावर परिपूर्ण माहिती उपलब्ध न झाल्याचे कारण नमूद करुन आपण संदर्भित क्र. 02 नुसार अपिलीय अधिकारी तथा नगरसचिव यांचकडे प्रथ अपिल अर्ज दाखल केलेला होता. आपणांकडील अपिल अर्जावर दि. 30/07/2020 रोजी सुनावणी आयोजित केली असता, अपिलीय अधिकारी तथा नगरसचिव यांनी दि. 16/03/2020 रोजीच्या मा. स्थायी समिती सभेचे इतिवृत्तांत पुढील सभेत कायम झालेवर जनमाहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांना विनामुल्य उपलब्ध करुन द्यावे असा निर्णय पारित केलेला आहे.

मा. स्थायी समिती सभा दि. 16/03/2020 रोजीचे इतिवृत्तांत दि. 29/09/2020 रोजीच्या मा. स्थायी समिती सभेमध्ये कायम करण्यात आलेले आहे. अपिलीय अधिकारी तथा नगरसचिव यांनी दि. 30/07/2020 रोजी सुनावणी दरम्यान पारित केलेल्या निर्णयानुसार आपणांस मा. स्थायी समिती सभा दि. 16/03/2020 रोजी सभेस उपस्थित सदस्यांची इतिवृत्तांतामध्ये नोंद असलेल्या पान क्र. 01 ची साक्षांकित प्रत व उक्त सभेतील प्रकरण क्र. 128, बडतर्फ करण्यात आलेले तत्कालीन जनसंपर्क अधिकारी श्री. सचिन चवाथे यांना मा. उच्च न्यायालयात दाखल केलेल्या न्यायप्रविष्ठ प्रकरणात माहिती मिळणेबाबत या प्रस्तावावर झालेल्या चर्चेच्या इतिवृत्तांताची (पान क्र. 13 ते 16 पर्यंत) साक्षांकित प्रत या पत्रासोबत विनामुल्य उपलब्ध करुन देत आहोत. (एकुण पाने 05)

कळावे.

30/9/20

**(कैलास दामोदर म्हात्रे)**
**जनमाहिती अधिकारी तथा लिपीक**
**नगरसचिव विभाग**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

6/10/2020

pc 2\\pranali\D\Pranali\Mahiti Adhikar\Letter - Vinod Shevante.docx

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा. स्थायी समिती सभा दि. १६/०३/२०२०

मिरा भाईंदर महानगरपालिकेची मा. स्थायी समिती सभा सोमवार दि. १६/०३/२०२० रोजी सभा सुचना क्र. १२ दि. ११/०३/२०२० रोजीच्या विषयपत्रिकेवरील विषयांवर विचार विनिमय करण्यासाठी मिरा भाईंदर महानगरपालिका, स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, दुसरा मजला, लाल बहाददुर शास्त्री सभागृहात सकाळी ११.०० वा. सभा आयोजित करण्यांत आली होती.

सदर सभेच्या अध्यक्षस्थानी मा. पिठासीन अधिकारी श्री. अशोक तिवारी हे उपस्थित होते. सदर सभेस खालील सदस्य उपस्थित होते.

उपस्थित सदस्य -

| | | |
|---|---|---|
| १. | श्री. अशोक सुर्यदेव तिवारी | सभापती |
| २. | श्री. पाटील धृवकिशोर मन्साराम | सदस्य |
| ३. | श्री. गेहलोत हसमुख मोहनलाल | सदस्य |
| ४. | श्री. श्रीप्रकाश जिलेदार सिंह | सदस्य |
| ५. | श्री. राकेश रतिशचंद्र शाह | सदस्य |
| ६. | श्रीम. निला बर्नाड सोन्स | सदस्या |
| ७. | श्रीम. अनिता जयवंत पाटील | सदस्या |
| ८. | श्रीम. स्नेहा शैलेश पांडे | सदस्या |
| ९. | श्री. संजय अनंत थेराडे | सदस्य |
| १०. | श्रीम. सुरेखा प्रकाश सोनार | सदस्या |
| ११. | श्रीम. वैशाली गजेंद्र रकवी | सदस्या |
| १२. | श्री. दिनेश तेजराज जैन | सदस्य |
| १३. | श्री. एलायस दुमिंग बांड्या | सदस्य |
| १४. | श्री. कमलेश यशवंत भोईर | सदस्य |
| १५. | श्री. अनिल दिवाकर सावंत | सदस्य |
| १६. | श्रीम. गिता हरीश परदेशी | सदस्या |

गैरहजर सदस्य - निरंक

**मा. आयुक्त :-**

**सर्वप्रथम ह्या स्थायी समितीचे नवनिर्वाचित सभापती यांचे मी स्वागत करतो. तसेच सर्व स्थायी समितीचे नवनियुक्त, नवनिर्वाचित सदस्यांचे पण ह्या सभेमध्ये स्वागत करतो.**

**मा. सभापती :-**

मा. प्रधानमंत्री मा. श्री. नरेंद्र मोदीजी, भारतीय जनता पार्टीचे अध्यक्ष मा. श्री. जे.के.नटराजजी भारताचे गृहमंत्री श्री. अमित शाहजी, महाराष्ट्र राज्याचे विरोधी पक्षनेते मा.श्री. देवेंद्र फडणवीसजी, प्रदेश अध्यक्ष मा. चंद्रकांत पाटीलजी, रविंद्र चव्हाणजी व माजी आमदार मा. श्री. नरेंद्र मेहताजी मिरा भाईंदर जिल्हाध्यक्ष श्री. हेमंत म्हात्रेजी यांच्या आशिर्वादाने व मा. महापौर श्रीम. ज्योत्स्ना हसनाळेजी व मा. उपमहापौर श्री. हसमुख गेहलोतजी, सन्मा. सभागृह नेते, विरोधी पक्ष नेते, सभागृहातील उपस्थित नगरसेवक, नगरसेविका तसेच महापालिका आयुक्त, अति. आयुक्त, उपायुक्त, कर्मचारी/अधिकारी वर्ग, सभागृहाचे प्रेक्षक गॅलरीतील उपस्थित पत्रकार बंधू व नागरीक बंधू आणि भगिनीनो. महाराष्ट्र



माहिती अधिकार २००५ अंतर्गत
देण्यात आलेली माहिती सत्यप्रत
30/e/20
जनमाहिती अधिकारी
नगरसचिव विभाग
मिरा भाईंदर महानगरपालिका

प्रकरण क्र. १२७ :-

मिरारोड (पूर्व) स्मशानभुमीचे नियोजन व संचलन व्यवस्था करणे.

ठराव क्र. १०१ :-

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या मंजुर विकास योजनेत आरक्षण क्र.190 ख्रिश्चन ब्युरियल ग्राउंडसाठी आरक्षित आहे. सदर आरक्षण हे विकसित असुन सदर आरक्षण दि.07/07/2017 रोजी करारनामा करुन एक वर्ष मुदतीकरीता मे. मिरा भाईंदर ख्रिश्चन वेल्फेअर असोसिएशन यांस ख्रिश्चन ब्युरियल ग्राउंड चे संचलन व व्यवस्था करण्यासाठी देण्यात आले होते. सदर कामाची मुदत संपुष्टात आल्याने मुदतवाढ मिळण्यासाठी मे. मिरा भाईंदर ख्रिश्चन वेल्फेअर असोसिएशन संस्था यांचे कडील पत्र प्राप्त झाले आहे.

वरील आरक्षणातील सुविधांचा वापर मोठ्या स्वरुपात होत असल्याने दैनंदिन संचलन व नियोजनासाठी प्रस्तावित संस्थेस करारनामा करुन एक वर्ष मुदतीसाठी मान्यता देण्यात येत आहे.

सुचक :- श्री. राकेश शाह अनुमोदक :- श्री. दिनेश जैन

ठराव सर्वानुमते मंजूर

सही/-
सभापती
स्थायी समिती
मिरा भाईंदर महानगरपालिका

**नगरसचिव :-**

**प्रकरण क्र. 128,** बडतर्फ करण्यात आलेले तत्कालीन जनसंपर्क अधिकारी श्री. सचिन चवाथे यांना मा. उच्च न्यायालयात दाखल केलेल्या न्यायप्रविष्ठ प्रकरणात माहिती मिळणेबाबत.

**धृवकिशोर पाटील :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या आस्थापनेवर जनसंपर्क अधिकारी या पदावर श्री. सचिन चवाथे यांची नियुक्ती करण्यात आली होती. परंतु नियुक्तीच्या वेळेस त्यांनी महापालिकेस सादर केलेले शैक्षणिक प्रमाणपत्र खोटे असल्याचे आढळल्यावरून श्री. सचिन चवाथे यांना बडतर्फ करण्यात आले होते. सदर बडतर्फीच्या निर्णयाविरोधात श्री. सचिन चवाथे यांनी मा. उच्च न्यायालयात, मुंबई येथे रिट याचिका दाखल केली असता श्री. सचिन चवाथे यांना महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 56(4) अन्वये बडतर्फीच्या आदेशाविरुध्द मा. स्थायी समितीकडे अपिल करण्याची मुभा असल्याने तिथे अपिल करावे असा निर्णय मा. उच्च न्यायालयाने देवून रिट याचिका निकाली काढण्यात आली होती. त्यानुसार श्री. सचिन चवाथे यांनी मा. स्थायी समितीकडे कलम 56(4) अन्वये अपिल दाखल केली असता मा. स्थायी समितीने ठाणे जिल्हा न्यायालयात प्रलंबित प्रकरणातील निर्णयाच्या अधीन राहून व न्यायालयाने दिलेल्या निर्णयानूसार प्रशासनाने नियम व कायदा तपासून श्री. सचिन चवाथे यांना जनसंपर्क अधिकारी या पदावर हजर करुन घेण्यासाठी ठराव पारित केला होता.

परंतु मा. स्थायी समिती मध्ये ठराव पारित करुनही महापालिका प्रशासनाने श्री. सचिन चवाथे यांना नियुक्त करुन घेतले नाही. त्यामुळे सचिन चवाथे यांनी पुन्हा मा. उच्च न्यायालयात याचिका दाखल केली असता न्यायालयाने पुन्हा मा. स्थायी समितीकडे कायद्याच्या तरतुदीच्या अनुषंगाने पुन:श्च नव्याने निर्णय घेण्याकरीता वर्ग करण्यात आला व सदरचा निर्णय स्थायी समितीने आदेश पारित केल्यापासून 3 महिन्याच्या आंत निर्णय घेण्यास कळविले आहे.

माहिती अधिकार २००५ अंतर्गत देण्यात आलेली माहिती सत्यप्रत



जनमाहिती अधिकारी
नगरसचिव विभाग
मिरा भाईंदर महानगरपालिका

तरी मा. उच्च् न्यायालयाने दिलेल्या आदेशानूसार महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 56(4) अन्वये प्रशासनाने श्री. सचिन चवाथे यांची जनसंपर्क अधिकारी या पदावर दि. 02/08/2011 पासून पुर्नःस्थापित करण्यात यावे व त्यांची सेवा नियुक्ती दिनांकापासून सलग धरण्यात यावी व नियमानूसार पुर्नःस्थापित दिनांकापासून वेतन व इतर अनुषंगिक लाभ देण्यात यावे असा मी ठराव मांडत आहे.

राकेश शाह :-

माझे अनुमोदन आहे.

**मा. सभापती :-**

ठराव मंजुर.

**स्नेहा पांडे :-**

सभापती महोदय यह गोषवारा जो लोगोके पास आया है| इसमे दिया गया है की सर्टीफिकेट जाली था| पटना विद्यापिठ ने नगरपालिका को सुचित भी किया की हमारा सर्टीफिकेट नही है| इसके बावजुद भी स्टँन्डींग कमिटी हम लोग ऐसा निर्णय क्यु दे की उसको रखो या निकालो नियम के कोर्ट के निर्णय के अधिन रहके जो प्रशासन के हात में है वैसा निर्णय लिया जाएँ और कोर्ट के आदेश के तिन महिने के अंदर लेना था| लेकीन तीन महिने से स्टँन्डींग कमिटी लगी नही है| तो वो क्या नियम है वो देखीए 15/11/2019 को कोर्ट ने निर्णय दिया है की तीन महिने के अंदर स्टँन्डींग कमिटी ने पास कर के निर्णय लिया जाए तो तीन महिने से ज्यादा होचुके है| कोर्ट के नियम के अधिन रहके हम लोग कोई भी ठराव पास करे ऐसी मेरी सुचना है|

**धृवकिशोर पाटील :-**

हाय कोर्टाने जो डिसिजन दिया हुँवा है, उसी डिसीजन के मुताबीक स्टँन्डींग कमिटी को अधिकार है और अगर एक बार कमिशनर किसी को बडतर्फ करता है तो अपिलिय ऑथोरिटी स्टँन्डींग कमिटी को होती है अपिलीय ऑथोरीटी स्टॅडींग कमिटी होती है| वो स्टँन्डींग कमिटी उसकी शिक्षा माफ भी कर सकती है. यहा उसी डिसिजन के उपर.

**स्नेहा पांडे :-**

स्टँन्डींग कमिटीने 2017 में पास किया है.

**धृवकिशोर पाटील :-**

वो ही आप को बोल रहा हुं की अपना जो महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम जो लॉ है उसमें 56(4) मे स्टँन्डींग कमिटी को पॉवर दिया है और उसी के मुताबिक पिछली स्टँन्डींग कमिटीने.

**स्नेहा पांडे :-**

ठराव किया है, रखने का तो प्रशासन ने क्यू नही रखा यह खुलासा प्रशासन की तरफ से आना चाहिए था|

**धृवकिशोर पाटील :-**

आप पुछो की प्रशासनने क्यों नही किया|

**स्नेहा पांडे :-**

प्रशासन की तरफ से उनके नियम में नही बैठता या किस बात की वजह से स्टँन्डींग में ऑलरेडी ठराव हूँवा था उसपे अंमल नही किया गया इसलिये उसे वापस कोर्ट जाना पडा और इस बार भी कोर्ट ने निर्णय दिया था की तीन महिने के अंदर करना है तो तीन महिने से मिटींग नही हुँई तो अभी नियम में क्या बैठता है और प्रशासन के तरफ से क्या है इसका खुलासा किया जाए|

**मा. अतिरिक्त आयुक्त :-**



माहिती अधिकार २००५ अंतर्गत देण्यात आलेली माहिती सत्यप्रत
जनमाहिती अधिकारी
नगरसचिव विभाग
मिरा भाईंदर महानगरपालिका

मा. सदस्यांनी विचारलेल्या प्रश्नांची परिपूर्ण माहिती सुध्दा आपल्याच दि.11/08/2016 च्या ठरावामध्ये नमुद आहे.

**नरेंद्र पाटील :-**

मा. सभापतींच्या परवानगीने बोलतो श्री. सचिन चवाथे यांना दि.24/01/2001 रोजी जनसंपर्क पदी नियुक्ती केली होती. त्यांचे प्रमाणपत्र खोटे आढळल्यामुळे दि.2/10/2011 रोजी त्याला बडतर्फ केले आणि या निर्णया विवृध्द त्यांनी याचिका क्रं. 7880-2011 दाखल केले असता 9/10/2013 रोजी चवाथे ह्यांनी मनपा अधिनियम कलम 56-4 अन्वये बडतर्फ आदेशाच्या विवृध्द अपिल दाखल कारण्यास मुभा देऊन सदरची याचीका निकाली काढली होती त्यानंतर हा विषय पून्हा स्थायी समिती पूढे कलम 56-4 अन्वये अपिल दाखल केले ह्यांच्या नंतर स्थायी समिती ने दि.11/8/2016 रोजी ठराव पारित केला आहे. दि.11/8/2016 रोजीचा ठराव रद्द करण्यात आलेला आहे.

**स्नेहा पांडे :-**

पालिकाने उसपे अंमलबजावनी नही किया बादमे वो कोर्ट मे गया तब रद्द किया गया अंमलबजावनी क्यों नही हूई उसमें टेक्नीकल क्या प्रॉब्लेम था?

नरेंद्र पाटील :-

पारित केलेला ठराव रद्द करण्यात येत आहे आणि सदरचे प्रकरण स्थायी समिती पूढे याचिकेदार ह्यांच्या अपिलावर कायद्याचे तरतुदीच्या अनुषंगाने निर्णय घेण्याकरिता वर्ग करण्यात आले आहे.

**स्नेहा पांडे :-**

16 मध्ये ठराव झाला तेंव्हा त्याला रूजु का करण्यात आले नाही त्याला पून्हा कोर्टात जावे लागले म्हणून रद्द झाले काय अडचन होजी का नाही झाले.

**अनिल सावंत :-**

ह्याच्या मध्ये पालिकेने कोर्टा मध्ये जो एफिडेव्हीट सादर केला आहे पालिकेच्या सहीचे ते 2011 चे आहे. त्याच्यामध्ये पत्रकारीता व जन सज्ञापन ह्या पदविकेच्या अभ्यासक्रमासाठी एकता उन्नती मंडळ कल्याण ठाणे ह्या शासन मांन्य संस्थेचे मार्फत केला होता म्हणून अर्ज छाननीत त्या पदवीकेचा विचार केलेला आहे व सदर प्रमाणपत्र शासनमान्य संस्थेचे आहे याबाबत पडताळणी करून सदर प्रमाणपत्र हे त्या संस्थेचे असून संस्था शासन मान्य आहे. म्हणजे एफिडेव्हीट पालिकेच्या सहीने त्याठीकानी आस्थापना अधिक्षक, मुख्यलिपीक, सहा.आयुक्त, मा.उपायुक्त ह्यांनी कोर्टामध्ये सादर केलेले आहे. इथे कसे म्हणता की बोगस डॉक्युमेंट दिले होते. इथे मा. उपायुक्तांचा शेरा आहे. वरील “अ” प्रमाणे गुनानूक्रमे उत्तीर्ण झालेल्या सचिन सुधाकर चवाथे ह्या जनसंपर्क अधिकारी ह्या पदाकरिता नियुक्ती आदेश देण्यास मंजुरीची शिफारस असे ही मंजूरीची शिफारस तुम्ही दिल्याचे कोर्टात एफिडेव्हीट सादर केलेले आहे त्यांनी त्यावेळी दोन अर्ज दिले होते. त्यांनी ज्यावेळी अर्ज केला होता एक बिहारचे सादर केला होता आणि एक ठाण्याच्या संस्थेचा सादर केला होता. ठाण्याच्या संस्थेचे सादर केले आहे. ते प्रशासन म्हणजे ते मान्य आहे. ऑब्जेक्शन बिहारच्या इंस्टीट्यूट संस्थेचे आहे म्हणून त्या कोर्टाने स्थायी समितीला अधिकार दिले तुम्ही शासनाच्या निर्णयाच्या अधिन राहून निर्णय घ्या स्टॅन्डींग कमिटी अडचणीत यायला नको.

**मा. सभापती :-**

ठराव मंजुर

प्रकरण क्र. १२८ :-

बडतर्फ करण्यात आलेले तत्कालीन जनसंपर्क अधिकारी श्री. सचिन चवाथे यांना मा. उच्च न्यायालयात दाखल केलेल्या न्यायप्रविष्ठ प्रकरणात माहिती मिळणेबाबत.



माहिती अधिकार ... अंतर्गत देण्यात आलेली ... प्रत

जनमाहिती अधिकारी नगरसचिव विभाग मिरा भाईंदर महानगरपालिका

ठराव क्र. १०२ :-

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या आस्थापनेवर जनसंपर्क अधिकारी या पदावर श्री. सचिन चवाथे यांची नियुक्ती करण्यात आली होती. परंतु नियुक्तीच्या वेळेस त्यांनी महापालिकेस सादर केलेले शैक्षणिक प्रमाणपत्र खोटे असल्याचे आढळल्यावरून श्री. सचिन चवाथे यांना बडतर्फ करण्यात आले होते. सदर बडतर्फीच्या निर्णयाविरोधात श्री. सचिन चवाथे यांनी मा. उच्च न्यायालयात, मुंबई येथे रिट याचिका दाखल केली असता श्री. सचिन चवाथे यांना महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 56(4) अन्वये बडतर्फीच्या आदेशाविरुध्द मा. स्थायी समितीकडे अपिल करण्याची मुभा असल्याने तिथे अपिल करावे असा निर्णय मा. उच्च न्यायालयाने देवून रिट याचिका निकाली काढण्यात आली होती. त्यानुसार श्री. सचिन चवाथे यांनी मा. स्थायी समितीकडे कलम 56(4) अन्वये अपिल दाखल केली असता मा. स्थायी समितीने ठाणे जिल्हा न्यायालयात प्रलंबित प्रकरणातील निर्णयाच्या अधीन राहून व न्यायालयाने दिलेल्या निर्णयानूसार प्रशासनाने नियम व कायदा तपासून श्री. सचिन चवाथे यांना जनसंपर्क अधिकारी या पदावर हजर करुन घेण्यासाठी ठराव पारित केला होता.

परंतु मा. स्थायी समिती मध्ये ठराव पारित करुनही महापालिका प्रशासनाने श्री. सचिन चवाथे यांना नियुक्त करुन घेतले नाही. त्यामुळे सचिन चवाथे यांनी पुन्हा मा. उच्च् न्यायालयात याचिका दाखल केली असता न्यायालयाने पुन्हा मा. स्थायी समितीकडे कायद्याच्या तरतुदीच्या अनुषंगाने पुन:श्च नव्याने निर्णय घेण्याकरीता वर्ग करण्यात आला व सदरचा निर्णय स्थायी समितीने आदेश पारित केल्यापासून 3 महिन्याच्या आंत निर्णय घेण्यास कळविले आहे.

तरी मा. उच्च् न्यायालयाने दिलेल्या आदेशानूसार महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 56(4) अन्वये प्रशासनाने श्री. सचिन चवाथे यांची जनसंपर्क अधिकारी या पदावर दि. 02/08/2011 पासून पुर्न:स्थापित करण्यात यावे व त्यांची सेवा नियुक्ती दिनांकापासून सलग धरण्यात यावी व नियमानूसार पुर्न:स्थापित दिनांकापासून वेतन व इतर अनुषंगिक लाभ देण्यात यावे असा मी ठराव मांडत आहे.

सुचक :- श्री. धृवकिशोर पाटील      अनुमोदक :- श्री. राकेश शाह

ठराव सर्वानुमते मंजूर

सही/-
सभापती
स्थायी समिती
मिरा भाईंदर महानगरपालिका

**नगरसचिव :-**

**प्रकरण क्र. 129,** मा. स्थायी समिती सभेत प्रस्तावास मंजूरी मिळणेबाबत. Post Implementation Support Services, Customization and new development for property tax and water tax application.

**अनिल सावंत :-**

विषय काय आहे?

**धृवकिशोर पाटील :-**

सॉफ्टवेयर साठी मुदत वाढ.

**वैशाली रकवी :-**

माहिती अधिकार २००५ अंतर्गत देण्यात आलेली माहिती सत्यप्रत
30/04/20
जनमाहिती अधिकारी
नगरसचिव विभाग
मिरा भाईंदर महानगरपालिका

# मिरा भाईदर महानगरपालिका

**जा.क्र.मा.अ./अपिल/03/2020**
**प्रथम अपिलीय अधिकारी तथा नगरसचिव**
**मिरा भाईदर महानगरपालिका.**
**दि. 30/07/2020**

**प्रथम अपिलिय अधिकारी तथा नगरसचिव मिरा भाईदर महानगरपालिका यांचेसमोर माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19(1) अंतर्गत दाखल झालेले प्रथम अपील**

**श्री. विनोद दामोदर शेवंते,** ..... **अपिलार्थी**
**बी-401, रितुग्लोरीअस बिल्डींग,**
**ऑरेंज हॉस्पीटलजवळ,**
**मिरारोड (पूर्व), 401 107**

**विरूध्द**

**जनमाहिती अधिकारी** ..... **प्रतिवादी**
**नगरसचिव विभाग**
**मिरा भाईदर महानगरपालिका**

**:- विवेचन :-**

अपिलार्थी श्री. विनोद दामोदर शेवंते, राहणार बी-401, रितुग्लोरीअस बिल्डींग, ऑरेंज हॉस्पीटलजवळ, मिरारोड (पूर्व), 401 107 यांनी माहितीचा अधिकार अधिनियम 2005 नुसार जन माहिती अधिकारी, यांचेकडे दि. 19/03/2020 रोजीच्या अर्जान्वये खालील माहिती मिळणेबाबत अर्ज सादर केला.

**अपिलार्थी यांनी मागितलेल्या माहितीचा तपशिल :-**

बडतर्फ जनसंपर्क अधिकारी श्री. सचिन चवाथे यांना पुन्हा कामावर घेण्याबाबत केलेल्या पत्रव्यवहाराबाबत माहितीची मागणी केलेली आहे.

**अपिल दाखल करण्याची कारणे :-**

अर्जादारांनी अर्जात नमुद संपूर्ण माहिती उपलब्ध करुन दिली नाही म्हणून अपीलार्थी यांनी दि. 10/06/2020 रोजी प्रथम अपिलीय अधिकारी तथा नगरसचिव यांचेकडे प्रथम अपिल दाखल केले आहे.

**सुनावणीचा तपशिल :-**

अपिलार्थी व जन माहिती अधिकारी तथा लिपीक, नगरसचिव विभाग यांना प्रथम अपिलाच्या सुनावणीस दि. 30/07/2020 रोजी सकाळी 11.30 वाजता उपस्थित राहणेबाबत पत्र क्र. जा.क्र.मनपा/सचिव/मा.अ./अपिल/03/2021-21, दि. 24/07/2020 अन्वये कळविण्यांत आले आहे. सदर सुनावणीस अपिलार्थी व जनमाहिती अधिकारी, नगरसचिव विभाग उपस्थित आहेत.

**अपिलार्थी यांचा सुनावणी दरम्यान युक्तीवाद :-**

जनमाहिती अधिकारी यांनी मला दि. 16/03/2020 रोजीचा इतिवृत्तांत दिलेला नाही. स्थायी समितीचा असा टाईम पीरेड असेल की इतिवृत्तांतास किती दिवसात मान्यता घेणे आवश्यक आहे. माझ्या माहिती प्रमाणे ह्या मिटींगचे इतिवृतांत पुढच्या मिटींगमध्ये कायम करून घेणे आवश्यक आहे.

**अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी दरम्यान केलेला युक्तीवाद :-**

जनमाहिती अधिकारी यांनी मिटींगचे ठराव तुम्हाला दिलेले आहेत. दि. 16/03/2020 रोजीचे इतिवृत्तांत स्थायी समितीमध्ये कायम झालेले नसल्याने आपणांस दिलेले नाही. अधिनियमामध्ये इतिवृत्तांतास शक्य तितक्या लवकर मान्यता घ्यावी असे म्हटलेले आहे. तथापी, कोविड-19 संसर्गामुळे शासनाने लॉकडाऊन जाहिर केल्याने

रेल्वे व बस वाहतुक संपूर्ण बंद झालेली होती. करिता नगरसचिव कार्यालयातील लघुलेखक व संगणकचालक कर्मचारी यांना कार्यालयात उपस्थित होता आले नाही. यामुळे इतिवृत्तांत तयार होणेस विलंब झालेला आहे. सद्यस्थितीत इतिवृत्तांत तयार करणेत येत असून, पुढील स्थायी समिती सभेमध्ये कायम झालेवर आपणांस उपलब्ध करुन देण्यात येईल.

**अपिलार्थी यांचा सुनावणी दरम्यान युक्तीवाद :-**

महानगरपालिकेचे वेबसाईटवर 2003 पासुनचे इतिवृत्तांत आहेत बाकिचे इतिवृत्तांत दिसत नाहीत. तुम्ही मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या वेबसाईटवर इतिवृत्तांत टाका आणि मला ही सदर इतिवृत्तांत द्या. तसेच मला सभा शास्त्राचे बुक वाचायला पाहिजे होते. सभा कशा होतात त्याचे नियम काय आहेत. जे आपले नियम व जी.आर. असतात त्या प्रमाणे सभा कामकाज व्हायला पाहिजे. सभा शास्त्राचे पुस्तक असेल आणि त्यास शासनाने मान्यता दिलेली असेल तर त्या पुस्तकाचा आपण रेफरन्स द्या.

**अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी दरम्यान केलेला युक्तीवाद :-**

जितकी इतिवृत्तांत मंजुर झालेली आहेत तेवढी महानगरपालिकेच्या वेबसाईटवर प्रसिध्द केलेली आहेत. आम्ही मंजूर इतिवृत्तांत वेबसाईटवर प्रसिध्द करायला पेंडिंग ठेवत नाही. आपण महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील अनुसुची ड, प्रकरण 2 बघा त्यामध्ये सभा कामकाजाबाबत सर्व नियम आहेत. तुम्ही जर आताचे लेटेस्ट नविन ॲक्टचे पुस्तक घेतले तर त्यामध्ये जुने नविन सगळी ॲमेंडमेंट असतील.

**अपिलार्थी यांचा सुनावणी दरम्यान युक्तीवाद :-**

मला निर्णय द्या की इतिवृत्तांत कायम करुन झालेवर उपलब्ध करुन देण्यात येईल.

**अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी दरम्यान केलेला युक्तीवाद :-**

दि. 16/03/2020 च्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्तांत स्थायी समिती सभेमध्ये कायम केल्यानंतर त्याची सत्यप्रत आपणांस देण्यात येईल.

**-: निर्णय :-**

दि. 16/03/2020 रोजीच्या मा. स्थायी समिती सभेचे इतिवृत्तांत पुढील सभेत कायम झालेवर जनमाहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांना विनामुल्य उपलब्ध करुन द्यावे.

30/7/2020

**(वासुदेव शिरवळकर)**
**अपिलीय अधिकारी तथा नगरसचिव**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**प्रति,**

1) **श्री. विनोद दामोदर शेवंते,**
**बी-401, रितुग्लोरीअस बिल्डींग,**
**ऑरेंज हॉस्पीटलजवळ,**
**मिरारोड (पूर्व), 401 107**

2) **जनमाहिती अधिकारी, नगरसचिव विभाग**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

3) **माहिती अधिकार अपील नस्ती**
**प्रथम अपिलीय अधिकारी तथा**
**नगरसचिव यांचे कार्यालय**

# मिरा भाईंदर महानगरपालिका
## नगरसचिव कार्यालय

दि. 30/07/2020

श्री. विनोद शेवंते यांनी दि. 19/03/2020 रोजी दाखल केलेल्या अर्जावर माहिती माहिती प्राप्त न झाल्याने दि. 10/06/2020 रोजी प्रथम अपिल दाखल केलेले आहे. सदर अपिलीय अर्जावर दि. 30/07/2020 रोजी सकाळी 11.30 वाजता मिरा भाईंदर महानगरपालिका मुख्य कार्यालय, तिसरा मजला, नगरसचिव दालन येथे सुनावणी आयोजित करण्यांत आली असता, सदर सुनावणीस खालील अपिलार्थी / अधिकारी उपस्थित होते.

| अ.क्र. | नांव | सही |
|---|---|---|
| 1 | श्री./श्रीम. वासुदेव शिरवळकर | 30/7/2020 |
| 2 | श्री./श्रीम. कृष्णा म्हात्रे | |
| 3 | श्री./श्रीम. विनोद शेवंते | 30/7/2020 |
| 4 | श्री./श्रीम. ------------------------------------------ | |

# मिरा भाईंदर महानगरपालिका

स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय,
छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (प.) ता.जि. ठाणे 401 101
नगरसचिव विभाग

जा.क्र.मनपा/सचिव/अपिल/03 /2019-20 दिनांक :- 28/07/2020

प्रति,
**श्री. विनोद दामोदर शेवंते**
**बी-401, रितुग्लोरीअस बिल्डींग,**
**ऑरेंज हॉस्पीटलजवळ,**
**मिरारोड (पूर्व), 401 107**

**विषय :-** <u>केंद्र शासनाचा माहितीचा अधिकारी 2005.</u>
**बडतर्फ जनसंपर्क अधिकारी श्री. सचिन चवाथे यांना पुन्हा कामावर घेण्याबाबत केलेल्या पत्रव्यवहाराबाबत.**

**संदर्भ :-** **आपणांकडील दि. 10/06/2020 रोजीचा अपिलीय अर्ज.**

**महोदय,**

उपरोक्त विषयांन्वये आपण माहिती अधिकार नियम 2005 अंतर्गत दि. 19/03/2020 रोजी दाखल केलेल्या अर्जानुसार बडतर्फ जनसंपर्क अधिकारी श्री. सचिन चवाथे यांना पुन्हा कामावर घेण्याबाबत केलेल्या पत्रव्यवहाराबाबत माहिती आपणांस न दिल्याचे कळवून संदर्भित अपिल दाखल केलेले आहे.

आपण दाखल केलेल्या अपिलीय अर्जावर दि. 30/07/2020 रोजी सकाळी 11.30 वाजता मिरा भाईंदर महानगरपालिका मुख्य कार्यालय, तिसरा मजला, नगरसचिव दालन येथे सुनावणी आयोजित करण्यात आलेली आहे. तरी सदर सुनावणीच्या वेळी आपण उपस्थित रहावे ही विनंती.

**(वासुदेव शिरवळकर)**
**अपिलीय अधिकारी तथा**
**नगरसचिव**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**प्रत माहितीस्तव :-**
जनमाहिती अधिकारी तथा लिपीक
नगरसचिव विभाग, मिरा भाईंदर महानगरपालिका

24/7/2020







माहिती अधिकार अधिनियम,२००५ याच्या कलम १९ (१) अन्वये अपील

प्रति,
प्रथम अपिलीय अधिकारी साहेब.
मिरा भाईदर महानगर पालिका
नगर सचिव विभाग
ता.जि.ठाणे.४०११०५

मिरा भाईंदर महानगरपालिका
नगरसचिव विभाग
म.प./न.प./ज.प.
आवक क्र.....................
दिनांक:- ११/०६/2020

| | |
|---|---|
| १)अपिलकाराचे संपूर्ण नावः- | **श्री .विनोद दामोदर शेवंते**<br>**मो (९८६७३३६४४७) /Email id-Vinodshevante007@gmail.com** |
| २)पत्ताः- बी-४०१, रितुग्लोरिअस बिल्डींग, आयडियल पार्क, मिरारोड पुर्व.४०११०७ | |
| ३)राज्य जन माहिती अधिका-याचा तपशिल | मिरा भाईदर महानगर पालिका<br>मुख्यालय्, भाईदर पश्चिम.<br>~~अस्थापना विभाग~~ नगर सचिव विभाग<br>ता.जि.ठाणे.४०११०७ |
| ४)ज्या आदेशा विरुध्द अपील केले आहे तो आदेश मिळाल्याचा दिंनांक (आदेश काढला असल्यास) | माहिती दिलेली नाही<br>मिरा भाईंदर महानगरपालिका<br>नगरसचिव विभाग<br>म.प./न.प./ज.प./४३/अपिल<br>आवक क्र. 03/2020<br>दिनांक ११/६/2020 |
| ५)अपील दाखल करण्याची अंतिम दिनांक | माहिती अधीकारी यांनी कळवीली नाही. |
| ६)अपिलाची कारणे-वारंवार नगर सचिव विभागाला भेटुन ही दिनांक १९/३/२०२० पोच २०/०३/२०२० च्या पत्राला आज दिनांक १०/६/२०२० पर्यत माहिती दिलेली नाही | |
| ७)माहितीचा तपशिल | दिनांक १९/३/२०२० पोच २०/०३/२०२० नगर सचिव विभाग याना बडतर्फ जनसंपर्क अधिकारी सचिन चवाथे यानी पुन्हा कामावर घेण्या बाबत केलेल्या पत्र व्यवहारा बाबत |
| (एक)हव्या असलेल्या माहितीचे स्वरुप आणि विषय | बडतर्फ जनसंपर्क अधिकारी सचिन चवाथे यानी पुन्हा कामावर घेण्या बाबत केलेल्या पत्र व्यवहारा बाबत दिनांक १९/३/२०२० चे २०/३/२०२० चे पोच पत्र |
| (दोन)माहिती ज्या कार्यालयाशी किंवा विभागाशी संबंधित आहे त्याचे नाव | मिरा भाईदर महानगर पालिका<br>नगर सचिव विभाग<br>ता.जि.ठाणे.४०११०५ |
| ठिकाणः-भाईदर<br><br>दिनांकः- 11/6/2020 | **अपिलकाराची सही**<br>[signature]<br>11/6/2020 |

Vinodshevante007@gmail.com
Mobail no-9867336447

माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अन्वयें माहिती मिळण्याबाबतच्या अर्जाचा नमुना जोडपत्र (अ)

प्रति,
राज्य शासकिय माहिती अधिकारी,
मिरा-भाईंदर महानगरपालिका,
नगर सचिव विभाग
दिनांक

| | |
|---|---|
| (१)अर्जदाराचेपूर्णनावः- | विनोद दामोदर शेवंते मो 9867336447 |
| (२)अर्जदाराचा पूर्ण पत्ताः- | बि-४०१, रितुग्लोरिअस बिल्डींग, नियर ऑरेंज हॉस्पीटल, मिरारोड इस्ट -४०११०७ |
| एक)माहितीचा विषयः बडतर्फ जनसंपर्क अधिकारी सचिन चवाथे यानी पुन्हा कामावर घेण्याबाबत केलेल्या पत्र व्यवहारा बाबत. | |
| (दोन)माहिती ज्याच्याशि संबंधित असेल तो कालावधि- | २०१०ते २०२० आजतागायत |
| आवश्यक असलेल्या माहितीचे वर्णनः-<br>१)बडतर्फ जनसंपर्क अधिकारी सचिन चवाथे यानी पुन्हा कामावर घेण्याबाबत दिलेली सर्व पत्रे व त्यावर दिलेल्य उत्तराची /कार्यवाहीची सत्यप्रत दया<br>२)स्थायी समितीने केलेले सर्व ठराव, महासभा ठराव,गोषावरा, इतिवृत्तांत, सत्यप्रत दया | |
| (चार)माहिती टपालाने मिळणे आवश्यक आहे किंवा कसे घेऊन जाणार आहात किंवा कसेः- | व्यक्तीशः आवशक आहे |
| (४)अर्जदार, दारिद्र्रेषेखाली आहे किंवा कसे होय/नाही | ————नाही |
| ठिकाणः- संगमनेर | |
| दिनांकः- | अर्जदाराची सही<br>19/3/2020 |

पोच
दिनांक 20/03/2020
नगरसचिव विभाग
मिरा भाईंदर महानगरपालिका

Vinodshevante007@gmail.com
Mobail no-9867336447

# मिरा भाईंदर महानगरपालिका

स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय,
छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (प.) ता.जि. ठाणे 401 101
नगरसचिव विभाग
ईमेल - nagarsachiv.mbmc@gmail.com


जा.क्र.मनपा/सचिव/मा.अ./ ९८ /2020 दिनांक :- ९५ / ०६/2020

**प्रति,**
**श्री. विनोद दामोदर शेवंते**
**बी-401, रितुग्लोरीअस बिल्डींग,**
**ऑरेंज हॉस्पीटलजवळ,**
**मिरारोड (पूर्व), 401 107**

**विषय :-** **<u>केंद्र शासनाचा माहितीचा अधिकारी 2005.</u>**
**बडतर्फ जनसंपर्क अधिकारी श्री. सचिन चवाथे यांना पुन्हा कामावर घेण्याबाबत केलेल्या पत्रव्यवहाराबाबत.**

**संदर्भ :-** **आपणांकडील दि. १९/०३/२०२० रोजीचा महिती अधिकारातील प्राप्त अर्ज. (या कार्यालयास प्राप्त दि. 20/03/2020)**

**महोदय,**

उपरोक्त विषयांकित संदर्भित पत्रान्वये आपण बडतर्फ जनसंपर्क अधिकारी सचिन चवाथे यांनी पुन्हा कामावर घेणेबाबत केलेला पत्रव्यवहार, त्यावर प्रशासनाने दिलेल्या उत्तराची/कार्यवाहीची सत्यप्रत तसेच मा. महासभा व मा. स्थायी समितीने केलेले सर्व ठराव, गोषवारा, इतिवृत्तांताच्या सत्यप्रतींची मागणी केलेली आहे. त्याअनुषंगाने आपणांस पत्र क्र. जा.क्र.मनपा/सचिव/मा.अ./18/2018, दि. 16/04/2020 अन्वये आपणांस उपलब्ध करून देण्यात येणाऱ्या एकुण 42 पानांकरिता रक्कम रुपये 84/- (अक्षरी रुपये चौऱ्याऐंशी मात्र) इतके शुल्क महानगरपालिका फंडात भरणा करणेबाबत कळविले होते. आपण सदर शुल्क रुपये 84/-, पावती क्र. 150501 अन्वये दि. 15/06/2020 रोजी महानगरपालिका फंडात भरणा केल्याने, आपणांस आपण बडतर्फ जनसंपर्क अधिकारी सचिन चवाथे यांचे संदर्भात मा. महासभा व मा. स्थायी समितीने केलेले सर्व ठराव, गोषवारा, इतिवृत्तांताच्या सत्यप्रती या पत्रासोबत उपलब्ध करून देत आहोत. (एकूण पाने 42)

सदर माहितीबाबत आपले समाधान न झाल्यास अपिलीय अधिकारी तथा नगरसचिव श्री. वासुदेव शिरवळकर, नगरसचिव विभाग, तिसरा मजला, मुख्य कार्यालय, स्व. इंदिरा गांधी भवन, भाईंदर (प.) यांचेकडे 30 दिवसात प्रथम अपिल दाखल करता येईल.

कळावे.

**(कैलास दा. म्हात्रे)**
**जनमाहिती अधिकारी तथा लिपीक**
**नगरसचिव विभाग**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**
**(भ्रमणध्वनी क्र. 9867077799)**

pc 2\\Pranali\d\Pranali\Mahiti Adhikar\Letter - Vinod Shevante.docx

TM

# मिरा भाईंदर महानगरपालिका

स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय,
छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (प.) ता.जि. ठाणे 401 101
नगरसचिव विभाग
ईमेल - nagarsachiv.mbmc@gmail.com

जा.क्र.मनपा/सचिव/मा.अ./१८ /2020 दिनांक :- २४/०६/2020

**प्रति,**
**श्री. विनोद दामोदर शेवंते**
**बी-401, रितुग्लोरीअस बिल्डींग,**
**ऑरेंज हॉस्पीटलजवळ,**
**मिरारोड (पूर्व), 401 107**

**विषय :-** **केंद्र शासनाचा माहितीचा अधिकारी 2005.**
**बडतर्फ जनसंपर्क अधिकारी श्री. सचिन चवाथे यांना पुन्हा कामावर घेण्याबाबत केलेल्या पत्रव्यवहाराबाबत.**

**संदर्भ :-** **आपणांकडील दि. १९/०३/२०२० रोजीचा महिती अधिकारातील प्राप्त अर्ज. (या कार्यालयास प्राप्त दि. 20/03/2020)**

**महोदय,**

उपरोक्त विषयांकित संदर्भित पत्रान्वये आपण बडतर्फ जनसंपर्क अधिकारी सचिन चवाथे यांनी पुन्हा कामावर घेणेबाबत केलेला पत्रव्यवहार, त्यावर प्रशासनाने दिलेल्या उत्तराची/कार्यवाहीची सत्यप्रत तसेच मा. महासभा व मा. स्थायी समितीने केलेले सर्व ठराव, गोषवारा, इतिवृत्तांताच्या सत्यप्रतींची मागणी केलेली आहे. त्याअनुषंगाने आपणांस पत्र क्र. जा.क्र.मनपा/सचिव/मा.अ./18/2018, दि. 16/04/2020 अन्वये आपणांस उपलब्ध करुन देण्यात येणाऱ्या एकुण 42 पानांकरिता रक्कम रुपये 84/- (अक्षरी रुपये चौऱ्याऐंशी मात्र) इतके शुल्क महानगरपालिका फंडात भरणा करणेबाबत कळविले होते. आपण सदर शुल्क रुपये 84/-, पावती क्र. 150501 अन्वये दि. 15/06/2020 रोजी महानगरपालिका फंडात भरणा केल्याने, आपणांस आपण बडतर्फ जनसंपर्क अधिकारी सचिन चवाथे यांचे संदर्भात मा. महासभा व मा. स्थायी समितीने केलेले सर्व ठराव, गोषवारा, इतिवृत्तांताच्या सत्यप्रती या पत्रासोबत उपलब्ध करुन देत आहोत. (एकूण पाने 42)

सदर माहितीबाबत आपले समाधान न झाल्यास अपिलीय अधिकारी तथा नगरसचिव श्री. वासुदेव शिरवळकर, नगरसचिव विभाग, तिसरा मजला, मुख्य कार्यालय, स्व. इंदिरा गांधी भवन, भाईंदर (प.) यांचेकडे 30 दिवसात प्रथम अपिल दाखल करता येईल.

कळावे.

२४/६/२०

**(कैलास दा. म्हात्रे)**
**जनमाहिती अधिकारी तथा लिपीक**
**नगरसचिव विभाग**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**
**(भ्रमणध्वनी क्र. 9867077799)**

pc 2\\Pranali\d\Pranali\Mahiti Adhikar\Letter - Vinod Shevante.docx

TM

# मिरा भाईंदर महानगरपालिका

स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय,
छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (प.) ता.जि. ठाणे 401 101
नगरसचिव विभाग
ईमेल - nagarsachiv.mbmc@gmail.com

जा.क्र.मनपा/सचिव/मा.अ./९८ /2020 दिनांक :- २६/०४/2020

प्रति,
**श्री. विनोद दामोदर शेवंते**
**बी-401, रितुग्लोरीअस बिल्डींग,**
**ऑरेंज हॉस्पीटलजवळ,**
**मिरारोड (पूर्व), 401 107**

**विषय :-** **केंद्र शासनाचा माहितीचा अधिकारी 2005.**
**बडतर्फ जनसंपर्क अधिकारी श्री. सचिन चवाथे यांना पुन्हा कामावर घेण्याबाबत केलेल्या पत्रव्यवहाराबाबत.**

**संदर्भ :-** **आपणांकडील दि. १९/०३/२०२० रोजीचा महिती अधिकारातील प्राप्त अर्ज. (या कार्यालयास प्राप्त दि. 20/03/2020)**

**महोदय,**

उपरोक्त विषयांकित संदर्भित पत्रान्वये आपण बडतर्फ जनसंपर्क अधिकारी सचिन चवाथे यांनी पुन्हा कामावर घेणेबाबत केलेला पत्रव्यवहार, त्यावर प्रशासनाने दिलेल्या उत्तराची/कार्यवाहीची सत्यप्रत तसेच मा. महासभा व मा. स्थायी समितीने केलेले सर्व ठराव, गोषवारा, इतिवृत्तांताच्या सत्यप्रतींची मागणी केलेली आहे.

आपणांकडील संदर्भित पत्रातील मुद्दा क्र. 01 आस्थापना विभागाशी निगडीत असल्याने संदर्भित पत्राची छायांकित प्रत आपणांस माहिती उपलब्ध करुन देणेसाठी या कार्यालयाकडील पत्र क्र. जा.क्र./मनपा/सचिव/मा.अ./18/2020, दि. 20/03/2020 रोजी वर्ग केलेली आहे. तरी कृपया आपण आस्थापना विभागाकडून उक्त माहिती परस्पर घ्यावी.

तसेच नगरसचिव विभागाशी निगडीत मुद्दा क्र. 02 अन्वये, मा. महासभा व मा. स्थायी समितीमध्ये पारित झालेले ठराव, गोषवारे व इतिवृत्तांताच्या साक्षांकित प्रती खालीलप्रमाणे आपणांस उपलब्ध करुन देत आहोत. दि. 16/03/2020 रोजीच्या मा. स्थायी समिती सभेचे इतिवृत्तांत तयार करणेची कार्यवाही सुरु असून, इतिवृत्तांत तयार झालेनंतर पुढील स्थायी समितीत कायम केलेनंतर आपणांस उपलब्ध करुन देता येईल.

| अ.क्र. | सभा दिनांक व प्रकरण क्रमांक | तपशिल | एकुण पाने |
|---|---|---|---|
| 1 | मा. महासभा दि. 20/04/2011, प्रकरण क्र. 11 | गोषवारा | 02 |
| | | ठराव | 01 |
| | | इतिवृत्तांत | 05 |
| 2 | मा. स्थायी समिती सभा दि. 14/10/2015, प्रकरण क्र. 103 | गोषवारा | 04 |
| | | ठराव | 01 |
| | | इतिवृत्तांत | 01 |
| 3 | मा. स्थायी समिती सभा दि. 11/08/2016, प्रकरण क्र. 47 | गोषवारा | -- |
| | | ठराव | 01 |
| | | इतिवृत्तांत | 04 |

pc 2\\pranali\D\Pranali\Mahiti Adhikar\Letter - Vinod Shevante.docx



पावती क्र. ९३०५०९ = ८०
२५/६/२०२०

१६/५/२०२०

# मिरा भाईंदर महानगरपालिका

स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय,
छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (प.) ता.जि. ठाणे 401 101
नगरसचिव विभाग
ईमेल - nagarsachiv.mbmc@gmail.com


जा.क्र.मनपा/सचिव/मा.अ./ /2020 दिनांक :- / /2020

| | | | |
|---|---|---|---|
| 4 | मा. महासभा दि. 29/09/2016, प्रकरण क्र. 78 | गोषवारा<br>ठराव<br>इतिवृत्तांत | 03<br>02<br>07 |
| 5 | मा. स्थायी समिती सभा दि. 16/03/2020, प्रकरण क्र. 128 | गोषवारा<br>ठराव<br>इतिवृत्तांत | 10<br>01<br>-- |
| एकुण | | | 42 |

उक्त कागदपत्रांसाठी लागणारे शुल्क प्रति पान रुपये 2/- याप्रमाणे एकूण 42 पानांकरिता रुपये 84/- (अक्षरी रुपये चौऱ्याऐंशी मात्र) महानगरपालिका फंडात भरणा करुन पावतीची छायांकित प्रत जमा करुन माहिती घेण्यात यावी.

कळावे.

(कैलास दामोदर म्हात्रे)
जनमाहिती अधिकारी तथा लिपीक
नगरसचिव विभाग
मिरा भाईंदर महानगरपालिका
(भ्रमणध्वनी क्र. 9867077799)

O/C

# मिरा भाईंदर महानगरपालिका

स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय,
छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (प.) ता.जि. ठाणे 401 101
नगरसचिव विभाग
ईमेल - www.nagarsachiv.mbmc@gmail.com

जा.क्र.मनपा/सचिव/मा.अ./ ७१ /2020 — दिनांक :- 20 / 3 /2020

प्रति,
**जनमाहिती अधिकारी,**
**आस्थापना विभाग,**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**विषय :-** **केंद्र शासनाचा माहितीचा अधिकारी 2005.**
**बडतर्फ जनसंपर्क अधिकारी श्री. सचिन चवाथे यांना पुन्हा कामावर घेण्याबाबत केलेल्या पत्रव्यवहाराबाबत.**

**संदर्भ :-** **श्री. विनोद दामोदर शेवंते यांचेकडील दि. १९/०३/२०२० रोजीचा महिती अधिकारातील प्राप्त अर्ज. (या कार्यालयास प्राप्त दि. 20/03/2020)**

श्री. विनोद दामोदर शेवंते यांचेकडील संदर्भित अर्जातील मुद्दा क्र.१ आस्थापना विभागाशी निगडीत असल्याने, संदर्भित अर्जाची छायांकित प्रत आस्थापना विभागात वर्ग करण्यात येत आहे. तरी अर्जदारांस आपणांकडून परस्पर मुदतीत माहिती देण्यात यावी ही विनंती.

कळावे.

20/3/20

**(कैलास दामोदर म्हात्रे)**
**जनमाहिती अधिकारी तथा लिपीक**
**नगरसचिव विभाग**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**
**(भ्रमणध्वनी क्र. 9867077799)**

**प्रत माहितीस्तव :-**
**श्री. विनोद दामोदर शेवंते**
**बी-401, रितुग्लोरीअस बिल्डींग,**
**ऑरेंज हॉस्पीटलजवळ,**
**मिरारोड (पूर्व), 401 107**

24/3/2020
लिपीक (आस्थापना)
मिरा भाईंदर महानगरपालिका

pc 2\\Pranali\d\Pranali\Mahiti Adhikar\Letter - Vinod Shevante.docx

Vinodshevante007@gmail.com
Mobail no-9867336447

माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अन्वयें माहिती मिळण्याबाबतच्या अर्जाचा नमुना जोडपत्र (अ)

प्रति,
राज्य शासकिय माहिती अधिकारी,
मिरा-भाईंदर महानगरपालिका,
नगर सचिव विभाग
दिनांक

माहितीचा अधिकार
मिरा भाईंदर महानगरपालिका
नगरसचिव विभाग
स.प./न.प./ज.प.
आवक क्र. ९८/२०१९-२०
दिनांक:- २०/०३/२०२०

| | |
|---|---|
| (१)अर्जदाराचेपूर्णनावः- | विनोद दामोदर शेवंते मो 9867336447 |
| (२)अर्जदाराचा पूर्ण पत्ता:- | बि-४०१, रितुग्लोरिअस बिल्डींग, नियर ऑरेंज हॉस्पीटल, मिरारोड इस्ट -४०११०७ |
| एक)माहितीचा विषयः बडतर्फ जनसंपर्क अधिकारी सचिन चवाथे यानी पुन्हा कामावर घेण्याबाबत केलेल्या पत्र व्यवहारा बाबत. | |
| (दोन)माहिती ज्याच्याशि संबंधित असेल तो कालावधि- | २०१०ते २०२० आजतागायत |
| आवश्यक असलेल्या माहितीचे वर्णनः- १)बडतर्फ जनसंपर्क अधिकारी सचिन चवाथे यानी पुन्हा कामावर घेण्याबाबत दिलेली सर्व पत्रे व त्यावर दिलेल्य उत्तराची /कार्यवाहीची सत्यप्रत दया २)स्थायी समितीने केलेले सर्व ठराव, महासभा ठराव,गोषावरा, इतिवृत्तांत, सत्यप्रत दया | |
| (चार)माहिती टपालाने मिळणे आवश्यक आहे किंवा कसे घेऊन जाणार आहात किंवा कसे:- | व्यक्तीशः आवशक आहे |
| (४)अर्जदार, दारिद्ररेषेखाली आहे किंवा कसे होय/नाही | ---------नाही |
| ठिकाणः- संगमनेर | |
| दिनांकः- | अर्जदाराची सही<br>१९/३/२०२० |

Vinodshevante007@gmail.com
Mobail no-9867336447

प्रकरण क्र. ९२८ मा. स्थायी समिती सभा
दि. १६/०३/२०२

# मिरा भाईंदर महानगरपालिका

स्व इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग,
भाईंदर (प.), ता.जि. ठाणे, 401 101.
दुरध्वनी क्र. 28192828/28193087.

---

जा.क्र.मनपा/आस्था/1393 /2019-20 दि. 20/01/2020

प्रति,
महानगरपालिका सचिव,
मिरा भाईंदर महानगरपालिका.

मिरा भाईंदर महानगरपालिका
नगरसचिव विभाग
स.प./न.प./म.न.प.
आवक क्र. 960/2019-20
दिनांक:- 20 / 9 /2020

विषय :- बडतर्फ करण्यात आलेले तत्कालीन जनसंपर्क अधिकारी श्री. सचिन चवाथे यांना मा. उच्च न्यायालयात दाखल केलेल्या न्यायप्रविष्ठ प्रकरणात माहिती मिळणेबाबत.

संदर्भ :- 1. मा. उच्च न्यायालयाचा दि.15/11/2019 रोजीचे निर्णय.
2. जा.क्र.मनपा/विधी/465/2019-20, दि.30/11/2019 रोजीचे पत्र.

महोदय,

विषयांकित प्रकरणी मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या आस्थापनेवर जनसंपर्क अधिकारी या पदावर श्री. सचिन चवाथे यांची दि.24/01/2011 रोजी नियुक्ती करण्यात आली होती. परंतु त्यांनी नियुक्तीच्या वेळेस महानगरपालिकेस दिलेली शैक्षणिक पात्रतेचे प्रमाणपत्र खोटे आढळयावरून दि.02/08/2011 रोजी श्री. सचिन चवाथे यांना जनसंपर्क अधिकारी या पदावरून बडतर्फ करण्यात आले होते. सदर निर्णया विरूद्ध श्री. सचिन चवाथे यांनी मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे रिट याचिका क्र.7280/2011 दाखल केले असता दि.09/10/2013 रोजी श्री. सचिन चवाथे यांना महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमन चे कलम 56(4) अन्वये बडतर्फी आदेशांच्या विरूद्ध अपील दाखल करण्याचे मुभा देऊन सदरची रिट याचिका निकाली काढली होती. सदर आदेशानुसार श्री. सचिन चवाथे यांनी मा.स्थायी समिती यांच्याकडे कलम 56(4) अन्वये अपील दाखल केले असता दि.11/08/2016 रोजी मा. स्थायी समितीने ठाणे जिल्हा न्यायालयात प्रलंबित प्रकरणातील निर्णयाच्या अधीन राहून व न्यायालयाने दिलेल्या निर्णयानुसार प्रशासनाने नियम व कायदा तपासून श्री. सचिन चवाथे यांना जनसंपर्क अधिकारी या पदावर हजर करून घेण्यासाठी योग्य ती कार्यवाही करणेबाबत ठराव पारित केला आहे. सदर ठराव पारित करून देखीलही महानगरपालिका प्रशासन सदर ठरावाच्या अनुषंगाने कार्यवाही करत नसून व श्री. सचिन चवाथे यांना नियुक्तीचे आदेश देत नसल्यामुळे श्री. सचिन चवाथे यांना मा. उच्च न्यायालयात संदर्भिय याचिका दाखल केली आहे.

संदर्भिय याचिका दि.15/11/2019 रोजी मा. उच्च न्यायालय यांच्या समोर सुनावणीला आली असता मा. न्यायालयाने खालीलप्रमाणे आदेश पारित केले आहे. :-

1. दि.11/08/2016 रोजी स्थायी समिती-अपीलीय प्राधिकरण यांनी पारित केलेला ठराव रद्द करण्यात येत आहे आणि सदरचे प्रकरण स्थायी समितीकडे याचिकेदार यांच्या अपीलावर कायद्याच्या तरतूदीच्या अनुषंगाने पुन:श्च नव्याने निर्णय घेण्याकरिता वर्ग करण्यात येत आहे. सदरचा निर्णय हा स्थायी समितीने सदर आदेश पारित झाल्यापासून 3 महिन्याच्या आत घेण्यात यावा.

2. येथे स्पष्ट करण्यात येत आहे की, मा. न्यायालयाने रिट याचिकेमधील मेरीट्समध्ये न जाता याचिकेमधील दोन्ही पक्षकार यांचे मुद्दे व अधिकार खुले ठेवण्यात आलेले आहे. वरीलप्रमाणे निर्णय देऊन मा. उच्च न्यायालयाने सदरची याचिका निकाली काढलेली आहे.

तरी मा. उच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशानुसार याचिकादार यांच्या अपिलावर कायद्याच्या तरतूदीच्या अनुषंगाने पुन:श्च नव्याने निर्णय घेण्याकरिता वर्ग करण्यात येत आहे. सदरचा निर्णय हा स्थायी समितीने सदर आदेश पारित झाल्यापासून 3 महिन्याच्या आत घेण्यात यावा ही विनंती.

(मा.आयुक्त यांचे मान्यतेने)

(डॉ. सुनिल लहाने)
अतिरिक्त आयुक्त
मिरा भाईंदर महानगरपालिका

# मिरा भाईंदर महानगरपालिका

**मा. महासभा दि. २०/४/२०११**

**// गोषवारा //**

**प्रकरण क्र. ११ :- मिरारोड रुग्णालयासाठी सरळ सेवेने नियुक्त केलेल्या वैद्यकिय अधिकारी यांना मान्यता देणे.**

महानगरपालिकेच्या आस्थापनेवर दि. ३१ ऑक्टोबर २००२ अन्वये तसेच शासन निर्णय क्रमांक मिभापा-११०८/१७०२/प्र.क्र.८७/०९/नवि-२८, दि. १३ ऑगस्ट २००९ अन्वये प्रशासकीय व आरोग्य विभागासाठी पदमंजुरीस मान्यता दिलेली होती. पैकी पुढील रिक्त पदे भरण्याची कार्यवाही पूर्ण केली.

**आरोग्य सेवा**

| अ.क्र. | पदनाम | संख्या | वेतनश्रेणी |
|---|---|---|---|
| १. | वैद्यकिय आरोग्य अधिकारी | १ | १०६५०-३२५-१५८५० |
| २. | वैद्यकिय अधिक्षक वर्ग- | १ | १००००-३२५-१५२०० |
| ३. | वैद्यकिय अधिकारी (शस्त्रक्रिया) वर्ग-२ | १ | ८०००-२७५-१३५०० |
| ४. | बधिरीकरण शास्त्रज्ञ वर्ग -२ | १ | ८०००-२७५-१३५०० |
| ५. | वैद्यकिय अधिकारी (भिषक) वर्ग-२ | १ | ८०००-२७५-१३५०० |
| ६. | वैद्यकिय अधिकारी (बालरोग) वर्ग-२ | १ | ८०००-२७५-१३५०० |

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील वैद्यकिय आरोग्य सेवा मधील निरनिराळया संवर्गातील रिक्त पदे सरळसेवेने भरण्यासाठी दि. २७/०८/२००९, दि. ०४/०९/२०१० रोजी थेट मुलाखतीद्वारे निवडप्रक्रिया करुन पात्र उमेदवारांची निवड करुन त्यांना नियुक्ती दिली आहे.

महानगरपालिका आस्थापनेवरील वैद्यकिय आरोग्य सेवेतील वैद्यकिय अधिकारी पदे सरळसेवा निवड प्रक्रियेद्वारे उपलब्ध न झाल्याने महापालिकेने दि. २२/०२/२०११ रोजी थेट मुलाखतीद्वारे निवड प्रक्रिया करुन मा. निवड समितीने खालील वैद्यकिय अधिकारी यांची गुणानुक्रमे निवड केली आहे.

**आरोग्य सेवा (सरळसेवा) नेमणुक दि. २२/०३/२०११**

| अ. क्र. | कर्मचाऱ्यांचे नांव | हुद्दा | जातीचा प्रवर्ग | वेतनश्रेणी |
|---|---|---|---|---|
| १. | डॉ. प्रकाश ह. जाधव | वैद्यकिय अधिकारी (भिषक) | खुला | १५६००-३९१०० (ग्रेड वेतन ५४००) |
| २. | डॉ. श्वेता छावछरीया (वाघ) | बधिरीकरण शास्त्रज्ञ (श्रेणी अ) | खुला | १५६००-३९१०० (ग्रेड वेतन ५४००) |
| ३. | डॉ. साजिद इकबाल मुसानी | वैद्यकिय अधिकारी (बालरोग) | खुला | १५६००-३९१०० (ग्रेड वेतन ५४००) |
| ४. | श्री. फुलझेले मकरंद सिताराम | वैद्यकिय अधिकारी (शस्त्रक्रिया) | खुला | १५६००-३९१०० (ग्रेड वेतन ५४००) |

सत्यप्रत

(... शिरवळकर)
नगरसचिव
मिरा भाईंदर महानगरपालिका

महानगरपालिकेच्या आस्थापनेवर मंजुर प्रशासकीय विभागाअंतर्गत **"जनसंपर्क अधिकारी"** हे पद दि. २७/०८/२००९ रोजी वृत्तपत्रात जाहिरात देवून जाहिराती नुसार प्राप्त अर्जदारांची स्पर्धात्मक परिक्षेद्वारा परिक्षा घेवून परिक्षेत गुणानुक्रमे उर्त्तिर्ण उमेदवारांची मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५४ (१) अन्वये गठित निवड समितीद्वारे पुढील अधिकाऱ्याची **"जनसंपर्क अधिकारी"** पदावर निवड केली.

**प्रशासकीय सेवा (सरळसेवा) नेमणुक दि. २४/०१/२०११**

| अ. क्र. | कर्मचाऱ्यांचे नांव | हुद्दा | जातीचा प्रवर्ग | वेतनश्रेणी |
|---|---|---|---|---|
| ५. | श्री. सचिन सुधाकर चवाथे | जनसंपर्क अधिकारी | खुला | ९३००-३४८०० (ग्रेड वेतन ४४००) |

सद्यस्थितीत वरीलप्रमाणे थेट भरती प्रक्रिया पूर्ण करुन १) वैद्यकिय आरोग्य अधिकारी वर्ग-१ व वैद्यकिय अधिक्षक वर्ग-१ ही पदे पात्र उमेदवार उपलब्ध न झाल्याने रिक्त आहेत.

तरी वरीलप्रमाणे स्पर्धात्मक निवड प्रक्रियेद्वारा गुणानुक्रमे उत्तीर्ण उमेदवारांची मा. निवड समितीने तोंडी मुलाखतीद्वारे निवड करुन निवड झालेल्या उमेदवारांना प्रशासकीय सोयीसाठी हजर करुन मुंबई प्रांतीक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५३ (३) नुसार तात्पुरती नेमणूक आदेश दिलेले आहेत. नेमणूकी बाबत माहिती मा. महासभेच्या अवलोकनार्थ सादर करीत आहे.

सत्यप्रत

आयुक्त
मिरा भाईंदर महानगरपालिका.



D:\Aastapana Vibhag\GOSHWARA\GOSHWARA-Arogya.doc

# मिरा भाईंदर महानगरपालिका

३१

मा. महासभा दि. २०/०४/२०११

**प्रकरण क्रं. ११ :- मिरारोड रूग्णालयासाठी सरळ सेवेने नियुक्त केलेल्या वैद्यकिय अधिकारी यांना मान्यता देणे.**

**ठराव क्र. १२ :-**

महानगरपालिकेच्या आस्थापनेवर दि. ३१ ऑक्टोबर २००२ अन्वये तसेच शासन निर्णय क्रमांक मिभापा-११०८/१७०२/प्र.क्र.८७/०९/नवि-२८, दि. १३ ऑगस्ट २००९ अन्वये प्रशासकिय व आरोग्य विभागासाठी पदमंजुरीस मान्यता दिलेली होती. पैकी पुढील रिक्त पदे भरण्यासाठी दि. २२/०२/२०११ रोजी वैद्यकिय आरोग्य सेवे अंतर्गत वृत्तपत्रात जाहिरात देण्यात आली होती. आणि तेथून थेट मुलाखतीव्दारे निवड प्रक्रिया करून मा. निवड समितीने खालील वैद्यकिय अधिकारी यांची गुणानुक्रमे निवड केली आहे.

**<u>आरोग्य सेवा (सरळसेवा) नेमणुक दि. २२/०३/२०११</u>**

| अ. क्र. | कर्मचाऱ्यांचे नांव | हुद्दा | जातीचा प्रवर्ग | वेतनश्रेणी |
|---|---|---|---|---|
| १) | डॉ. प्रकाश ह. जाधव | वैद्यकिय अधिकारी (भिषक) | खुला | १५६००-३९१०० (ग्रेड वेतन ५४००) |
| २) | डॉ. श्वेता छावछरीया (वाघ) | बधिरीकरण शास्त्रज्ञ (श्रेणी अ) | खुला | १५६००-३९१०० (ग्रेड वेतन ५४००) |
| ३) | डॉ. साजिद इकबाल मुसानी | वैद्यकिय अधिकारी (बालरोग) | खुला | १५६००-३९१०० (ग्रेड वेतन ५४००) |
| ४) | श्री. फुलझेले मकरंद सिताराम | वैद्यकिय अधिकारी ( शस्त्रक्रिया) | खुला | १५६००-३९१०० (ग्रेड वेतन ५४००) |

वरील वैद्यकिय अधिकाऱ्यांस हि मा. महासभा मान्यता देत आहे.

तसेच महानगरपालिकेच्या आस्थापनेवर मंजुर प्रशासकिय विभागाअंतर्गत "जनसंपर्क अधिकारी" हे पद दि. २७/०८/२००९ रोजी वृत्तपत्रात जाहिरात देवून जाहिरातीनुसार प्राप्त अर्जांची छाननी करून छाननीत पात्र उमेदवारांची स्पर्धात्मक परिक्षेद्वारे लेखी परिक्षा घेवून परिक्षेत गुणानुक्रमे उत्तीर्ण उमेदवारांची मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५४(१) अन्वये गठित निवड समितीद्वारे तोंडी मुलाखती घेवून लेखी व तोंडी परिक्षेच्या गुणांची सरासरी पाहता गुणानुक्रमे "जनसंपर्क अधिकारी" पदावर श्री. सचिन सुधाकर चवाथे यांची निवड झाली. परंतु सध्य स्थितीत मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे हे प्रकरण न्यायप्रविष्ठ असल्याने न्यायालयाच्या निर्णयाच्या अधिन राहून ही सभा श्री. सचिन चवाथे यांना मान्यता देत आहे. आणि त्यानंतर त्यांचा प्रस्ताव मा. महासभेच्या मान्यतेस्तव सादर करण्यात यावा असा मी ठराव मांडत आहे.

**सुचक :- प्रभात पाटील**

**अनुमोदन :- मिलन पाटील**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

सत्यप्रत

(वासुदेव शिरवळकर)
नगरसचिव
मिरा भाईंदर महानगरपालिका

**नरेंद्र मेहता :-**

महापौर साहेब, विषयच पूर्ण बदलतो. अस नाही की एक शब्द चुकला आहे. ह्याच्याच स्पष्ट म्हटल आहे की निवड करून निवड झालेल्या उमेदवार प्रशासकिय सोयीसाठी हजर करून मुंबई प्रांतिक अधिनियम १९४९ चे कलम ५३ तात्पुरती नेमणूक आदेश दिलेले आहेत. नेमणुकीबाबत माहिती मा. महासभेत अवलोकन करीता ह्याच्यात मान्यतेविषयी विषय कुठे आहे. आणि मान्यतेसाठी पुढच्या महासभेत ठराव मांडा. विषयाचा मुळ बदल होतो. पुढच्या वेळी घ्याना हरकत नाही. सभाशास्त्र कामकाजाच्या नियमाप्रमाणे आपण पुढच्या वेळेला घ्या. अवलोकन आम्ही केलेले आहे. पुढच्या वेळेला हा विषय पुन्हा आणा आमची काही हरकत नाही. पण कामकाज नियमाप्रमाणे चालू द्या.

**जयंत पाटील (मा. उपमहापौर) :-**

आपला त्या शब्दालाच विरोध आहे.

**नरेंद्र मेहता :-**

शब्दाला विरोध नाही. एक तर माहितीसाठी आणि त्याच्यावर निर्णय द्यायचा आहे. दोघामध्ये फरक आहे.

**मिलन म्हात्रे :-**

विषयपत्रिकेमध्ये जे विषय आहेत. विषयामध्ये मान्यता लिहिलेली आहे. म्हणजे त्या संपूर्ण गोषवाऱ्यामध्ये शेवटला तुमची मान्यता हवीच ना. विषय तुमचा मान्यतेचा आहे. आणि खाली तुम्ही अवलोकन बोलता. अवलोकनाचा अर्थ असा आहे की, आयुक्तानी सगळ केलेले आहे. तुमच्या माहिती करीता आहे.

**जयंत पाटील (मा. उपमहापौर) :-**

महासभेच्या मंजुरीसाठी आहे.

**नरेंद्र मेहता :-**

उपमहापौर साहेब, आम्ही जी तयारी केली ती अवलोकनासाठी केली होती. तुम्हाला जर मान्यता पाहिजे तर तो विषयच चेंज झाला तो विषय तुम्ही पुढच्या मिटींगमध्ये रितसर घ्या. हेडींग एखादे चुकू शकते. परंतु इथे स्पष्ट म्हटल आहे. की माहितीसाठी आपण महासभेपुढे अवलोकनार्थ...........

**मिलन म्हात्रे :-**

ह्या पगाराला आपण मंजुरी द्यायची नाही का? त्याच्यामध्येच रकमा आल्या, ती नियुक्ती, त्यांचे पगार, होणारे खर्च, बजेट मधली तरतुदीना सभागृहाची मंजूरी द्यायची नाही का? की ती पण टाईपिंग मिस्टेक झाली. आणि आता हे शेवटचे जे आहे. पी.आर. ओ. त्या बद्दल जी कमीटी आहे. ह्या कमिटीने त्यांना ज्या-ज्या वेळेला मुलाखतीला बोलवल त्यावेळेला बरेचशा कागदपत्रावर दुर्लक्ष केले आहे. मा. महापौर साहेब, हे जे सर्टिफिकेट आहे ते पटना महाविद्यालयाचे आहे. आपल्याकडे रेशनिंग कार्ड काढायला गेलो. आणि एखादी व्यक्ती यु.पीची असेल तर तिकडचा दाखला ती लोक मागवतात. आणि तो दाखला मागवल्यानंतर तो दाखला पुन्हा व्हेरिफिकेशनसाठी जातो.

**जयंत पाटील (मा. उपमहापौर) :-**

विषयामध्ये मान्यतेसाठी दिलेले आहे.

**नरेंद्र मेहता :-**

महापौर साहेब एक दुरूस्ती करतो. आपण शेवटला स्पष्ट म्हटले आहे की, तात्पुरत्या नेमणुका केलेल्या आहेत आणि ते माहितीसाठी, आणि अवलोकनासाठी सभेपुढे सादर. मग तात्पुरत्या ज्या नेमणुका आहेत त्यासाठी तुम्ही माहिती सादर केलेली आहे. आता तुम्ही जे मागता त्यांना कायम स्वरूपी मान्यता द्यायची आहे. तर तुम्ही तात्पुरतीला मान्यता देणार की कायम स्वरूपीला मान्यता देणार. विषयात केवढा मोठा बदल होतोय सचिव साहेब, पूर्ण विषयच बदलतो. कारण एखादा ठराव करायचा असेल तर तात्पुरत्याला मान्यता द्यायला लागेल.

**मा. महापौर :-**

ठरावाप्रमाणे बदल करण्यात येईल.

**नरेंद्र मेहता :-**

ठरावाप्रमाणे बदल करता येत नाही.

**मिलन म्हात्रे :-**

विषयाप्रमाणे ठराव होतो.

**नरेंद्र मेहता :-**

आम्हाला कुठला विषय दिला आहे.

**मिलन म्हात्रे :-**

तो विषय आणि गोषवारा त्याप्रमाणे ठराव होतो.

सत्यप्रत

(वासुदेव शिरवळकर)
नगरसचिव
मिरा भाईंदर महानगरपालिका

**नरेंद्र मेहता :-**

नेमणूक माहितीसाठी अवलोकन करीता. तुम्हाला ठराव करायचा असेल तर तात्पुरतासाठी करता येईल. तुम्हाला आता कायम स्वरूपी ठराव करायचा आहे.

**जयंत पाटील (मा. उपमहापौर) :-**

आपला जो विषय आहे, मिरारोड रूग्णालयासाठी सरळ सेवेने नियुक्त केलेल्या वैद्यकिय अधिकारी यांना मान्यता देणे. त्यांना मान्यता द्यायची आहे. महासभेने अवलोकनार्थ हा शब्द आहे तो शब्द आपण काढून टाकू.

**नरेंद्र मेहता :-**

अवलोकन जरी काढले ना तरी त्याच्या पुढे काय म्हटल आहे आम्ही तात्पुरती नेमणूक केलेली आहे ती माहितीसाठी. तुम्हाला मान्य करायच आहे तर ती तात्पुरत्या नेमणूकाना की परमनन्ट नेमणुकीला द्यायची आहे.

**जयंत पाटील (मा. उपमहापौर) :-**

५३ खाली तुम्हाला परवानगी लागेल ना.

**नरेंद्र मेहता :-**

परमनन्टसाठी तुम्हाला मान्यता द्यायची आहे ना. अवलोकनार्थ हा शब्द जरी काढला तरी तात्पुरत्या नेमणूक केलेल्या महासभेला माहितीसाठी अवलोकन सादर केलेल आहे.

**जयंत पाटील (मा. उपमहापौर) :-**

मान्यतेसाठी.

**नरेंद्र मेहता :-**

ठिक आहे. तात्पुरती नेमणुक ना.

**जयंत पाटील (मा. उपमहापौर) :-**

आपण ॲड देऊन जाहिरात देऊन.

**नरेंद्र मेहता :-**

गोषवाऱ्यामध्ये म्हटलेले आहे की तात्पुरती नेमणूक केलेली आहे. मी अवलोकन शब्द काढून टाकतो. समजा मान्यता म्हटले तरी त्या तात्पुरती नेमणूक की परमनन्टला................

**मिलन म्हात्रे :-**

आयुक्त साहेब, आतापर्यंत जी होती ती तात्पुरती स्वरूपाची होती. या महासभेची मान्यता झाल्यावर ती कायम होईल असा त्याचा अर्थ आहे का?

**नरेंद्र मेहता :-**

पूर्ण विषयच चेंज होतो.

**मा. आयुक्त :-**

मा. महापौर साहेब, महापालिकेत ६ महिन्याचा कालावधी संपल्यानंतर महापालिकेच्या मंजुरी वाचून अशा कोणत्याही नेमणूकीचे नवीकरण करता येणार नाही. म्हणजे ६ महिन्यासाठी नेमायचे आणि त्यानंतर कायम करायचे.............

**मिलन म्हात्रे :-**

मी जे बोलतो तेच आहे.

**नरेंद्र मेहता :-**

तुम्ही तात्पुरता केला ठिक आहे. तुम्हाला एखादा परमनन्टसाठी विषय द्या की, कायम करण्यासाठी मान्यता मिळावी. तुम्ही कुठेच म्हटले नाही.

**मा. आयुक्त :-**

प्रत्येकाच्या नेमणुकी.................

**नरेंद्र मेहता :-**

तुम्ही वेगळ बोलता साहेब.

**मा. आयुक्त :-**

प्रत्येक नेमणुकी कायम करण्यापूर्वी वर्ष किंवा ६ महिन्याची असते. कायम करायला परत ठराव येतो.

**नरेंद्र मेहता :-**

मग कायम करायला परत ठराव येईल का?

**मा. महापौर :-**

पुन्हा ठराव येणार.

**मा. आयुक्त :-**

त्यांच्या कामाची तपासणी करून तो चांगला असेल तर कायम करा. आणि कामात चांगला नसेल तर काढून टाका.



सत्यप्रत
(वासुदेव शिरवळकर)
नगरसचिव
मिरा भाईंदर महानगरपालिका

**नरेंद्र मेहता :-**

किती दिवसांनी, किती महिन्यांनी.

**मा. आयुक्त :-**

सहा महिन्यानंतर येत.

**नरेंद्र मेहता :-**

सहा महिन्यानंतर म्हणजे तात्पुरत्या नेमणूकीला मान्यता द्यायची आहे.

**मिलन म्हात्रे :-**

महापौर साहेब, त्याच्या खालील जो पी.आर.ओ चा विषय आहे. त्यामध्ये आस्थापनेची कागदपत्रे माझ्याकडे आहे. आपली जी सिलेक्शन कमिटी आहे तर त्या कॅन्डीडेटनी त्यावेळेची आपआपली कागदपत्रे त्या सिलेक्शन कमिटीला सादर केलेली नाहीत. आपल्या महानगरपालिकेच्या आस्थापनेच्या रेकॉर्डला त्या कागदपत्राची नोंद नाही. आणि हे जे पटना विद्यालयाचे सर्टिफिकेट आहे. आपण शिद्यापत्रिकेकडे अर्ज केला तर तिकडचा अधिकारी सांगतो तुमचे व्हेरिफाय करून पाठवा. तर हे सर्टिफिकेट वैद्य आहे की अवैध आहे. कारण आपल्याकडे ज्या युनिव्हर्ससिटी आहेत. त्याच्यात एक मोठा शिक्का येतो. त्या प्रकारचा कुठलाही शिक्का ह्याच्यावर दिसत नाही. तुमच्या माहितीसाठी हा सेट पाठवून देतो. त्याचे आपण व्हेरिफिकेशन करावे आणि मग हा विषय घ्यावा.

**नरेंद्र मेहता :-**

आयुक्त साहेब, ह्या कमिटी अहवालाचे आपण निवड समितीने निवड केलेली आहे. निवड समितीमध्ये हेड ऑफ द डिपार्टमेन्ट असणे गरजेचे आहे. ह्या डिपार्टमेन्टमध्ये आपल्याकडे कोण आहेत ज्या विभागाशी संबंधीत असेल त्या विभागाचा एच.ओ.डी त्या कमिटीमध्ये असला पाहिजे.

**मा. आयुक्त :-**

डॉक्टरांची नेमणूक सिव्हिल सर्जनने होते ना. सिव्हील सर्जन जिल्हा परिषद डी.एच.ओ.

**नरेंद्र मेहता :-**

साहेब, महापालिकेच्या कमिटीमध्ये एच.ओ.डी. असला पाहिजे.

**मा. आयुक्त :-**

कमिटीमध्ये आहेत.

**नरेंद्र मेहता :-**

एच.ओ.डी. कोण होते.

**मा. आयुक्त :-**

पानपट्टे होते.

**नरेंद्र मेहता :-**

पानपट्टे हेड ऑफ द डिपार्टमेन्ट नाही.

**मा. आयुक्त :-**

आरोग्य विभाग त्यांच्याकडे दिला आहे. परंतु तज्ञ लोकांना इन्टव्ह्युसाठी बाहेरून बोलावले होते.

**नरेंद्र मेहता :-**

महापौर साहेब, हेड ऑफ द डिपार्टमेन्ट आपल्याकडे डॉ. चकोर किंवा डॉ. लहाने जे कोणी असेल ते आगोदर त्या कमिटीत समावेश असतो. त्यांना कमिटीत घेतलच नाही.

**मा. आयुक्त :-**

लहाने होते ना.

**नरेंद्र मेहता :-**

त्यांच ओपिनियन आहे का.

**मा. आयुक्त :-**

आहे ना. ते सोडून सिव्हिल सर्जन डी.एच.ओ.ला अपोईन्ट केल.

**नरेंद्र मेहता :-**

एच.ओ.डी. होते ना.

**प्रभात पाटील :-**

महानगरपालिकेच्या आस्थापनेवर दि. ३१ ऑक्टोबर २००२ अन्वये तसेच शासन निर्णय क्रमांक मिभापा-११०८/१७०२/प्र.क्र.८७/०९/नवि-२८, दि. १३ ऑगस्ट २००९ अन्वये प्रशासकिय व आरोग्य विभागासाठी पदमंजुरीस मान्यता दिलेली होती. पैकी पुढील रिक्त पदे भरण्यासाठी दि. २२/०२/२०११ रोजी वैद्यकिय आरोग्य सेवे अंतर्गत वृत्तपत्रात जाहिरात देण्यात आली होती. आणि तेथून थेट मुलाखतीव्दारे निवड प्रक्रिया करून मा. निवड समितीने खालील वैद्यकिय अधिकारी यांची गुणानुक्रमे निवड केली आहे.

<u>**आरोग्य सेवा (सरळसेवा) नेमणुक दि. २२/०३/२०११**</u>

सत्यप्रत

(वासुदेव शिरवळकर)
नगरसचिव
मिरा भाईंदर महानगरपालिका

| अ.क्र. | कर्मचाऱ्यांचे नांव | हुद्दा | जातीचा प्रवर्ग | वेतनश्रेणी |
|---|---|---|---|---|
| १) | डॉ. प्रकाश ह. जाधव | वैद्यकिय अधिकारी (भिषक) | खुला | १५६००-३९१०० (ग्रेड वेतन ५४००) |
| २) | डॉ. श्वेता छावछरीया (वाघ) | बधिरीकरण शास्त्रज्ञ (श्रेणी अ) | खुला | १५६००-३९१०० (ग्रेड वेतन ५४००) |
| ३) | डॉ. साजिद इकबाल मुसानी | वैद्यकिय अधिकारी (बालरोग) | खुला | १५६००-३९१०० (ग्रेड वेतन ५४००) |
| ४) | श्री. फुलझेले मकरंद सिताराम | वैद्यकिय अधिकारी ( शस्त्रक्रिया) | खुला | १५६००-३९१०० (ग्रेड वेतन ५४००) |

वरील वैद्यकिय अधिकाऱ्यांस हि मा. महासभा मान्यता देत आहे.

तसेच महानगरपालिकेच्या आस्थापनेवर मंजुर प्रशासकिय विभागाअंतर्गत "जनसंपर्क अधिकारी" हे पद दि. २७/०८/२००९ रोजी वृत्तपत्रात जाहिरात देवून जाहिरातीनुसार प्राप्त अर्जांची छाननी करून छाननीत पात्र उमेदवारांची स्पर्धात्मक परिक्षेद्वारे लेखी परिक्षा घेवून परिक्षेत गुणानुक्रमे उत्तीर्ण उमेदवारांची मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५४(१) अन्वये गठित निवड समितीद्वारे तोंडी मुलाखती घेवून लेखी व तोंडी परिक्षेच्या गुणांची सरासरी पाहता गुणानुक्रमे "जनसंपर्क अधिकारी" पदावर श्री. सचिन सुधाकर चवाथे यांची निवड झाली. परंतु सध्य स्थितीत मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे हे प्रकरण न्यायप्रविष्ठ असल्याने न्यायालयाच्या निर्णयाच्या अधिन राहून ही सभा श्री. सचिन चवाथे यांना मान्यता देत आहे. आणि त्यानंतर त्यांचा प्रस्ताव मा. महासभेच्या मान्यतेस्तव सादर करण्यात यावा असा मी ठराव मांडत आहे.

**मिलन पाटील :-**

ठरावाला माझे अनुमोदन आहे.

**मिलन म्हात्रे :-**

त्या सर्टिफिकेटचे काय झाले. ते ठरावामध्ये अंतर्भूत नाही. ज्या सर्टिफिकेटबद्दल सुचना केली.

**भगवती शर्मा :-**

न्यायालयीनके अधिन रहकर मान्यता देनेके बाद फेर सादर नही किया।

**मिलन म्हात्रे :-**

त्या सर्टिफिकेटच काय झाल. कारण तुमच्या रेकॉर्ड वरती काहीच नाही.

**मा. आयुक्त :-**

तपासणीसाठी दिल आहे.

**मिलन म्हात्रे :-**

साहेब, हा कोर्स पूर्ण करण्यासाठी विद्यार्थ्यांनी आपल्याकडे किती दिवस रजा घेतली होती. पटण्याला जाऊन शिकायला वेळ तर लागला असेल ना?

**गोविंद परब :-**

आपल्याकडे कामाला लागण्यापूर्वीच त्यांनी कोर्स पूर्ण केलेला आहे.

**मिलन म्हात्रे :-**

तुमच्याकडे सर्टिफिकेटची नोंद का नाही.

**गोविंद परब :-**

सर ते रखवालदार असल्यामुळे आपण सर्व शैक्षणिक पात्रतेची नोंद घेतली नाही.

**मिलन म्हात्रे :-**

क्वॉलीफिकेशन सगळ दिले पाहिजे.

**गोविंद परब :-**

कर्मचाऱ्याला आपण ज्या पदावर नेमतो त्यांचीच नोंद घेतो. जर तो जास्त शिकलेला असेल तर नोंद घेत नाही.

**मिलन म्हात्रे :-**

का नाही घेत.

**गोविंद परब :-**

त्यांनी तशी मागणी केली नाही.

**मिलन म्हात्रे :-**

मागणी केल्याचा प्रश्न नाही. त्यांच्याकडे क्वॉलीफिकेशन काय आहे.

**गोविंद परब :-**

ज्या पदासाठी निवड झाली त्याच पदासाठी........

सत्यप्रत

(वासुदेव ... ळकर)
नगरसचिव
मिरा भाईंदर महानगरपालिका

**मिलन म्हात्रे :-**

तुमचा क्लॉज काय असतो शैक्षणिक पात्रतेत सगळ आल. शैक्षणिक पात्रतेचा अर्थ काय? त्या माणसाने नोकरीला लागतेवेळी त्याच्याकडे असलेली सगळी शैक्षणिक पात्रता म्हणजे माझ्याकडे सर्टिफिकेट असताना सुध्दा सादर करायची नाही. त्या पोस्टवर मी पहिली नोकरी मिळवायची, त्याच्यांनतर दुसरी सर्टिफिकेट दाखवायची आणि तिसऱ्या नोकरीवर क्लेम करायचा.

**मा. महापौर :-**

प्रकरण ११ चा ठराव सर्वांनुमते मंजूर झालेला आहे.

**मिलन म्हात्रे :-**

तुम्ही हे सर्टिफिकेट दाखवता त्याच्यावर युनिव्हर्सिटीचा राऊंड सिल वैगेरे काहीच नाही. फक्ट लेटर हेड आहे. ह्याची व्हॅलिडीटी काय आहे ते सांगा. आपण ज्या जोरावर ठराव पास केला. त्याच्यामध्ये अनुमती दिली. त्याच्यामध्ये गर्व्हमेन्टचे युनिव्हर्सिटीचा कुठले सर्टिफिकेट लोगो वैगेरे काही नाही. प्लेन लेटर हेड कम्प्युटरवर बनवल्यासारख वाटते. बॉम्बे युनिव्हरसिटीचा लोगो आहे. ह्याच्याच काहीच नाही. हाताने तुम्ही बनविलेले आहे. साहेब, तुम्ही एन.ओ.सी. देता. तुमचे राऊन्ड सिल असते की, नाही?

**मा. आयुक्त :-**

ग्रॅज्युएशनच्या सर्टिफिकेटवर एम्बॉस केलेले असते. ते कागदावरून शाईचे किंवा याचे नसते. ते एम्बॉर्समेंट तुम्हाला खाली जाऊन दाखवतो.

**मिलन म्हात्रे :-**

साहेब, त्या सेटमध्ये बघा. मॅट्रीकची परिक्षा पास झाला. त्याच्यामध्ये तो वॉटर लोगो आला आहे.

**मा. आयुक्त :-**

तुम्हाला ओरिजनल दाखवतो.

**मिलन म्हात्रे :-**

मुंबई युनिव्हर्सिटीचा वॉटर लोगो झेरॉक्समध्ये सुध्दा आला आहे. साहेब, ती तपासणी व्यवस्थित करा. बाकी आमचे काही म्हणणे नाही.

**प्रेमनाथ पाटील :-**

मा. महापौर साहेब, आपल्या परवानगीने बोलतो. पटना युनिव्हर्सिटीची माझ्याकडे एक कॉपी आहे. सचिव सुधाकर चवाथे नामक किसी व्यक्तीने पटना कॉलेज मे बॅचलर ऑफ मास कम्युनिकेशन हॉनर कोर्स मे अब तक नामांकन नही किया है। हे तिकडचे उत्तर आहे.

**जुबेर इनामदार :-**

साहेब, हा विषय न्यायप्रविष्ठ आहे. न्यायालयात याची अजून सुनावणी झालेली नाही. ती झाल्यानंतर त्याला अधिन राहूनच त्याचा निर्णय घेणार. ठरावामध्ये तसेच घेतले आहे.

**मिलन म्हात्रे :-**

याच्यामध्ये ह्या दोन सर्टिफिकेट आहेत. इथे या पटना युनिव्हर्सिटीचा लोगो आहे. आणि हे व्यवस्थित लेटरहेड आहे. आणि तेच याचे इकडचे कम्प्युटरचे बनलेले आहे. हे दोन पेपर्स तुमच्यासमोर ठेवतो. म्हणून सांगतो की, परफेक्ट व्हेरिफिकेशन करा.

**जयंत पाटील (मा. उपमहापौर) :-**

मला एक सांगा, ते सर्टिफिकेट तुम्हाला संशयास्पद वाटतात का?

**मिलन म्हात्रे :-**

हे काय, समोर आहेत.

**जयंत पाटील (मा. उपमहापौर) :-**

प्रकरण कोर्टामध्ये आहे.

**मिलन म्हात्रे :-**

या विषयामध्ये हे पेन्डींग ठेवा असे माझे मत आहे. तुम्ही व्हेरिफिकेशन करा आणि हा विषय परत आणा. एक तर हा कोर्ट मॅटर आहे.

**मा.महापौर :-**

कोर्टाचा निर्णय बघून ते घ्यायचे आहे.

**मिलन म्हात्रे :-**

आत्ता तुम्ही ठराव केला तर तो कोर्टाला लागणार नाही का? त्याचे एक्झीबीट कोर्टाला लागणार नाही?

**जयंत पाटील (मा. उपमहापौर) :-**

जाऊ द्या ना. आपण न्यायालयाच्या निर्णयाच्या अधिन राहून म्हणतो आहे.

**मिलन म्हात्रे :-**

मला एक सांगा ही सर्टिफिकेट मी तुमच्यासमोर दिली. तफावत आहे. एकिकडे त्याचा लोगो, ओरिजनल लेटरहेड आम्ही दाखवतो आहे.



सत्यप्रत

(वासुदेव शिरवळकर)
नगरसचिव
मिरा भाईंदर महानगरपालिका

**जयंत पाटील (मा. उपमहापौर) :-**

मला एक सांगा, ही सर्टिफिकेट मी तुमच्यासमोर दिली. तफावत आहे. एकिकडे त्याचा लोगो, ओरिजनल लेटरहेड आम्ही दाखवतो आहे.

**जयंत पाटील (मा. उपमहापौर) :-**

मला मान्य आहे की, तुमच्या म्हणण्याप्रमाणे ते बनावट असेलही. परंतु न्यायालयाच्या निर्णयाच्या अधिन राहून......

**मिलन म्हात्रे :-**

न्यायालयाच्या निर्णयाच्या अधिन राहून करा कशाला? तुम्ही ते प्रकरण स्थगित ठेवा. न्यायालयाच्या निकाल आल्यावर त्याला कामावर घ्या.

**जयंत पाटील (मा. उपमहापौर) :-**

न्यायालयात त्यांच्या विरोधात कोण गेले आहेत ते सिध्द करतील की, हे खोटे आहे.

**मिलन म्हात्रे :-**

पण आपल्याला हा विषय घ्यायची घाई कशाला? मी ते म्हणतो.

**जयंत पाटील (मा. उपमहापौर) :-**

काही घाई नाही.

**मिलन म्हात्रे :-**

मग तो पेंडींग ठेवा.

**प्रकरण क्र. ११ :-**

मिरारोड रूग्णालयासाठी सरळ सेवेने नियुक्त केलेल्या वैद्यकिय अधिकारी यांना मान्यता देणे.

**ठराव क्र. १२ :-**

महानगरपालिकेच्या आस्थापनेवर दि. ३१ ऑक्टोबर २००२ अन्वये तसेच शासन निर्णय क्रमांक मिभापा-११०८/१७०२/प्र.क्र.८७/०९/नवि-२८, दि. १३ ऑगस्ट २००९ अन्वये प्रशासकिय व आरोग्य विभागासाठी पदमंजुरीस मान्यता दिलेली होती. पैकी पुढील रिक्त पदे भरण्यासाठी दि. २२/०२/२०११ रोजी वैद्यकिय आरोग्य सेवे अंतर्गत वृत्तपत्रात जाहिरात देण्यात आली होती. आणि तेथून थेट मुलाखतीव्दारे निवड प्रक्रिया करून मा. निवड समितीने खालील वैद्यकिय अधिकारी यांची गुणानुक्रमे निवड केली आहे.

**<u>आरोग्य सेवा (सरळसेवा) नेमणुक दि. २२/०३/२०११</u>**

| अ.क्र. | कर्मचाऱ्यांचे नांव | हुद्दा | जातीचा प्रवर्ग | वेतनश्रेणी |
|---|---|---|---|---|
| १) | डॉ. प्रकाश ह. जाधव | वैद्यकिय अधिकारी (भिषक) | खुला | १५६००-३९१०० (ग्रेड वेतन ५४००) |
| २) | डॉ. श्वेता छावछरीया (वाघ) | बधिरीकरण शास्त्रज्ञ (श्रेणी अ) | खुला | १५६००-३९१०० (ग्रेड वेतन ५४००) |
| ३) | डॉ. साजिद इकबाल मुसानी | वैद्यकिय अधिकारी (बालरोग) | खुला | १५६००-३९१०० (ग्रेड वेतन ५४००) |
| ४) | श्री. फुलझेले मकरंद सिताराम | वैद्यकिय अधिकारी ( शस्त्रक्रिया) | खुला | १५६००-३९१०० (ग्रेड वेतन ५४००) |

वरील वैद्यकिय अधिकाऱ्यांस हि मा. महासभा मान्यता देत आहे.

तसेच महानगरपालिकेच्या आस्थापनेवर मंजुर प्रशासकिय विभागाअंतर्गत "जनसंपर्क अधिकारी" हे पद दि. २७/०८/२००९ रोजी वृत्तपत्रात जाहिरात देवून जाहिरातीनुसार प्राप्त अर्जांची छाननी करून छाननीत पात्र उमेदवारांची स्पर्धात्मक परिक्षेद्वारे लेखी परिक्षा घेवून परिक्षेत गुणानुक्रमे उत्तीर्ण उमेदवारांची मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५४(१) अन्वये गठित निवड समितीद्वारे तोंडी मुलाखती घेवून लेखी व तोंडी परिक्षेच्या गुणांची सरासरी पाहता गुणानुक्रमे "जनसंपर्क अधिकारी" पदावर श्री. सचिन सुधाकर चवाथे यांची निवड झाली. परंतु सध्य स्थितीत मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे हे प्रकरण न्यायप्रविष्ठ असल्याने न्यायालयाच्या निर्णयाच्या अधिन राहून ही सभा श्री. सचिन चवाथे यांना मान्यता देत आहे. आणि त्यानंतर त्यांचा प्रस्ताव मा. महासभेच्या मान्यतेस्तव सादर करण्यात यावा असा मी ठराव मांडत आहे.

**सुचक :- सौ. प्रभात पाटील** **अनुमोदक :- श्री. मिलन पाटील**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**



सत्यप्रत
(... ...कर)
... 
मिरा भाईंदर महानगरपालिका

**नरेंद्र मेहता :-**

महापौर साहेब, विषयच पूर्ण बदलतो. अस नाही की एक शब्द चुकला आहे. ह्याच्याच स्पष्ट म्हटल आहे की निवड करून निवड झालेल्या उमेदवार प्रशासकिय सोयीसाठी हजर करून मुंबई प्रांतिक अधिनियम १९४९ चे कलम ५३ तात्पुरती नेमणूक आदेश दिलेले आहेत. नेमणुकीबाबत माहिती मा. महासभेत अवलोकन करीता ह्याच्यात मान्यतेविषयी विषय कुठे आहे. आणि मान्यतेसाठी पुढच्या महासभेत ठराव मांडा. विषयाचा मुळ बदल होतो. पुढच्या वेळी घ्याना हरकत नाही. सभाशास्त्र कामकाजाच्या नियमाप्रमाणे आपण पुढच्या वेळेला घ्या. अवलोकन आम्ही केलेले आहे. पुढच्या वेळेला हा विषय पुन्हा आणा आमची काही हरकत नाही. पण कामकाज नियमाप्रमाणे चालू द्या.

**जयंत पाटील (मा. उपमहापौर) :-**

आपला त्या शब्दालाच विरोध आहे.

**नरेंद्र मेहता :-**

शब्दाला विरोध नाही. एक तर माहितीसाठी आणि त्याच्यावर निर्णय द्यायचा आहे. दोघामध्ये फरक आहे.

**मिलन म्हात्रे :-**

विषयपत्रिकेमध्ये जे विषय आहेत. विषयामध्ये मान्यता लिहिलेली आहे. म्हणजे त्या संपूर्ण गोषवाऱ्यामध्ये शेवटला तुमची मान्यता हवीच ना. विषय तुमचा मान्यतेचा आहे. आणि खाली तुम्ही अवलोकन बोलता. अवलोकनाचा अर्थ असा आहे की, आयुक्तानी सगळ केलेले आहे. तुमच्या माहिती करीता आहे.

**जयंत पाटील (मा. उपमहापौर) :-**

महासभेच्या मंजुरीसाठी आहे.

**नरेंद्र मेहता :-**

उपमहापौर साहेब, आम्ही जी तयारी केली ती अवलोकनासाठी केली होती. तुम्हाला जर मान्यता पाहिजे तर तो विषयच चेंज झाला तो विषय तुम्ही पुढच्या मिटींगमध्ये रितसर घ्या. हेडींग एखादे चुकू शकते. परंतु इथे स्पष्ट म्हटल आहे. की माहितीसाठी आपण महासभेपुढे अवलोकनार्थ...........

**मिलन म्हात्रे :-**

ह्या पगाराला आपण मंजुरी द्यायची नाही का? त्याच्यामध्येच रकमा आल्या, ती नियुक्ती, त्यांचे पगार, होणारे खर्च, बजेट मधली तरतुदीना सभागृहाची मंजूरी द्यायची नाही का? की ती पण टाईपिंग मिस्टेक झाली. आणि आता हे शेवटचे जे आहे. पी.आर. ओ. त्या बद्दल जी कमीटी आहे. ह्या कमिटीने त्यांना ज्या-ज्या वेळेला मुलाखतीला बोलवल त्यावेळेला बरेचशा कागदपत्रावर दुर्लक्ष केले आहे. मा. महापौर साहेब, हे जे सर्टिफिकेट आहे ते पटना महाविद्यालयाचे आहे. आपल्याकडे रेशनिंग कार्ड काढायला गेलो. आणि एखादी व्यक्ती यु.पीची असेल तर तिकडचा दाखला ती लोक मागवतात. आणि तो दाखला मागवल्यानंतर तो दाखला पुन्हा व्हेरिफिकेशनसाठी जातो.

**जयंत पाटील (मा. उपमहापौर) :-**

विषयामध्ये मान्यतेसाठी दिलेले आहे.

**नरेंद्र मेहता :-**

महापौर साहेब एक दुरूस्ती करतो. आपण शेवटला स्पष्ट म्हटले आहे की, तात्पुरत्या नेमणुका केलेल्या आहेत आणि ते माहितीसाठी, आणि अवलोकनासाठी सभेपुढे सादर. मग तात्पुरत्या ज्या नेमणुका आहेत त्यासाठी तुम्ही माहिती सादर केलेली आहे. आता तुम्ही जे मागता त्यांना कायम स्वरूपी मान्यता द्यायची आहे. तर तुम्ही तात्पुरतीला मान्यता देणार की कायम स्वरूपीला मान्यता देणार. विषयात केवढा मोठा बदल होतोय सचिव साहेब, पूर्ण विषयच बदलतो. कारण एखादा ठराव करायचा असेल तर तात्पुरत्याला मान्यता द्यायला लागेल.

**मा. महापौर :-**

ठरावाप्रमाणे बदल करण्यात येईल.

**नरेंद्र मेहता :-**

ठरावाप्रमाणे बदल करता येत नाही.

**मिलन म्हात्रे :-**

विषयाप्रमाणे ठराव होतो.

**नरेंद्र मेहता :-**

आम्हाला कुठला विषय दिला आहे.

**मिलन म्हात्रे :-**

तो विषय आणि गोषवारा त्याप्रमाणे ठराव होतो.

सत्यप्रत

(वासुदेव ...वळकर)
नगरसचिव
मिरा भाईंदर महानगरपालिका

प्रकरण क्र. १०३ करिता मिरा भाईंदर महानगरपालिका
(महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम अनुसूची ड प्रकरण २ के अन्वये प्रस्ताव)

मा. स्थायी समिती दि. २१/०८/२०१४ समोर प्रशासनाचे म्हणणे

संदर्भ :- मा.सभापती, स्थायी समिती सभा यांचे पत्र क्र. मनपा/स.स्था.स./२०१४-१५-४० दि.२७/०५/२०१४.

प्रकरण क्र. :- तत्कालीन बडतर्फ करण्यात आलेले जनसंपर्क अधिकारी श्री.सचिन चवाथे यांनी मा.स्थायी समिती सभेपुढे दाखल केलेल्या अपील प्रकरणी प्रशासनाचे म्हणणे.

श्री.सचिन चवाथे यांना यापुर्वी महानगरपालिकेच्या आस्थापनेवर "जनसंपर्क अधिकारी" या पदावर स्थायी स्वरुपात सरळसेवेने, विहित निवडप्रक्रियेद्वारे दि.२४/०१/२०११ रोजी नियुक्ती केलेली होती. सदरचे अधिकारी यांचे पटणा विश्वविद्यालय, पटणा यांचेकडील "जर्नलिझम ॲन्ड मास कम्युनिकेशन" या अभ्यासक्रमाची पदवी प्रमाणपत्र पडताळणीअंती खोटी असल्याचे आढळून आल्याने तत्कालीन आयुक्तांनी श्री.सचिन चवाथे यांना दि.०२/०८/२०११ रोजीच्या आदेशान्वये सेवेतून बडतर्फ करण्यात आलेले आहे.

सदरच्या बडतर्फीच्या आदेशाच्या विरुध्द श्री.सचिन चवाथे यांनी मा.उच्च न्यायालय, मुंबई येथे याचिका (याचिका क्र.७२८०/२०११) दाखल करुन प्रकरण न्यायप्रविष्ठ केले होते. सदर प्रकरणी मा.उच्च न्यायालयाने याचिकादार यांस महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५६ (४) अन्वये अपील करण्याची तरतूद उपलब्ध असल्याने, सदरची याचिका हाताळण्यास नकार देउन दि.०९/१०/२०१३ रोजी निकाली काढलेली आहे.

या अनुषंगे याचिकादार श्री.सचिन चवाथे यांनी मा.सभापती, स्थायी समिती यांचे पुढे कामावर हजर करुन घेणे बाबत विनंती अर्ज केलेला आहे. यावर मा.सभापती, स्थायी समिती यांनी प्रशासनास याप्रकरणी दि.२७/०५/२०१४ रोजीच्या पत्रान्वये अभिप्राय अपेक्षिलेले आहे. या अनुषंगाने या प्रकरणी वस्तुस्थिती अहवाल पुढीलप्रमाणे सादर करण्यात येत आहे:-

- श्री.सचिन चवाथे यांची "रखवालदार" या पदावर स्थायी स्वरुपात दि.०६/१२/२००३ रोजी प्रथम नेमणुक केलेली होती.
- श्री.सचिन चवाथे यांना "जनसंपर्क अधिकारी" यांचे सहाय्यक म्हणुन दि.२९/०१/२००९ रोजी कार्यभार दिलेला आहे. तसेच त्यांना दि.०६/०८/२००९ ते दि.०८/०९/२०१० रोजी पर्यंत "जनसंपर्क अधिकारी" या पदाचा प्रभारी कार्यभार सोपवला होता.
- मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील "जनसंपर्क अधिकारी" व इतर प्रशासकीय पद भरतीसाठी दि. २७/०८/२००९ रोजी दै. सकाळ, दै. मुंबई लक्षद्वीप या वृत्तपत्रात जाहीरात प्रसिद्ध केली होती.
- सदरच्या जाहिरातीमध्ये "जनसंपर्क अधिकारी" या पदाकरीता पुढीलप्रमाणे शैक्षणिक पात्रता अर्हता दिलेली होती.
  - (अ) शासनमान्यता प्राप्त विद्यापीठाची कोणत्याही शाखेची पदवी किंवा समकक्ष अर्हता.
  - (ब) पत्रकारीता व जन संज्ञापन (Journalism & Mass Communication) मधील पदविका प्रमाणपत्र आवश्यक.

सत्यप्रत

(वासुदेव शिरवळकर)
नगरसचिव
मिरा भाईंदर महानगरपालिका

(क) शासकीय, निमशासकीय, स्थानिक स्वराज्य संस्थेकडील सहा.माहिती व जनसंपर्क विभागातले अनुभव. प्रत्यक्ष पत्रकारीतेचे कामाचा ३ वर्षांचा अनुभव व जनसंपर्क या क्षेत्रातील विशेष कामगिरी असल्यास प्राधान्य.

- श्री.सचिन चवाथे यांना "जनसंपर्क अधिकारी" या पदाकरीता अर्ज करणेस दि.२२/०९/२००९ रोजी ना हरकत दाखला दिलेला होता.
- श्री. सचिन चवाथे, रखवालदार या पदावर महानगरपालिका आस्थापनेवर कार्यरत असुन त्यांनी "जनसंपर्क अधिकारी" या पदासाठी जाहीरातीनुसार अर्ज केला होता.
- अर्जाची छाननी आस्थापना विभागाकडील कर्मचाऱ्यांकडून करण्यात आली असुन अर्जासोबत दाखल केलेल्या प्रमाणपत्राचे आधारे दि.३०/०१/२०१० रोजी उमेदवारांना लेखी परिक्षेसाठी टपालाने पत्रे पाठविण्यात आली.
- लेखी परिक्षा दि.२१/०२/२०१० रोजी घेण्यात आली. त्यानंतर लेखी परिक्षेचा निकाल दि.०९/०४/२०१० रोजी नोटीस बोर्डावर जाहीर करण्यात आला.
- मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम-१९४९ चे कलम ५४ (१) अन्वये गठीत निवड समितीद्वारे जनसंपर्क अधिकारी (श्रेणी-ब) पदाच्या लेखी परिक्षेस उत्तीर्ण उमेदवारांच्या दि.२४/०४/२०१० रोजी तोंडी मुलाखती घेण्यात आल्या.
- श्री. विनोद शेवंते, यांनी मा. उच्च न्यायालयात महानगरपालिके विरुद्ध श्री.सचिन चवाथे, यांचे प्रमाणपत्र शासनमान्य नाही. याबाबत दि.२४/०५/२०१० मध्ये प्रथम याचीका क्र.१३४९०/१० दाखल केली.
- अर्जदाराने दाव्यात नमुद पदावर नियुक्ती केलेली नसल्याने मा. न्यायालयाने सदरची याचिका दि.०९/०९/२०१० रोजी कोणताही निर्णय न देता प्रकरण निकाली काढले.
- दरम्यान महानगरपालिकेने जा.क्र.मनपा/आस्था/७०३/२०१०-११, दि.२४/०९/२०१० रोजी पटना विश्वविद्यालय पटना येथे श्री. सचिन चवाथे, यांनी कार्यालयास अर्जासोबत सादर केलेले शैक्षणिक पात्रतेचे "पत्रकारीता व जनसंज्ञापन" हे प्रमाणपत्र तपासणी करीता पाठविले.
- पटना विश्वविद्यालय, पटना यांचेकडील प्रमाणपत्र पडताळणीचे पत्र क्र.पी.यु.१०/२०४६, दि.२२/१२/२०१० रोजीचे दि.१०/०१/२०११ रोजी कार्यालयास टपालाने प्राप्त होऊन त्या पत्रान्वये प्रमाणपत्र सत्य असल्याबाबत कळविले आहे.
- पटना विश्वविद्यालय पटना यांचेकडील दि. २२/१२/२०१० रोजीचे दि. १०/०१/२०११ रोजी प्रमाणपत्र सत्य असल्याबाबतचे प्राप्त पत्रानुसार प्रशासनाने जा.क्र. मनपा/आस्था/११७१/२०१०-११, दि. २४/०१/२०११ अन्वये "जनसंपर्क अधिकारी" या पदावर श्री. सचिन चवाथे, यांना नियुक्ती आदेश दिले आहेत.
- श्री. सचिन चवाथे, यांना "जनसंपर्क अधिकारी" या पदाचे नियुक्ती आदेश दिल्याने दि. २५ मार्च २०११ दरम्यान त्यांच्या विरोधात मा.उच्च न्यायालय, मुंबई येथे रिट पिटीशन क्र.१८३१/२०११ अन्वये श्री. विनोद शेवंते, यांनी प्रकरण न्यायप्रविष्ठ केले.
- श्री. सचिन चवाथे, (जनसंपर्क अधिकारी) या पदावर देण्यात आलेल्या नियुक्तीस मान्यता देणेबाबत दि.२०/०४/२०११ रोजी विषय मा. महासभेमध्ये ठेवला असता मा. उच्च न्यायालयात

रिट पिटीशन क्र.१८३१/२०११ अन्वये जनसंपर्क अधिकारी हे पद न्यायप्रविष्ठ असल्याने न्यायालयाचे अंतिम निर्णयाचे अधिन राहुन मा. महासभेने ठराव क्र. १२ अन्वये मंजुरी दिली आहे.

- प्रकरण न्यायप्रविष्ठ झाल्याने महानगरपालिकेने फेर तपासणीकरीता "पत्रकारीता व जनसंज्ञापन" हे प्रमाणपत्र पटना विश्वविद्यालय पटना यांना जा.क्र.मनपा/आस्था/८२/२०११-१२, दि.२६/०४/२०११ अन्वये स्पिड पोस्टाने पाठविण्यांत आले.

- दि.२६/०४/२०११ रोजी पाठविण्यात आलेल्या दुसऱ्यांदा पत्रकारीता व जनसंज्ञापन हे प्रमाणपत्र पडताळणी करीता पाठविले असता ते योग्य असल्याचे महानगरपालिकेस जा.क्र.पीयु/६९११, दि.२०/०३/२०११ रोजीचे पत्र दि.०२/०६/२०११ रोजी टपालाने प्राप्त झाले.

- तत्पुर्वी महानगरपालिकेने जा.क्र.मनपा/आस्था/७०३/२०१०-११, दि.२४/०९/२०१० अन्वये श्री. सचिन चवाथे, (जनसंपर्क अधिकारी) यांचे प्रथम पत्रकारीता व जनसंज्ञापन पदवी प्रमाणपत्र व मार्कलिस्ट पडताळणीसाठी पाठविले होते. त्या पत्राचे पुन्हा पटना विश्वविद्यालय पटना यांचे पत्र क्र. ६७९९/परिक्षा, दि.२९/०४/२०११ रोजीचे कार्यालयास दि.१८/०५/२०११ रोजी प्राप्त आहे. सदर पत्रात महानगरपालिकेने दि.२४/०९/२०१० रोजी पत्रासोबत पाठविलेले प्रमाणपत्र व गुणपत्रिकेच्या छायाप्रती बाबत माहिती पटना विश्वविद्यालय पटना यांचे अभिलेख्यात दप्तरी नोंद नाही. *<u>ती खोटी असल्याचे परिक्षा नियंत्रक यांचे स्वाक्षरीचे दि.२९/०४/२०११ चे दि.१८/०५/२०११ रोजी पत्र प्राप्त आहे.</u>*

- अश्याप्रकारे महानगरपालिकेने दि.२४/०९/२०१० व दि.२६/०४/२०११ अन्वये दोन वेळा पटना विश्वविद्यालय पटना यांना पत्रकारीता व जनसंज्ञापन हे पदवी प्रमाणपत्र तपासणीसाठी पाठविले असता त्यांचे या कार्यालयास जा.क्र.पियु/१०/२०४६, दि.२२/१२/२०११ रोजीचे दि. १०/०१/२०११ रोजी व जा.क्र.पीयु/६९११, दि.२०/०३/२०११ रोजीचे दि.०२/०६/२०११ रोजी महानगरपालिकेस प्राप्त पत्रान्वये प्रमाणपत्र योग्य असल्याचे नमुद आहे.

- दरम्यान प्रमाणपत्र खोटे असल्याचे पटना विश्वविद्यालय, पटना यांचे जा.क्र.६७९९/परिक्षा, दि.२९/०४/२०११ रोजीचे महानगरपालिका कार्यालयास दि.१८/०५/२०११ रोजी प्राप्त पत्रानुसार महानगरपालिकेने जा.क्र.मनपा/आस्था/७०३/२०१०-११, दि.२४/०९/२०१० अन्वये श्री. सचिन चवाथे, यांचे पत्रकारीता व जनसंज्ञापन पदवी प्रमाणपत्र व गुणपत्रिका यांच्या छायाप्रती पटना विश्वविद्यालयाचे अभिलेख्याशी पडताळणी करता त्यांच्या नोंदी नाहीत म्हणजे प्रमाणपत्र खोटे असल्याचे नमुद केले आहे.

- पत्रकारीता व जनसंज्ञापन पदवी प्रमाणपत्र खोटे असल्याचे दि.१८/०५/२०११ रोजीचे पटना विश्वविद्यालयाचे प्राप्त पत्राचे अनुषंगाने महानगरपालिका प्रशासनाने मा. आयुक्तांना संबंधितांवर कार्यवाही करण्यासाठी अहवाल सादर केला, त्यावेळी प्रथम श्री. सचिन चवाथे (जनसंपर्क अधिकारी) यांना जा.क्र.मनपा/आस्था/३८६/२०११-१२, दि.२४/०६/२०११ अन्वये नोटीस देऊन कामावर हजर होतेवेळी सादर केलेली शैक्षणिक पात्रतेची प्रमाणपत्रे खोटी आहेत. याबाबत खुलासा करणेस कळविले होते. त्याप्रमाणे त्यांनी केलेला खुलासा तत्कालीन मा. आयुक्त सो., यांनी दि. ०७/०७/२०११ रोजी नामंजुर केला. खुलासा नामंजुर केल्यानंतर प्रशासनाने पुन्हा मा. आयुक्त सो., यांना असमाधानकारक बाबत अहवाल सादर केला. त्या अहवालाचे अनुसार श्री. सचिन चवाथे, यांना जा.क्र.मनपा/आस्था/६०९/२०११-१२, दि.०२/०८/२०११ रोजीचे आदेशान्वये महानगरपालिका सेवेतून बडतर्फ करण्यात आले आहे.

सत्यप्रत

valui-pcl\E\आस्थापना विभाग\sadar\sadar-sachin chavathe.doc7

(वासुदेव शिरवळकर)
नगरसचिव
मिरा भाईंदर महानगरपालिका

➤ याप्रकरणी फिर्यादी श्री. इंद्रिच डॉमनिक मिरांडा यांनी श्री. सचिन चवाथे व इतर पाच याचेविरुध्द भाईंदर पोलिस ठाणे येथे एम.गुन्हा नोंद क्र. ०६/२०११ भा.द.वि.स. कलम ४२०,४६३,२१७,२१८,१२० (ब), सह मु.पो.का.कलम ६४,१४५ प्रमाणे दिनांक २१/०७/२०११ रोजी गुन्हा दाखल केलेला आहे. याप्रकरणी भाईंदर पोलिस ठाणे यांचेकडुन मा.न्यायालयात दोषारोप पत्र रवाना करणेत आले असुन, सदरची केस न्यायालयात प्रलंबित आहे.

महानगरपालिकेचा एखादा अधिकारी किंवा कर्मचारी यांनी नियमांचा किंवा शिस्तीचा भंग केल्याबद्दल किंवा निष्काळजीपणा केल्याबद्दल अथवा गैरवर्तुणक व दोषी आहे अशी खात्री झाल्यास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५६ अन्वये संबंधित अधिकारी/कर्मचाऱ्यास मा.आयुक्त यांना शास्ती लावण्याचे अधिकार प्राप्त आहेत. सदर कलमामध्ये बडतर्फ करण्याची शास्तीची तरतुद आहे.

श्री.सचिन चवाथे यांनी "जनसंपर्क अधिकारी" या पदाच्या नेमणुकीकरीता दिलेल्या शैक्षणिक व इतर अर्हता, पात्रता कागदपत्रांपैकी पटना विश्वविद्यालय, पटना यांचेकडील पत्रकारीता व जनसंज्ञापन या अभ्यासक्रमाचे प्रमाणपत्र खोटे आढळल्याने, त्यांचेवर उक्त अधिनियमातील तरतुदी मधील प्राप्त अधिकार अन्वये बडतर्फ करण्याची कारवाई करण्यात आलेली असुन ती योग्य आहे. सबब अर्जदार श्री. सचिन चवाथे यांचा सेवेत पुन्हा रुजु करुन घेण्याचा अपील अर्ज/विनंती अर्ज फेटाळण्यात यावा.

(सुभाष लाखे) २०/८/१४
आयुक्त
मिरा भाईंदर महानगरपालिका

O/C

२०/८/२०१४
सचिव विभाग

सत्यप्रत
(वासुदेव शिरवळकर)
नगरसचिव
मिरा भाईंदर महानगरपालिका

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा. स्थायी समिती दि. १४/१०/२०१५

**महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम अनुसूची "ड" मधील प्रकरण दोन (के) अन्वये प्रस्ताव**

प्रकरण क्र. १०३ : तत्कालीन बडतर्फ करण्यात आलेले जनसंपर्क अधिकारी श्री. सचिन चवाथे यांनी मा. स्थायी समिती सुभेपुढे दाखल केलेले अपिल प्रकरणी प्रशासनाच्या म्हणण्यानुसार निर्णय घेणे

ठराव क्र. ८८ :

प्रशासनाच्या गोषवाऱ्यानुसार सदर अपिल प्रकरणी निर्णय घेण्यासाठी मा. महासभेपुढे सदर प्रकरण सादर करण्यात यावे, असा ठराव मांडत आहे.

सुचक : श्री. मोहन जाधव

अनुमोदन : श्री. जयंतीलाल पाटील

ठराव सर्वानुमते मंजुर

ठराव वाचुन कायम करण्यात आला

सभापती
स्थायी समिती
मिरा-भाईंदर महानगरपालिका

सत्यप्रत

(वासु... शिरवळकर)
नगरसचिव
मिरा भाईंदर महानगरपालिका

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. १०३, तत्कालीन बडतर्फ करण्यात आलेले जनसंपर्क अधिकारी श्री. सचिव चवाथे यांनी मा. स्थायी समिती सभेपुढे दाखल केलेले अपिल प्रकरणी प्रशासनाच्या म्हणण्यानुसार निर्णय घेणे.

**मोहन जाधव :-**

प्रशासनाच्या गोषवाऱ्यानुसार सदर अपिल प्रकरणी निर्णय घेण्यासाठी मा. महासभेपूढे सदर प्रकरण सादर करण्यात यावे, असा ठराव मांडत आहे.

**जयंतीलाल पाटील :-**

माझे अनुमोदन आहे.

**मा. सभापती :-**

ठराव सर्वानुमते मंजूर.

**के प्रस्ताव प्रकरण क्र. १०३ :-**

तत्कालीन बडतर्फ करण्यात आलेले जनसंपर्क अधिकारी श्री. सचिव चवाथे यांनी मा. स्थायी समिती सभेपुढे दाखल केलेले अपिल प्रकरणी प्रशासनाच्या म्हणण्यानुसार निर्णय घेणे.

**ठराव क्र. ९९ :-**

प्रशासनाच्या गोषवाऱ्यानुसार सदर अपिल प्रकरणी निर्णय घेण्यासाठी मा. महासभेपूढे सदर प्रकरण सादर करण्यात यावे, असा ठराव मांडत आहे.

**सुचक :- श्री. मोहन जाधव** **अनुमोदन :- श्री. जयंतीलाल पाटील**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**मा. सभापती :-**

फेरिवाला संघटना कमिटी आपण अपॉईंट केली ह्याबाबत ज्याप्रमाणे आपणास कल्पना नाही त्याप्रमाणे मला देखील कल्पना नाही तो विषय महासभेमध्ये आहे कोणत्या आधारे कोणत्या नियमानुसार कोणकोणला कसे घेतले तो विषय महासभेत घेतला आहे तर आपल्या सर्वाना रिक्वेस्ट आहे की आपण तो विषय इकडे रद्द करायचा आणि जी कमिटी आहे तीच रिझॉल्व्ह करून टाकू या. कारण महासभेच्या विषयपत्रिकेवर हा विषय आहे कमिटी घ्या आम्ही कूठे नाही म्हणतो पण आम्हाला माहिती येऊ द्या. आपण सर्व माहिती महासभेमध्ये घ्या.

**कल्पिता पिंपळे:-**

फेरिवाला समिती जी स्थापन करायची आहे त्याचा जी.आर आहे.

**मा. सभापती :-**

आम्हाला मान्य आहे. शासनाचा जी.आर असेल पण त्या जी.आर संदर्भात आम्हाला कोणाला माहित नाही की कोणाला घ्यायचे कोणाला नाही घ्यायचे त्या समितीमध्ये कक्ष एक चे अधिकारी आहे. पाच डॉक्टर,वकिल असे सगळे फायनल करायच्या अगोदर पाच वकील आमच्याकडे देखील आहेत पाच वकील यांच्याकडे देखील आहेत. सर्वाची नाव येऊ द्या सर्वाचे रिफर होऊ द्या. तो विषय एकमताने होऊ द्या. माझे आपणा सर्वास निवेदन राहील महासभेमध्ये तो विषय आहे. गठीत केलेली कमिटी बरखास्त करावी आणि नविन कमिटीसाठी पून्हा एकदा तयारी करावी ते महासभेत आणण्यात यावे. रितसर विषय घेण्यात यावा. धन्यवाद आपले चांगले सहकार्य लाभले. सर्व ठराव झालेले आहेत आपली सभा होवो किंवा न होवो आपण नक्की घेऊ. परंतू ह्याच्यातील काही सदस्यानी राजीनामा देखील दिलेला आहे. ते सदस्य आपल्यामध्ये नसतील असे पण होऊ शकते. ज्यांनी राजीनामा दिला आहे ते नाही येणार आपली एक सभा होईल राजीनामा दिला आहे त्याच्या जागी वेगळे येतील तरी आपले जे सहकार्य लाभले त्याबद्दल धन्यवाद. आपले सन्मा. जे सदस्य स्टॅन्डिगमधून रिटायर्डमेन्ट होतील तेव्हा आपण ह्या दोघांना बोलवू. त्यावेळी सर्वांचा सत्कार करु. आजची सभा संपली असे मी घोषित करतो.

**(सभा संपण्याची वेळ २.०० वाजता)**

सत्यप्रत
(वासुदेव शिरवळकर)
नगरसचिव
मिरा भाईंदर महानगरपालिका

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

## मिरा-भाईंदर महानगरपालिका
## मा. स्थायी समिती सभा दि. ११-०८-२०१६

**प्रकरण क्रमांक (४७)** : तत्कालीन बडतर्फ करण्यात आलेले श्री. सचिन चवाथे यांनी मा. सथायी समितीपुढे दाखल केलेल्या अपील प्रकरणी निर्णय घेणेबाबत.

**ठराव क्रमांक (४५)** :

मिरा भाईंदर महानगरपालिका आस्थापनेवर मंजूर रिक्त "जनसंपर्क अधिकारी" हे पद नामनिर्देशनाने भरण्याबाबत दै. सका, दै. मुंबई लक्षदिप या वृत्तपत्रात जाहिरात प्रसिध्द करुन इच्छूक उमेदवारांकडून अर्ज मागविले होते. जनसंपर्क अधिकारी पदाच्या वृत्तपत्रात नमूद शैक्षणिक पात्रतेनुसार श्री. सचिन चवाथे यांनी दोन स्वतंत्र अर्ज विहीत शुल्कास भरले होते. त्यापैकी एकच अर्ज महानगरपालिकेने छाननीत ग्राह धरला होता, असे कामावर हजर करुन घेतानाचे सादर अहवालावरुन दिसुन येते. म्हणजेच श्री. सचिन चवाथे यांनी ग्राहय अर्जासोबत सादर केलेल्या शैक्षणिक पात्रता प्रमाणपत्राचे आधारे दि. २४-०१-२०११ रोजी "जनसंपर्क अधिकारी" पदावर नेमणूक दिली होती. परंतु जनसंपक्र अधिकारी या पदावर नेमणूकीनंतर त्यांच्या निवड यादीतील उमेदवाराने निवडीस मा. उच्च न्यायालयात याचिका क्र. १८३१/२०११ नुसार न्यायप्रविष्ठ करुन अर्जासोबत पटना विद्यापिठाकडे जोडलेले पमाणपत्र योग्य नसल्याचे म्हटले होते. त्यानुसार महानगरपालिकेने पटना विद्यापिठाकडे प्रमाणपत्र पडताळणी केली. पडताळणीत पटना विद्यापिठाचे प्रमाणपत्र नसल्याचे विद्यापिठाने कळविले. त्यामुळे महानगरपालिकेने दि. ०२-०८-२०११ रोजी पासुन महापगरपालिकासेवेतुन "जनसंपक अधिकारी" पदावरुन बडतर्फ केले. या एकतर्फी बडतर्फीच्या विरोधात श्री. सचिन वाथे यांनी मा. उच्च न्यायालयात याचिका क्र.७२८०/२०११ दाखल करुन प्रकरण न्यायप्रविष्ठ केले. या याचिकेवर मा. उच्च न्यायालयाचे दि. ०९-१०-२०१३ रोजी सुनावणीत याचिकादार यांस महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम ५६(४) अन्वये मा. स्थायी समितीकडे निकाला पासुन एक महिन्यात अपिल करण्याची मुभा असल्याचा निकाल दिला. त्या निकालाच्या अनुषंगाने मुदतीत मा. स्थायी समिती सभेस अपिल दाखल केले असुन त्या अपिलाचे अनुषंगाने श्री. सचिन चवाथे यांनी सादर कलेले निवेदन विचारात घेता महानगरपालिकेने "जनसंपर्क अधिकारी" या पदावर हजर करतेवेळी दि. २४-०१-२०११ रोजी प्रशासनाने जो अहवाल सादर केला आहे, त्या अहवालानुसार त्यांच्या दोन अर्जापैकी पटणा विद्यापिठाच्या शैक्षणि पात्रतेचा अर्ज निवडीसाठी महानगरपालिकेने ग्राहय धरलेला नाही. त्यामुळे मा. उच्च न्यायालयाने w/p ७२८०/११ अन्वये मा. स्थायी समितीने निर्णय यावा असे निर्देश दिले आहेत. सदर प्रकरण ठाणे जिल्हा न्यायालयात प्रलंबित असुन, न्यायालयाच्या निर्णयाच्या अधिन राहून प्रशासनाने नियम व कायदा तपासुन श्री. सचिन चवाथे यांना "जनसंपर्क अधिकारी" या पदावर हजर करुन घेण्यासाठी योग्य ती कार्यवाही करण्यास आमची कोणतीही हरकत नाही, असा ठराव मांडत आहे.

सुचक :
श्री. सुहास रकवी

अनुमोदन :
श्री. रविंद्र माळी

ठराव वाचुन कायम करण्यात आला

सभापती
स्थायी समिती
मिरा-भाईंदर महानगरपालिका
मिरा-भाईंदर महानगरपालिका

सत्यप्रत
(जगदीश शिरवळकर)
नगरसचिव
मिरा भाईंदर महानगरपालिका

Created byDK/PP

१) मिरारोड (पूर्व) आरक्षण क्र. १८७ बगीचा - लोह पुरूष सरदार वल्लभभाई पटेल
२) मिरारोड (पूर्व) आरक्षण क्र. १२२ 'अ' चौपाटी येथील उद्यान - माजी राष्ट्रपती डॉ. अब्दूल कलाम

वरील कामाकरीता तांत्रिक सल्लगार नेमण्यासाठी निविदा मागविण्यास ही सभा मान्यता देण्यात येत आहे.

**जयंतीलाल पाटील :-**

माझे अनुमोदन आहे.

**मा. सभापती :-**

ठराव सर्वानुमते मंजूर करण्यांत येत आहे.

**मर्लिन डिसा :-**

मा. सभापती साहेब ह्याच्यासाठी किती खर्च येणार.

**प्रशांत केळुसकर :-**

निविदा मागवायची आहे.

**मर्लिन डिसा :-**

अप्रोक्सीमेटली काही आयडीया असेल ना. खर्च येणार नाही काहीच.

**सुहास रकवी :-**

मग ते किती परसेन्टेज.

**दिपक खांबित :-**

जेवढे इस्टीमेंट होईल ना त्याच्या २.५० ते ३ टक्केपर्यंत.

**प्रकरण क्र. ४६ :-**

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम अनुसूची 'ड' प्रकरण ५ (२) अन्वये तांत्रिक सल्लागाराची नेमणूक करण्यास मान्यता देणेबाबत.

**ठराव क्र. ४४ :-**

मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील खालील ठिकाणी पुतळे बसविण्यास मा. विशेष महासभा दि.०५/०७/२०१६ ठराव क्र. ३१ अन्वये मान्यता प्राप्त झाली आहे.

१) मिरारोड (पूर्व) आरक्षण क्र. १८७ बगीचा - लोह पुरूष सरदार वल्लभभाई पटेल
२) मिरारोड (पूर्व) आरक्षण क्र. १२२ 'अ' चौपाटी येथील उद्यान - माजी राष्ट्रपती डॉ. अब्दूल कलाम

वरील कामाकरीता तांत्रिक सल्लगार नेमण्यासाठी निविदा मागविण्यास ही सभा मान्यता देण्यात येत आहे.

**सुचक :- श्री. प्रशांत केळूसकर अनुमोदन:- श्री. जयंतीलाल पाटील**
**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ४७, तत्कालीन बडतर्फ करण्यात आलेले जनसंपर्क अधिकारी श्री. सचिन चवाथे यांनी मा. स्थायी समिती सभेपुढे दाखल केलेल्या अपीलावर निर्णय घेणेबाबत.
(शरद पाटील सभागृहाबाहेर गेले.)

**मुन्ना सिंग :-**

मा. सभापती साहेब यह विषय कितने बार स्टॅन्डिंग में आ रहा है। क्या कारण है।

**सुहास रकवी :-**

हायकोर्ट का डियरेक्शन है।

**मा. सभापती :-**

हायकोर्टनी आपल्याकडे पाठवले होते. ते आपण डिसीजन घेतो.

**मुन्ना सिंग :-**

डिसीजन क्या लेने का?

**सुहास रकवी :-**

हायकोर्टने अपने को ऑर्डर दिया है।

Created byDK/PP

**मुन्ना सिंग :-**

ऑर्डर किसको दिया।

**सुहास रकवी :-**

आपको जो करना है वो आप कर दो।

**जयंतीलाल पाटील :-**

आपण स्टॅन्डिंग कमिटी फेटाळू या.

**मुन्ना सिंग :-**

ठराव होता है तो स्टॅन्डिंग कमिटी सदस्य जबाबदार नही। जिसको करना है वो करो।

**मा. सभापती :-**

आपण आपल्यावर घेत नाही.

**मर्लिन डिसा :-**

एफिशिएन्ट है सर। अब यह एफिशिएन्ट है ना टू टेक धिस डिसीजन। जब हायकोर्ट के पास गया कमिशनर का पूरा डिसीजन हो गया।

**प्रशांत केळुसकर :-**

ठराव ऐकून घ्या.

**सुहास रकवी :-**

ह्याच्यामध्ये गोषवाराच नाही त्यांनी म्हटल्याप्रमाणे आम्हाला माहित नाही.

**प्रशांत केळुसकर :-**

पहिले ठरावात काय आहे ते ऐकून घ्या. पटेल त्या हिशोबाने निर्णय घेऊ.

**सुहास रकवी :-**

प्रशांत साहेब ठराव सर्वांना माहित पाहिजे.

**प्रशांत केळुसकर :-**

म्हणूनच वाचून दाखवतो.

**मुन्ना सिंग :-**

वो रिटर्न भेजो, नही चाहिए।

**सुहास रकवी :-**

हायकोर्टनी सांगितले आहे तुम्हाला जे डिसीजन घ्यायचे आहे. फेटाळता येणार नाही डिसीजन घ्यायला लागेल.

**मुन्ना सिंग :-**

लेकिन ३ बार हुआ ना।

**सुहास रकवी :-**

कन्टेप्ट ऑफ कोर्ट अपने को लगेगा।

**मुन्ना सिंग :-**

होने दो कोई जबरदस्ती नही। मा. सभापती साहेब सुभाष लाखे साहेब ने जो नोटिंग किया जो एफ.आय.आर हुआ वो गलत है क्या?

**प्रशांत केळुसकर :-**

शेवटच्या ४ लाईन वाचा.

**सुहास रकवी :-**

तुम्ही डिसीजन घ्या. फेटाळू शकत नाही.

**मुन्ना सिंग :-**

२०/८/२०१४ को कमिशनर साहबने क्या नोटिंग किया था?

**सुहास रकवी :-**

२/८ उन्होंने उनको बडतर्फ किया। उनको निकाला गया। उनका पटना विद्यापीठ का बोगस निकला उसको बडतर्फ किया। उसके बाद पिटीशन हुआ................

**मुन्ना सिंग :-**

२/८ का जो है वो सभापती साहब मंगा दो।

**सुहास रकवी :-**

इसके उपर ठाणे कोर्ट में भी चालु है। जर कोर्टाने निर्णय दिलेला असेल तर कोर्टाला मान्य आहे तर आम्हाला मान्य असे करायला पाहिजे. ठाणे न्यायालयाच्या आदेशानुसार करावे असे नमूद करा.

**प्रशांत केळुसकर :-**

तो विषय तसाच आहे.

**स्टिवन मेन्डोंसा :-**

तसे कुठे आहे लाईन बरोबर करुन घ्या.



सत्यप्रत

(वासुदेव शिरवळकर)
नगरसचिव
मिरा भाईंदर महानगरपालिका

**सुहास रकवी :-**

सदर प्रकरण ठाणे जिल्हा न्यायालयात प्रलंबीत असून न्यायालयाच्या निर्णयाच्या अधीन राहून न्यायालयाने निर्णयच दिला नाही. न्यायालयाने दिलेल्या निर्णयानुसार आपण करु. त्यांनी निर्णयच दिला नाही तर आपण अधीन कसे राहणार.

**सुहास रकवी :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका आस्थापनेवर मंजूर रिक्त "जनसंपर्क अधिकारी" हे पद नामनिर्देशनाने भरण्याबाबत दै. सकाळ, दै. मुंबई लक्षदिप या वृत्तपत्रात जाहिरात प्रसिध्द करून इच्छूक उमेदवारांकडून अर्ज मागविले होते. जनसंपर्क अधिकारी पदाच्या वृत्तपत्रात नमूद शैक्षणिक पात्रतेनुसार श्री. सचिन चवाथे यांनी दोन स्वतंत्र अर्ज विहीत शुल्कास भरले होते. त्यापैकी एकच अर्ज महानगरपालिकेने छाननीत ग्राह धरला होता, असे कामावर हजर करून घेतानाचे सादर अहवालावरून दिसुन येते. म्हणजेच श्री. सचिन चवाथे यांनी ग्राहय अर्जासोबत सादर केलेल्या शैक्षणिक पात्रता प्रमाणपत्राचे आधारे दि. २४-०१-२०११ रोजी "जनसंपर्क अधिकारी" पदावर नेमणूक दिली होती. परंतु जनसंपक्र अधिकारी या पदावर नेमणूकीनंतर त्यांच्या निवड यादीतील उमेदवाराने निवडीस मा. उच्च न्यायालयात याचिका क्र. १८३१/२०११ नुसार न्यायप्रविष्ठ करून अर्जासोबत पटना विद्यापिठाकडे जोडलेले पमाणपत्र योग्य नसल्याचे म्हटले होते. त्यानुसार महानगरपालिकेने पटना विद्यापिठाकडे प्रमाणपत्र पडताळणी केली. पडताळणीत पटना विद्यापिठाचे प्रमाणपत्र नसल्याचे विद्यापिठाने कळविले. त्यामुळे महानगरपालिकेने दि. ०२-०८-२०११ रोजी पासुन महापगरपालिकासेवेतुन "जनसंपक अधिकारी" पदावरून बडतर्फ केले. या एकतर्फी बडतर्फीच्या विरोधात श्री. सचिन वाथे यांनी मा. उच्च न्यायालयात याचिका क्र.७२८०/२०११ दाखल करून प्रकरण न्यायप्रविष्ठ केले. या याचिकेवर मा. उच्च न्यायालयाचे दि. ०९-१०-२०१३ रोजी सुनावणीत याचिकादार यांस महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम ५६(४) अन्वये मा. स्थायी समितीकडे निकाला पासुन एक महिन्यात अपिल करण्याची मुभा असल्याचा निकाल दिला. त्या निकालाच्या अनुषंगाने मुदतीत मा. स्थायी समिती सभेस अपिल दाखल केले असुन त्या अपिलाचे अनुषंगाने श्री. सचिन चवाथे यांनी सादर केलेले निवेदन विचारात घेता महानगरपालिकेने "जनसंपर्क अधिकारी" या पदावर हजर करतेवेळी दि. २४-०१-२०११ रोजी प्रशासनाने जो अहवाल सादर केला आहे, त्या अहवालानुसार त्यांच्या दोन अर्जापैकी पटणा विद्यापिठाच्या शैक्षणि पात्रतेचा अर्ज निवडीसाठी महानगरपालिकेने ग्राहय धरलेला नाही. त्यामुळे मा. उच्च न्यायालयाने क्ष/द्र ७२८०/११ अन्वये मा. स्थायी समितीने निर्णय यावा असे निर्देश दिले आहेत. सदर प्रकरण ठाणे जिल्हा न्यायालयात प्रलंबित असुन, न्यायालयाच्या निर्णयाच्या अधिन राहून न्यायालयाने दिलेल्या निर्णयानुसार प्रशासनाने नियम व कायदा तपासुन श्री. सचिन चवाथे यांना "जनसंपर्क अधिकारी" या पदावर हजर करून घेण्यासाठी योग्य ती कार्यवाही करण्यास आमची कोणतीही हरकत नाही, असा ठराव मांडत आहे.

**रविंद्र माळी :-**

माझे अनुमोदन आहे.

**मा. सभापती :-**

ठराव सर्वानुमते मंजूर करण्यांत येत आहे.

**प्रकरण क्र. ४७ :-**

तत्कालीन बडतर्फ करण्यात आलेले जनसंपर्क अधिकारी श्री. सचिन चवाथे यांनी मा. स्थायी समिती सभेपुढे दाखल केलेल्या अपीलावर निर्णय घेणेबाबत.

**ठराव क्र. ४५ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका आस्थापनेवर मंजूर रिक्त "जनसंपर्क अधिकारी" हे पद नामनिर्देशनाने भरण्याबाबत दै. सकाळ, दै. मुंबई लक्षदिप या वृत्तपत्रात जाहिरात प्रसिध्द करून इच्छूक उमेदवारांकडून अर्ज मागविले होते. जनसंपर्क अधिकारी पदाच्या वृत्तपत्रात नमूद शैक्षणिक पात्रतेनुसार श्री. सचिन चवाथे यांनी दोन स्वतंत्र अर्ज विहीत शुल्कास भरले होते. त्यापैकी एकच अर्ज महानगरपालिकेने छाननीत ग्राह धरला होता, असे कामावर हजर करून घेतानाचे सादर अहवालावरून दिसुन येते. म्हणजेच श्री. सचिन चवाथे यांनी ग्राहय अर्जासोबत सादर केलेल्या शैक्षणिक पात्रता प्रमाणपत्राचे आधारे दि. २४-०१-२०११ रोजी "जनसंपर्क अधिकारी" पदावर नेमणूक दिली होती. परंतु जनसंपक्र अधिकारी या पदावर नेमणूकीनंतर त्यांच्या निवड यादीतील उमेदवाराने निवडीस मा. उच्च न्यायालयात याचिका क्र. १८३१/२०११ नुसार न्यायप्रविष्ठ करून अर्जासोबत पटना विद्यापिठाकडे जोडलेले पमाणपत्र योग्य नसल्याचे म्हटले होते. त्यानुसार महानगरपालिकेने पटना विद्यापिठाकडे प्रमाणपत्र पडताळणी केली. पडताळणीत पटना विद्यापिठाचे प्रमाणपत्र नसल्याचे विद्यापिठाने कळविले. त्यामुळे महानगरपालिकेने दि. ०२-०८-२०११ रोजी पासुन महापगरपालिकासेवेतुन "जनसंपक अधिकारी" पदावरून बडतर्फ केले. या एकतर्फी बडतर्फीच्या विरोधात श्री. सचिन वाथे यांनी मा. उच्च न्यायालयात याचिका क्र.७२८०/२०११ दाखल करून प्रकरण न्यायप्रविष्ठ केले. या याचिकेवर मा. उच्च न्यायालयाचे दि. ०९-१०-२०१३ रोजी सुनावणीत याचिकादार यांस महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम ५६(४) अन्वये मा. स्थायी समितीकडे निकाला पासुन एक महिन्यात अपिल करण्याची मुभा असल्याचा निकाल दिला. त्या निकालाच्या अनुषंगाने मुदतीत मा. स्थायी समिती सभेस अपिल दाखल केले असुन त्या अपिलाचे अनुषंगाने श्री. सचिन चवाथे



सत्यप्रत

(वासुदेव शिरवळकर)
नगरसचिव
मिरा भाईंदर महानगरपालिका

यांनी सादर केलेले निवेदन विचारात घेता महानगरपालिकेने "जनसंपर्क अधिकारी" या पदावर हजर करतेवेळी दि. २४-०१-२०११ रोजी प्रशासनाने जो अहवाल सादर केला आहे, त्या अहवालानुसार त्यांच्या दोन अर्जापैकी पटणा विद्यापिठाच्या शैक्षणि पात्रतेचा अर्ज निवडीसाठी महानगरपालिकेने ग्राहय धरलेला नाही. त्यामुळे मा. उच्च न्यायालयाने ६/द्र ७२८०/११ अन्वये मा. स्थायी समितीने निर्णय यावा असे निर्देश दिले आहेत. सदर प्रकरण ठाणे जिल्हा न्यायालयात प्रलंबित असुन, न्यायालयाच्या निर्णयाच्या अधिन राहून न्यायालयाने दिलेल्या निर्णयानुसार प्रशासनाने नियम व कायदा तपासुन श्री. सचिन चवाथे यांना "जनसंपर्क अधिकारी" या पदावर हजर करुन घेण्यासाठी योग्य ती कार्यवाही करण्यास आमची कोणतीही हरकत नाही, असा ठराव मांडत आहे.

**सुचक :- श्री. सुहास रकवी** **अनुमोदन:- श्री. रविंद्र माळी**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ४८, भाईंदर (पुर्व) आरक्षण क्र. १२२ सी भारतरत्न सचिन तेंडुलकर मैदानात तयार करण्यात आलेल्या खेळपट्टया प्रशिक्षणासाठी खाजगी संस्थाना देणेस मान्यता देणेबाबत.
(सदर विषयास श्री. शरद पाटील सभागृहात उपस्थित नव्हते.)

**रवि व्यास :-**

मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात भाईंदर (पुर्व) नवघर मार्गाजवळ आरक्षण क्र. १२२ सी मैदानासाठी आरक्षित जागा असुन सदर आरक्षणाच्या जागेत मैदान विकसित करुन सदर मैदानाचे भारतरत्न सचिन तेंडुलकर असे नामकरण करण्यात आलेले आहे. सदर मैदानात स्थानिक मुलांना क्रिकेटचे प्रशिक्षण देण्यासाठी महानगरपालिकेमार्फत चार खेळपट्टया तयार करण्यात आल्या आहेत. सदर खेळपट्टया प्रशिक्षणासाठी उपलब्ध करुन देण्यासाठी खालील संस्थानी मागणी केली आहे.

१) रायझिंग स्टार स्पोटर्स फाऊंडेशन, नवघर रोड, भाईंदर (पुर्व)
२) मंथन सामाजिक संस्था, नवघर रोड, भाईंदर (पुर्व).

मिरा भाईंदर महानगरपालिकेमार्फत खेळाचे साहित्य उपलब्ध करुन दिल्यास महानगरपालिका शाळांच्या विद्यार्थ्यांना मोफत प्रशिक्षण उपलब्ध करुन देण्याची रायझिंग स्टार स्पोटर्स फाऊंडेशचा संस्थेने विनंती केली असुन मंथन सामाजिक संस्थेने सदर मैदानातील चार खेळपट्टया पैकी २ खेळपट्टया भाडयाने उपलब्ध करुन देण्याची मागणी केली आहे.

मिरा भाईंदर महानगरपालिकेमार्फत भाईंदर (प.) सुभाषचंद्र बोस मैदानात तयार केलेल्या खेळपट्टया रु. १०००/- प्रति महिना प्रति खेळपट्टी या प्रमाणे तर मैदान रु.५०००/- प्रति महिना प्रमाणे भाडयाने देण्यात येते. त्यापुढे सदर मैदानात वरील दरानुसारच व धोरणानुसार भाडे द्यावे लागेल तरी सदर दरानुसार मागणी करणाऱ्या दोन्ही संस्थाना प्रत्येकी दोन खेळपट्टया सर्व प्रथम १ वर्ष कालावधीसाठी उपलब्ध करुन देण्यास व खेळपट्टयाची देखभाल सदर संस्थामार्फत करुन मुलांना प्रशिक्षण देण्यासाठी सदर प्रस्तावास मान्यता देण्यात येत आहे. भाईंदर (प.) येथील प्रभाग क्र. २८ मध्ये एस.टी.पी. (अमृतवाणी सत्संग मार्ग) शेजारील गार्डनमध्ये छत्रपती पुरस्कार विजेते श्री. इजाज शेख यांना महिला खोखो प्रशिक्षणासाठी मासीक ५००/- रुपये दराने १ वर्षासाठी उपलब्ध करुन देण्यास मान्यता आहे.

**सुहास रकवी :-**

माझे अनुमोदन आहे.

**मर्लिन डिसा :-**

मा. सभापती साहेब हे टेंडरींग का नाही केले. म्हणजे दुसऱ्या संस्थाना पण चान्स मिळाला असता.

**सुहास रकवी :-**

माझे सूचनेसह अनुमोदन आहे. ह्याच्यात टेंडर का काढण्यात आले नाही. कारण अशा कितीतरी संस्था आहे.

**मर्लिन डिसा :-**

दुसऱ्या संस्था पण आहेत ना. विचारले तर त्यांना पण द्यावे.

**सुहास रकवी :-**

प्रति दिन आणि प्रती महिना हा शब्द मला कळला नाही. गोषवाऱ्यात तसा उल्लेख केला आहे.

**दिपक खांबित :-**

प्रती महिना प्रती खेळपट्टी आहे.

**मर्लिन डिसा :-**

मेरी सुचना ॲड करो।



सत्यप्रत
(वासुदेव शिरवळकर)
नगरसचिव
मिरा भाईंदर महानगरपालिका

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा. महासभा दिं. २१/०९/२०१६

## गोषवारा

प्रकरण क्र. ७८ तत्कालीन बडतर्फ करण्यात आलेले जनसंपर्क अधिकारी श्री. सचिन चवाथे, यांचे प्रकरणाबाबत...

श्री. सचिन चवाथे, यांची महानगरपालिकेच्या आस्थापनेवर "जनसंपर्क अधिकारी" या पदावर स्थायी स्वरुपात सरळसेवेने विहित निवडप्रक्रियेद्वारे दि. २४/०१/२०११ रोजी नियुक्ती केलेली होती. सदरचे अधिकारी यांचे पटणा विश्वविद्यालय, पटणा यांचेकडील "जर्नलिझम ॲन्ड मास कम्युनिकेशन" या अभ्यासक्रमाची पदवी प्रमाणपत्र पडताळणीअंती खोटी असल्याचे आढळून आल्याने तत्कालीन आयुक्तांनी श्री. सचिन चवाथे, यांना दि.०२/०८/२०११ रोजीच्या आदेशान्वये सेवेतून बडतर्फ करण्यात आलेले आहे.

सदरच्या बडतर्फीच्या आदेशाच्या विरुध्द श्री. सचिन चवाथे, यांनी मा.उच्च न्यायालय, मुंबई येथे याचिका (याचिका क्र.७२८०/२०११) दाखल करुन प्रकरण न्यायप्रविष्ठ केले होते. सदर प्रकरणी मा. उच्च न्यायालयाने याचिकादार यांस महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५६ (४) अन्वये अपील करण्याची तरतूद उपलब्ध असल्याने, सदरची याचिका हाताळण्यास नकार देऊन दि.०९/१०/२०१३ रोजी निकाली काढलेली आहे.

या अनुषंगे याचिकादार श्री. सचिन चवाथे, यांनी मा. सभापती, स्थायी समिती यांचेपुढे कामावर हजर करुन घेणेबाबत विनंती अर्ज केलेला आहे. यावर मा.सभापती, स्थायी समिती यांनी प्रशासनास याप्रकरणी दि. २७/०५/२०१४ रोजीच्या पत्रान्वये अभिप्राय अपेक्षीलेले होते.

सदर प्रकरणात प्रशासनाने दि. २०/०८/२०१४ रोजी सचिव विभागास स्थायी समिती समोर प्रशासनाचे म्हणणे दाखल केलेले होते. स्थायी समितीने महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम अनुसूची "ड" मधील प्रकरण दोन (के) अन्वये प्रस्ताव दि. १४/१०/२०१५ रोजी सभेसमोर घेतेलेला आहे.

प्रकरणात प्रशासनाचे म्हणणे दि.२१/०८/२०१४ मध्ये सभापती, स्थायी समिती यांना शेवटच्या दोन परिच्छेदात खालीलप्रमाणे सादर केलेले आहेत.

महानगरपालिकेचा एखादा अधिकारी किंवा कर्मचारी यांनी नियमांचा किंवा शिस्तीचा भंग केल्याबद्दल किंवा निष्काळजीपणा केल्याबद्दल अथवा गैरवर्तुणक व दोषी आहे अशी खात्री झाल्यास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५६ अन्वये संबंधित अधिकारी/कर्मचाऱ्यास मा.आयुक्त यांना शास्ती लावण्याचे अधिकार प्राप्त आहेत. सदर कलमामध्ये बडतर्फ करण्याची शास्तीची तरतुद आहे. त्याअनुषंगाने श्री. सचिन चवाथे, यांनी "जनसंपर्क अधिकारी" या पदाच्या नेमणुकीकरीता दिलेल्या शैक्षणिक व इतर अर्हता, पात्रता कागदपत्रांपैकी पटना विश्वविद्यालय, पटना



सत्यप्रत
(वासुदेव शिरवळकर)
नगरसचिव
मिरा भाईंदर महानगरपालिका

यांचेकडील पत्रकारीता व जनसंज्ञापन या अभ्यासक्रमाचे प्रमाणपत्र खोटे आढळल्याने, त्यांचेवर उक्त अधिनियमातील तरतुदी मधील प्राप्त अधिकार अन्वये बडतर्फ करण्याची कारवाई करण्यात आलेली असुन, ती योग्य आहे. सबब अर्जदार श्री. सचिन चवाथे, यांचा सेवेत पुन्हा रुजु करुन घेण्याचा अपील अर्ज/विनंती अर्ज फेटाळण्यात यावा.

वरील वस्तुस्थिती पाहता स्थायी समितीने सदर प्रकरणात उचित निर्णय घेणे आवश्यक होते. तथापी स्थायी समितीने ठराव क्र. ९९, दि. १४/१०/२०१५ रोजी खालीलप्रमाणे निर्णय घेतलेला आहे.

"प्रशासनाच्या गोषवाऱ्यानुसार सदर अपिल प्रकरणी निर्णय घेण्यासाठी मा.महासभेपुढे सदर प्रकरण सादर करण्यात यावे, असा ठराव मांडत आहे."

वरील वस्तुस्थितीदर्शक अहवाल पाहता, प्रकरणात विधी विभागाकडून अभिप्राय खालीलप्रमाणे मागविण्यात आले होते.

"महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम ५६(४) अन्वये ज्या कोणत्याही नगरपालिका अधिकाऱ्यास किंवा कर्मचाऱ्यास महानगरपालिके व्यतिरिक्त अन्य कोणत्याही प्राधिकाऱ्याकडून (सदर प्रकरणी आयुक्त हे प्राधिकरण असे.) बडतर्फ करण्याचा आदेश देण्यात येईल. त्या अधिकाऱ्यास/कर्मचाऱ्यास त्याच्या निकट वरिष्ठ प्राधिकरणाकडे (सदर प्रकरणी आयुक्तांचे निकट प्राधिकरण स्थायी समिती असे.) अपील करण्याची तरतुद आहे. आणि सदर प्राधिकरणास आयुक्तांनी दिलेला आदेश कायम करता येईल, किंवा अशा आदेशाऐवजी त्यास न्याय वाटेल असा आदेश देता येईल.

परंतु विषयांकित प्रकरणी मा. स्थायी समितीने वरील तरतुदीनुसार आयुक्तांनी दिलेले आदेश कायम केले नाहीत, किंवा सदर आदेशाऐवजी इतर आदेश पारित केले नाहीत, किंबहुना सदर प्रकरणी निर्णय घेण्यासाठी मा. महासभेपुढे प्रकरण सादर केले आहेत. वरील तरतुदीनुसार वरील अपिलावर निर्णय घेणे मा. स्थायी समितीस अनिवार्य आहे.

तरी वरील अपीलात उक्त तरतुदीनुसार निर्णय घेण्यासाठी मा. स्थायी समितीपुढे पुनश्चः गोषवारा सादर करणेस योग्य होईल. असे इकडील विभागात मत आहे."

वरील विधी विभागाकडील अभिप्राय पहाता, प्रशासनाने दि. ०३/१२/२०१५ रोजी गोषवारा सचिव, नगरसचिव विभाग यांचेकडे मा. स्थायी समितीपुढे मंजुरीस्तव सादर करण्यात आला होता.

प्रशासनाने मा. स्थायी समितीपुढे प्रकरण सादर केले असता, मा. स्थायी समितीने ठराव क्र. ९९, दि. १४/१०/२०१५ रोजी निर्णय घेतलेला आहे.

तदूनंतर प्रशासनाने पुनःश्च दि. ०३/१२/२०१५ रोजी गोषवारा नगरसचिव विभागाकडे देण्यात आला होता. मा. सभापती, स्थायी समिती यांनी दि. १६/०१/२०१६ रोजी प्रकरणी माहिती अपेक्षीलेली होती. त्याअनुषंगाने प्रशासनाने दि. १५/०२/२०१६ रोजी मा. सभापती, स्थायी समिती यांचेकडे प्रकरणी गोषवारा माहिती दिलेली आहे. मा. सभापती, स्थायी समिती यांनी दि. १७/०२/२०१६ रोजी प्रकरणी अधिक माहिती मिळणेबाबत पत्र देण्यात आले होते. त्याअनुषंगाने प्रशासनाने दि. ०७/०७/२०१६ रोजी पुनःश्च मा. सभापती, स्थायी समिती यांचेकडे माहिती देण्यात आलेली आहे.



सत्यप्रत
(वासुदेव शिरवळकर)
नगरसचिव

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, स्थायी समितीचे कामकाज, ३. स्थायी समितीच्या कामकाजाचे नियमन करण्यासंबंधी तरतुदी, (के) मध्ये पुढीलप्रमाणे नमुद आहे : "जेथे आयुक्तांच्या कोणत्याही प्रस्तावास, या अधिनियमाच्या तरतुदींन्वये घटीत करण्यात आलेल्या कोणत्याही समितीच्या मंजुरीची किंवा मान्यतेची आवश्यकता असेल त्याबाबतीत, समिती, नगरपालिका सचिवांकडे तो प्रस्ताव प्राप्त झाल्यांनतर, समितीच्या लगतच घेण्यात आलेल्या सभेच्या दिनांकापासून पंचेचाळीस दिवसांच्या आत, असा कोणताही प्रस्ताव विचारात घेईल आणि तो प्रस्ताव निकालात काढील- मग अशा प्रस्तावाशी निगडीत बाब अशा सभेच्या कार्यसूचीवर घेतलेली असो किंवा नसो-तसे न केल्यास, अशा प्रस्तावाला समितीने मंजुरी किंवा मान्यता दिलेली असल्याचे मानण्यात येईल, आणि तशा आशयाचा अहवाल आयुक्ताकडून महानगरपालिकेला पाठविण्यात येईल.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, स्थायी समितीचे कामकाज, ३. स्थायी समितीच्या कामकाजाचे नियमन करण्यासंबंधी तरतुदी, (के) नुसार सदर प्रस्तावावर कार्यवाही करणेस पंचेचाळीस दिवसापेक्षा अधिक कालावधी झाल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे स्थायी समितीच्या कामकाजाचे नियमन करण्यासंबंधी तरतुदी, (के) नुसार श्री. सचिन चवाथे, यांच्या बडतर्फीच्या प्रस्तावाला समितीने मंजुरी किंवा मान्यता दिलेली असल्याचे मानण्यात येऊन, श्री. सचिन चवाथे, यांना बडतर्फ करण्यात येत असून, त्याप्रमाणे अहवाल मा. महासभेपुढे ठेवणेत येत आहे.

(अच्युत हांगे)
आयुक्त
मिरा भाईंदर महानगरपालिका

सत्यप्रत

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा. महासभा दि.२९/०९/२०१६

**प्रकरण क्र. ७८ :- तत्कालीन बडतर्फ करण्यात आलेले जनसंपर्क अधिकारी श्री. सचिन चवाथे यांचे प्रकरणाबाबत मा. स्थायी समितीला अधिकार असून मा. स्थायी समितीने निर्णय घेणेबाबत.**

ठराव क्र. ७६ :-

मिरा भाईंदर महानगरपालिकेत विविध पदांची भरती करताना आस्थापना विभागात मोठ्या प्रमाणात अनियमितता झालेली आहे. याविषयाबाबत खालील सुचना मांडत आहे.

१) सचिन सुधाकर चवाथे भरतीच्या वेळी पात्र नव्हते सदर प्रकरणी अधिक माहिती घेतली असता परिक्षा नियंत्रक व सामान्य प्रशसन प्रमुख गोविंद परब यांनी निष्काळजीपणा केलेला आहे. त्यांनी सचिन चवाथे यांचा प्रथम व द्वीतीय अर्ज ते पात्र नसताना स्विकारला आहे. त्यापैकी नारी एकता उन्नतीचे प्रमाणपत्र जोडलेल्या अर्जामध्ये गुन्हा नोंद असल्याचे दिसून येत आहे. तसेच त्यांची दोन्ही प्रमाणपत्रे बोगस/खोटी व मान्यता प्राप्त विद्यापिठाची नसताना ती सत्य व खरे भासवून/सांगुन महानगरपालिकेची दिशाभुल केलेली आहे. सदर प्रकरणी विनोद शेवंते हे न्यायालयात गेले असता पटणा विद्यापिठाने सदर प्रमाणपत्र बोगस असल्याचे प्रतिज्ञापत्र कोर्टात दिल्यामुळे महानगरपालिकेची कोर्टात नाचक्की झालेली आहे. सदर प्रकरणी तत्कालीन आयुक्त श्री. विक्रम कुमार यांनी सचिन चवाथे यांना सेवेतून बडतर्फ करुन भाईंदर पोलिस स्टेशनमध्ये गोविंद परब व इतर अधिकारी यांच्यावर गुन्हे दाखल केलेले आहे. अशाप्रकारे केलेल्या दुसऱ्या एका भरती प्रकरणी भुषण दाडगीदास (एक्स-रे टेक्शीयन) व गोविंद परब यांच्यावर गुन्हे नोंद आहे.

२) तसेच मणीजंगु लिंगम सफाई कामगार यांची सेवा दि.३१/०१/२०१६ रोजी संपुष्टात आली होती व त्यांना त्या दिवशी निवृत्त करणे आवश्यक असताना देखील आस्थापना लिपिक दिपक जाधव, आस्थापना अधिक्षक नरेंद्र चव्हाण, मुख्यलिपिक अन्नपुर्णा आवडेकर व सहाय्यक आयुक्त (सा.प्र.) गोविंद परब यांनी आपल्या पदाचा गैरवापर करुन आर्थिक फायद्याकरीता त्याची सेवा १० वर्षे वाढवून सेवा पुस्तीकेतील जन्मतारखेत खाडाखोड केलेली आहे. महाराष्ट्र नागरी सेवाशर्ती नियम १९८१ कलम (३८) सुचनेनुसार शासकीय सेवेत प्रवेश केल्याच्या तारखेपासुन ५ वर्षाच्या कालावधीनंतर शासकीय कर्मचाऱ्याने आपल्या सेवा पुस्तकात किंवा सेवा पटलात नोंदलेल्या जन्म तारखेमध्ये फेरबदल करण्यासाठी दिलेल्या अर्जावर सामान्यतः विचार केला जावू नये अशाप्रकरणामध्ये उच्च न्यायालयाने डर्बन स्टँडर्ड कं. लि. विरुध्द रिन बधु ए.आय.आर.१९९५ मध्ये निर्णय दिलेला आहे असे असताना प्रशासनाची दिशाभुल केलेली आहे.

३) तसेच निल अल्फेड डिसोजा यांना अनुकंपातत्वावर लिपिक या पदावर भरती करताना सेवा नियमा प्रमाणे लिपिक या पदाची शैक्षणिक पात्रता व अर्हता, मराठी टायपिंग नसताना तसेच सेवा नियमानुसार १० टक्के अनुकंपा तत्वावर भरती करावयाची असताना शासन निर्णय दि.०६/१२/२०१० हा निर्णय महानगरपालिकेला लागु होत नसताना त्याच्या आधारे लिपिक पदी सरळ सेवेने मजुरी लिपिक पदास न घेता २८ पदे

सत्यप्रत

(वासुदेव शिरवळकर)
नगरसचिव
मिरा भाईंदर महानगरपालिका

अतिरीक्त भरती केली व निल अल्फेड डिसोजा यांना अनुकंपा तत्वावर लिपिक या पदावर अतिरीक्त नियुक्त करण्यात आली. सदर प्रकरणात निल डिसोजा यांच्या विषयी विनोद शेवंते यांनी तक्रार करताच मा. आयुक्त यांनी सदर व्यक्तीला पदावनत करण्याचा निर्णय घेतला होता. परंतु त्या निर्णयाला सदर व्यक्तीने कामागार न्यायालयात न्याय प्रविष्ट केलेले आहे.

अशाप्रकारची अनेक प्रकरणे आस्थापना विभागामध्ये व सहाय्यक आयुक्त (सा.प्र.) या पदावर गोविंद परब असताना संगनमताने केली असल्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे गोविंद परब यांना निलंबित करुन आजपर्यंत त्यांनी केलेल्या सेवा कालावधीमधील कामकाजाची विभागीय चौकशी करण्यात यावी मी ठराव मांडत आहे.

**सूचक :-** श्री. नरेंद्र मेहता

**अनूमोदक :-** A S Kasodariya 29/9/16 श्री. आसिफ कासोदरिया

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**महापौर**

**मिरा भाईंदर महानगरपालिका**

सत्यप्रत

(वासुदेव शिरवळकर)
नगरसचिव
मिरा भाईंदर महानगरपालिका

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ७८, तत्कालीन बडतर्फ करण्यात आलेले जनसंपर्क अधिकारी श्री. सचिन चवाथे यांचे प्रकरणाबाबत. प्रशासनाकडून हा प्रस्ताव मागे घेण्यात आलेला आहे.

**नरेंद्र मेहता :-**

साहेब आम्ही त्यावर ठराव करत आहोत.

**मुन्ना सिंग :-**

प्रशासन का अधिकार है क्या पिछे लेने का?

**नगरसचिव :-**

प्रशासनाकडून पत्र आले आहे.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

साहेब ते पत्र वाचा ना. काय लिहिले आहे सांगा ना आम्हाला.

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ७८ मागे घेण्याबाबत पत्र वाचन. विषय महासभा दि. २९/९/२०१६ चे प्रकरण क्र. ७८ बाबत. उपरोक्त विषयांकित प्रकरणी प्रशासन १०/८/२०१६ रोजी नगरसचिव विभागाकडे मा. महासभेच्या विषयपत्रिकेत घेणेबाबत कळविले होते त्यानुसार गोषवारा देण्यात आला होता. त्याअनुषंगाने २९/९/२०१६ रोजी होणाऱ्या मा. महासभेच्या विषयपत्रिकेवरील प्रकरण क्र. ७८ "तत्कालीन बडतर्फ करण्यात आलेले जनसंपर्क अधिकारी श्री. सचिन चवाथे यांचे प्रकरणाबाबत" घेण्यात आलेला आहे. जनसंपर्क अधिकारी श्री. सचिन चवाथे (बडतर्फ) यांनी मा. स्थायी समितीसमोर अपिल दाखल केले होते. सदर अपिलावर मा. स्थायी समितीने दि. ११/८/२०१६ रोजी ठराव क्र. ४५ अन्वये निर्णय घेण्यात आला होता. सदर प्रकरणावर विधी विभागाचे अभिप्राय घेता विधी विभागाने मा. महासभेत घेण्यात आलेले प्रकरण मागे घेणेबाबत कळविल्यानुसार प्रकरण क्र. ७८ चा प्रस्ताव मागे घेण्यात येत आहे. उपायुक्त मुख्यालय.

**नरेंद्र मेहता :-**

आयुक्त साहेब जो प्रकरण मागे घेतला आहे त्याचे मुळ कारण आपण सांगितले नाही की आम्ही का मागे घेतो आणि त्या स्थायी समितीच्या निर्णयावर आपण काय निर्णय घेणार आहे किंवा सचिन चवाथे यांना कोर्टाच्या आदेशानुसार काय निर्णय घेतला कुठेही तो त्या ठरावामध्ये क्लिअर होत नाही. आज पी.आर.ओ. ची पोस्ट अनेक वर्षापासुन आपल्याकडे ती वेकेंट सारखीच आहे. त्या पदावर कोणी नाही. आणि सचिन चवाथेचा निर्णय होत नाही पण तुम्ही नविन ही भरु शकत नाही. अपॉईंट करु शकत नाही त्याला काढू शकत नाही. आता याला बडतर्फ करायचं की ठेवायचं अजुनही आपण असा निर्णय द्यायला पाहिजे होता की, आम्ही याला बडतर्फ करतो स्थायी समितीच्या निर्णयाप्रमाणे किंवा प्रशासनामार्फत ते खुलासाच केला नाही. मागे घेऊन नक्की काय करणार परत. तसाच पेंडींग ठेवणार ते परत तुम्ही स्थायी समितीला शिफारस करणार याच्यात तुम्ही कुठेही काही उल्लेख केलेला नाही. आणि महत्वाचं सभागृहाला पण विनंती आपण २ मिनिट ऐकून घ्याव आणि का स्थायी समितीला तुम्ही वेठीस धरता. काय प्रशासनाला अधिकार नाहीत काय निर्णय घ्यायचे. आता महासभेपूढे तुम्ही दिलं आम्ही हा निर्णय का घ्यायचं. सचिन चवाथेची नियुक्ती करताना काय आम्हाला विचारुन केल होतं. त्याने बोगस पेपर दिलेत की ओरीजन दिलेत. त्या सचिन चवाथेच्या केसमध्ये महापालिकेचे लाखो रु. आपण ॲडव्होकेटला फिज दिली त्याच जबाबदार कोण? त्याला प्रस्थावित कोणी केलं. तुमच्या आस्थापना विभागावर काम नको त्या सचिन चवाथेवर आपण कारवाई करतो ज्याने ही सगळे एक्झसाईज महासभेचा वेळ, महासभेचा विषय, स्थायी समिती, ॲडव्होकेटचा खर्च त्या अधिकाऱ्यावर कारवाई नको. ज्याने आम्हाला बोगस पेपर दाखवले या सभागृहाला त्याची मान्यता करुन घेतली त्याच्यावर कारवाई नको. कुणीही त्याच्यावर कारवाई केली नाही आणि अशी एक चूक नाही आस्थापनाकडून साहेब हे वारंवार झालेल आहे आणि या अधिकाऱ्यावर पोलीस स्टेशनला गुन्हा दाखल झाला तरी महानगरपालिकेने कुठलीही दखल घेतली नाही. आपलं ज्याने हे प्रस्ताव आपल्याकडे शिफारस केलं त्याच्यावर गुन्हा दाखल केला याने खोटे कागदपत्र जमा केले म्हणून पण आपण काय केलं. आपल्याकडे कामावर आहे महापौर मॅडम एक नाही तुम्हाला उदाहरण सांगतो सचिन चवाथेचा विषय माहित आहे मला परत ते काय बोलायचे नाही. आपल्याकडे श्री. मणि जंबूलिंगम हा विषय आताचाच आहे याला आयुक्त साहेब याची ज्यावेळेस भरती केली त्यावेळी शासनाच धोरण होत की एखाद्या व्यक्तीने जन्मतारीख नाही दिली तर ५ वर्षाच्या आतमध्ये त्यांनी ती जन्मतारीख द्यावी नाहीतर त्या तारखेपासून त्याचा सेवेचा रेकॉर्डवर घ्यायचा आहे तो निवृत्त झाला निवृत्त होता होता या व्यक्तीने परत तुम्हाला शिफारस केली की याच्यावर अन्याय झाला आहे तुम्ही याला १० वर्षाची मुदतवाढ द्या आणि त्याला मुदतवाढ दिली गेली. मुदतवाढ दिल्यानंतर २ महिन्याचा पगार सुध्दा देऊन टाकलं त्यानंतर माहित पडलं की याने तक्रार केली प्रस्ताव तयार झाला. माझ्या माहितीप्रमाणे म्हसाळ साहेब तुमच्याकडे तो प्रस्ताव आहे. तर या व्यक्तीचा आपण २ महिन्याचा पगार परत घेऊन घेतला अशाप्रकारे दरवेळी हे आस्थापना हे पण परबच. तरी तुमच्याकडे सादर केलं आयुक्तांकडे शिफारस केली १० वर्ष त्याचा कार्यकाल वाढवून टाकला डायरेक्ट. तुम्ही त्याला केलं आणि परत काढलं की नाही. ते जाऊ द्या त्यानंतर परत आपल्याकडे आल्फ्रेड डिसोजा २९ तारखेला आयुक्त साहेब ज्यावेळी एखादा व्यक्ती माहितीचा अधिकार मागतो की आपल्याकडे किती पदे रिक्त आहेत. परब त्याला उत्तर देतात की आमच्याकडे आम्ही असेस



(वासुदेव शिरवळकर)
नगरसचिव
मिरा भाईंदर महानगरपालिका

मायनस २५ म्हणजे जास्तीची पदे आम्ही भरलेली आहेत. एक्झॅक्टली आफ्टर ३१ डेज परत आयुक्तांकडे शिफारस करतात आपल्याकडे २५ पदे रिक्त आहेत. म्हणून आल्फ्रेड डिसोजाला समाविष्ट करुन घेण्यात यावे. बरोबर आहे म्हसाळ साहेब आणि याला आपण समाविष्ट करुन घेतलं. हे ज्यावेळी परत तक्रार झाली परत आपण काय केलं याचा प्रस्ताव तयार केला याला बडतर्फ कमी करायचं त्याने काय केलं तो कोर्टात गेला त्याने स्टे आणला आता आपण परत वकीलाचा खर्च करायचा म्हणजे या परबने वारंवार चुका करायची महासभेला वेठीस धरायचं. आयुक्त साहेब याच्या व्यतिरिक्त सुध्दा आमच्याकडे काही पुरावे आहेत. पण किती आणावेत. आस्थापना विभागाचा त्यांनी वारंवार दुरुपयोग केला आहे. हे तीन मी तुम्हाला कागदासहीत दाखवलेले आहेत आणि त्यांच्यावर गुन्हा सुध्दा दाखल झालेत पोलीस स्टेशनला तरी आपल्या महानगरपालिकेडून कुठल्या प्रकारची कारवाई नाही आणि आम्ही का भोगावं. आता आपण सांगितल मागे घ्यायचं मग परत करायचं स्थायी समितीने निर्णय घ्यायचा उद्या काही झाले तर ते स्थायीचे सदस्य अडचणीत. आपल्याला एक विनंती आहे आयुक्त साहेब याची पूर्ण शहानिशा करावी आस्थापना विभागाची आणि हे सगळे कागद महानगरपालिकेने वारंवार लेखी दिलेले कागद म्हणजे एकदा आपण सांगतो जागा आहे. दुसऱ्यांदा सांगतो जागा नाही. एकदा सांगतो करता येईल दुसऱ्यांदा सांगतो करता येत नाही आणि सचिन चवाथेमध्ये काय घोळ आहे हे आपल्याला सगळ्यांना माहित आहे. सचिन चवाथेच आपण स्थायी समितीला अधिकार दिले होते. स्थायी समितीने त्यावर योग्य निर्णय घेतलेले आहे. तुम्हाला तरी वाटत असेल स्थायी तुम्हाला निर्णय देतील. तुम्हाला योग्य वाटेल तो निर्णय द्या ना आता त्याने तो निर्णय दिलेला आहे. पण ज्याने हे सगळ घडवलं लाखो रुपये इन लॅक्स ऑफ रुपीज वी आर पेड टू द हायकोर्ट. हायकोर्ट खालच्या कोर्टाला आता मी सांगितलं डिसोजा तोही कोर्टात गेला तो ही स्टे आता तुम्ही त्याच्या मागे लागा म्हणजे आता जे ध्रुवकिशोर पाटीलजीने सांगितल खरोखर जे वंचित आहे त्यांना तर न्याय मिळत नाही आणि अशा प्रकारच्या बॅक डोअर एन्ट्री होतात.

**प्रभात पाटील :-**

पूर्ण सभागृह तुमच्या पाठीशी आहोत. तुमच्या भावनेशी सहमत आहोत.

**नरेंद्र मेहता :-**

आणि दुसरं महत्वाच आयुक्त साहेब एक तुम्हाला सांगू हे फ्रॅन्कीच केलं कधी. महापौर मॅडम गंमतीची बाब काय आहे बघा परत ते आस्थापनावरुन हे सगळ नजरेत आल्यानंतर त्याची बदली केली गेली त्यांना ४ दिवसांसाठी सहा. आयुक्त आस्थापनात चार्ज दिले गेले. ते ४ दिवसामध्येच ते काम करुन निघून गेले म्हणजे फक्त ४ दिवसांसाठी त्यांना आस्थापनेवर पाठवल तरी ते एकाचं काम करुन निघून गेले. म्हणजे ४ दिवस सुध्दा थांबला नाही. मिरा भाईंदर महानगरपालिकेत विविध पदांची भरती करताना आस्थापना विभागात मोठ्या प्रमाणात अनियमितता झालेली आहे. याविषयाबाबत खालील सुचना मांडत आहे.

१) सचिन सुधाकर चवाथे भरतीच्या वेळी पात्र नव्हते सदर प्रकरणी अधिक माहिती घेतली असता परिक्षा नियंत्रक व सामान्य प्रशासन प्रमुख गोविंद परब यांनी निष्काळजीपणा केलेला आहे. त्यांनी सचिन चवाथे यांचा प्रथम व द्वीतीय अर्ज ते पात्र नसताना स्विकारला आहे. त्यापैकी नारी एकता उन्नतीचे प्रमाणपत्र जोडलेल्या अर्जामध्ये गुन्हा नोंद असल्याचे दिसून येत आहे. तसेच त्यांची दोन्ही प्रमाणपत्रे बोगस/खोटी व मान्यता प्राप्त विद्यापिठाची नसताना ती सत्य व खरे भासवून/सांगुन महानगरपालिकेची दिशाभुल केलेली आहे. सदर प्रकरणी विनोद शेवंते हे न्यायालयात गेले असता पटणा विद्यापिठाने सदर प्रमाणपत्र बोगस असल्याचे प्रतिज्ञापत्र कोर्टात दिल्यामुळे महानगरपालिकेची कोर्टात नाचक्की झालेली आहे. सदर प्रकरणी तत्कालीन आयुक्त श्री. विक्रम कुमार यांनी सचिन चवाथे यांना सेवेतून बडतर्फ करुन भाईंदर पोलिस स्टेशनमध्ये गोविंद परब व इतर अधिकारी यांच्यावर गुन्हे दाखल केलेले आहे. अशाप्रकारे केलेल्या दुसऱ्या एका भरती प्रकरणी भुषण दाडगीदास (एक्स-रे टेक्शीयन) व गोविंद परब यांच्यावर गुन्हे नोंद आहे.

२) तसेच मणीजंगु लिंगम सफाई कामगार यांची सेवा दि.३१/०१/२०१६ रोजी संपुष्टात आली होती व त्यांना त्या दिवशी निवृत्त करणे आवश्यक असताना देखील आस्थापना लिपिक दिपक जाधव, आस्थापना अधिक्षक नरेंद्र चव्हाण, मुख्यलिपिक अन्नपुर्णा आवडेकर व सहाय्यक आयुक्त (सा.प्र.) गोविंद परब यांनी आपल्या पदाचा गैरवापर करुन आर्थिक फायद्याकरीता त्याची सेवा १० वर्षे वाढवून सेवा पुस्तीकेतील जन्मतारखेत खाडाखोड केलेली आहे. महाराष्ट्र नागरी सेवाशर्ती नियम १९८१ कलम (३८) सुचनेनुसार शासकीय सेवेत प्रवेश केल्याच्या तारखेपासुन ५ वर्षाच्या कालावधीनंतर शासकीय कर्मचाऱ्याने आपल्या सेवा पुस्तकात किंवा सेवा पटलात नोंदलेल्या जन्म तारखेमध्ये फेरबदल करण्यासाठी दिलेल्या अर्जावर सामान्यतः विचार केला जावू नये अशाप्रकरणामध्ये उच्च न्यायालयाने डर्बन स्टॅंडर्ड कं. लि. विरुध्द रिन बधु ए.आय.आर.१९९५ मध्ये निर्णय दिलेला आहे असे असताना प्रशासनाची दिशाभुल केलेली आहे.

३) तसेच निल अल्फेड डिसोजा यांना अनुकंपातत्वावर लिपिक या पदावर भरती करताना सेवा नियमा प्रमाणे लिपिक या पदाची शैक्षणिक पात्रता व अर्हता, मराठी टायपिंग नसताना तसेच सेवा नियमानुसार १० टक्के अनुकंपा तत्वावर भरती करावयाची असताना शासन निर्णय दि.०६/१२/२०१० हा निर्णय महानगरपालिकेला लागु होत नसताना त्याच्या आधारे लिपिक पदी सरळ सेवेने मजुरी लिपिक पदास न घेता २८ पदे अतिरीक्त भरती केली व निल अल्फेड डिसोजा यांना अनुकंपा तत्वावर लिपिक या पदावर अतिरीक्त नियुक्त करण्यात आली. सदर प्रकरणात निल डिसोजा यांच्या विषयी विनोद शेवंते यांनी तक्रार करताच

सत्यप्रत



(सापुर्णे निरपळकर)
नगरसचिव
मिरा भाईंदर महानगरपालिका

मा. आयुक्त यांनी सदर व्यक्तीला पदावनत करण्याचा निर्णय घेतला होता. परंतु त्या निर्णयाला सदर व्यक्तीने कामागार न्यायालयात न्याय प्रविष्ट केलेले आहे.

अशाप्रकारची अनेक प्रकरणे आस्थापना विभागामध्ये व सहाय्यक आयुक्त (सा.प्र.) या पदावर गोविंद परब असताना संगनमताने केली असल्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे गोविंद परब यांना निलंबित करुन आजपर्यंत त्यांनी केलेल्या सेवा कालावधीमधील कामकाजाची विभागीय चौकशी करण्यात यावी मी ठराव मांडत आहे.

**अश्विन कासोदरिया :-**

माझे अनुमोदन आहे.

**आसिफ शेख :-**

सन्मा. महापौर मॅडम गोविंद परब यांच्यावर विशेष प्रेम आहे असा उल्लेख झालेला आहे. फार स्टडी केलेला आहे आमदार साहेबांनी स्टडी केला असेल निश्चित पण आम्ही कोणाला या ठिकाणी पाठीशी घालणार नाही. आस्थापना विभागामध्ये असे काही प्रकरण आहेत जे बेकायदेशीर ते बेकायदेशीर त्याला कोणी पाठीशी घालण्याचा प्रश्न येत नाही. त्याउपर देखील अनेक अशी प्रकरण आहेत की बेकायदेशीर नियुक्त्या झाल्या त्याची आपण तपासणी करण्यात यावी. आणि आमदार साहेब बोलले ते फक्त एका विभागापुरते बोलले तर आमच अस स्पष्ट मत आहे. सगळ्या विभागात आपल्याला असे प्रकार आढळून येतील तर आपण बारकाईने प्रत्येकाची व्यवस्थित स्टडी करावी. आम्ही अस म्हणत नाही फक्त आस्थापना मध्येच असा प्रकार चाललेला आहे. इतर सर्व विभाग परवानगी असतील टेंडर असतील काहीही असतील अन्य काही तर सगळ्या बाबतीत घोळातच घोळ चाललेला आहे. तर आयुक्त साहेब आपणाला आमची विनंती आहे की आपण प्रत्येक गोष्टीची शहानिशा करुनच निर्णय घेत चला. महासभेमध्ये समजा बहुमत आहे त्या बहुमताच्या जोरावर उद्या आम्हाला वाटलं की महानगरपालिका विकायची आहे तर आपण ते ताबडतोब करत नाही ना आधी शासनाला पाठवावे लागते. ठराव केला बहुमताच्या जोरावर महानगरपालिका विकायची आहे म्हणून तर बहुमताच्या जोरावर ठराव होत असतात. परंतु कायद्याच्या चौकटीत बसते की नाही हे तपासण्याचे काम शासनाने आपल्याला या ठिकाणी आयुक्त म्हणून पाठवले तर ती आपली जबाबदारी आहे. प्रत्येक गोष्ट शहानिशा करुन आपण या ठिकाणी निर्णय घ्यावा एवढीच आपल्याला विनंती आहे.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

महापौर मॅडम कही पे निगाहे कही पे निशाना विषय चवाथे साहेबांचा आहे आणि घसरला कुठे गोविंद परब वरती. साफसाफ चुकीच आहे मॅडम आपण नेहमी सांगतात आम्हाला विषयावरती बोला आणि विषयावरतीच ठराव झाला पाहिजे. विषय सचिन चवाथेचा आहे आणि ठराव गोविंद परबवर झाला त्याचा काय संबंध. प्रशासनाने हा विषय मागे घेतला आहे. विषयच मागे घेतला आहे तर ठराव होऊ शकत नाही.

**मा. महापौर :-**

मेरे को एक बात बताइए विषयपत्रिका में आने के बाद प्रशासन उसको वापस ले सकता है क्या हा या ना?

**ध्रुवकिशोर पाटील :-**

१०० टक्का उनको पता है की उनकी गलती हो गई तो लेना चाहिए।

**भगवती शर्मा :-**

इसके पहले कितने प्रस्ताव वापस गए।

**नगरसचिव :-**

सभागृह सर्वोच्च असते जे निर्णय घ्यायचे ते सभागृहाने घ्यायचे असतात विषय अजेंड्यावर आले तर सभागृहाला निर्णय घ्यायला लागतात.

**आसिफ शेख :-**

मा. महापौरांनी विषय घेतला आहे. विषयपत्रिकेवर विषय आहे जो विषय आला त्या विषय संबंधात ठराव झाला पाहिजे. विषया व्यतिरिक्त ठराव होता कामा नये.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

जब विषय ही वापस लिया है तो ठराव हो नही सकता।

**नरेंद्र मेहता :-**

मा. महापौर मॅडम, आम्ही जो ठराव मांडला आहे. विषय मागे घ्यायला विरोध केला नाही अजुन त्या विषयावर निर्णय दिला नाही आणि मा. आयुक्तांनी विषय मागे घेऊन नेमक त्यांना काय करायचे आहे. एखादा माणूस अस बोलतो आम्ही हा विषय बजेट नाही म्हणून मागे घेतो. इकडे कारण दाखवले नाही. स्थायी समितीने ते अधिकार प्रशासनाला दिला आम्ही हा निर्णय घेतलेला आहे. म्हणून आम्ही मागे घेतो. मा. महापौर मॅडम मी जे आक्षेप केले ते सचिन चवाथे ह्या करीताच केले आहेत. गोंविद परबवर पोलिस स्टेशनमध्ये गुन्हा आहे तो सचिन चवाथेसाठीच झाला आहे दुस-यासाठी झाला नाही. सचिन चवाथेला धरूनच तो ठराव मांडलेला आहे. स्थायी समितीने ते का अंगावर घ्याव. उद्या स्थायी समितीच्या आमच्या सदस्यांना काय झाले तर...

**सुहास रकवी :-**

मा. महापौर मॅडम आमदार साहेबांनी सांगितल्याप्रमाणे आमच्या स्थायी समिती समोर तो प्रस्ताव आलेला तो सुचक म्हणून मीच वाचलेला त्याच्यावर कोर्टाने निर्णय दिलेला आहे. सचिन चवाथेला बडतर्फ करण्याचा निर्णय झालेला आहे. त्यानुसार कोर्टाच्या निर्णयाच्या अधीन राहून संबधीत ठराव केलेला आहे. ह्या प्रकारे तो ठराव झाला त्यानंतर सर्व अधिकार प्रशासनाकडे सूपूर्द केल्यानंतर त्यांनी पून्हा तो विषय इकडे आणला आहे. आणि तो आणल्यानंतर मागे घेतला आहे. तो मागे घेण्यासाठी प्रॉपर असे कारण नाही आहे की तुम्ही कोणत्या कारणासाठी विषय मागे घेता. त्याचा तुम्ही खुलासा केला नाही. आमदार साहेबांनी सांगितल्याप्रमाणे त्याच्या संबधीत कोण कोण आहेत त्याच्यावर गुन्हे दाखल पण तो जो ठराव केला आहे. तो चुकीच्या पध्दतीने केला असे मला वाटते. मॅडम तुम्ही सुध्दा ह्याच्यावर अभ्यास करून मा. आयुक्तांनी देखील ह्याच्यात जे जे दोषी आहेत त्याच्यावर कारवाई केली पाहिजे. पण ते मा. आयुक्तांचे अधिकार आहेत आपण ठराव देऊन तसे होणार नाही. चवाथेचा बडतर्फीचा जो विषय आहे तो कोर्टा थ्रु झालेला आहे. त्याला मान्यता द्यावी अशी विनंती करतो.

**आसिफ शेख :-**

सन्मा. महापौर मॅडम सन्मा सदस्यांनी ठराव मांडलेला आहे. दूसरा ठराव आम्ही मांडतो. आम्हाला फक्त प्रशासनाकडून एकच खुलासा अपेक्षित आहे की, विधी विभाग वडके मॅडमनी अभिप्राय काय दिला आहे. सदर प्रकरणचा विधी विभागाचे अभिप्राय घेता विधी विभागाने मा. महासभेत घेण्यात आलेले प्रकरण मागे घेण्याचे कळविल्यानुसार महासभेत विषय घ्यायचा अधिकार मा. महापौराचा आहे. त्यात दुमत नाही. ह्याच्या उपर विधी विभाग म्हणते सदर प्रकरणात विधी विभाग अभिप्राय घेता विधी विभाग ने मा. महासभेत घेण्यात आलेले प्रकरण मागे घेण्याबाबत कळवले. मग हे कोणत्या नियमाप्रमाणे विधी विभागाला बोलवा आम्हाला हे कळू द्या ह्याच्यावर लिहीले आहे सदर प्रकरणावर विधी विभागाचे अभिप्राय घेता म्हणजे मा. महापौराच्या अधिकाराचा हनन करण्याचा विचार आहे का? एखादे प्रकरण पूढे चालवायचे की मागे घ्यायचे तो सभागृहाचा अधिकार आहे. सभागृहाचा अधिकार विधी विभागाला आहे का? आम्हाला खुलासा पाहिजे.

**विधी अधिकारी :-**

मा. महापौराच्या परवानगीने बोलतो, प्रशासनानी जो विषय दिलेला आहे. ता विषय इनफ्रक्चर झाल्यामुळे म्हणजे गोषवारा असा होता की स्टॅन्डिंग कमिटी आम्ही ४५ दिवसामध्ये गोषवारा देऊन सुध्दा निर्णय घेत नाही. म्हणून आम्ही हा विषय महासभेपूढे ठेवला होता. स्टॅन्डिग कमिटीने तो विषय ११ ऑगस्ट २०१६ घेतलेला आहे. हा जो विषय पटलावर विषय आहे तो निरर्थक ठरल्यामूळे प्रशासनानी तो ड्रॉप करण्यासाठी नगरसचिवांना विनंती केली आहे.

**आसिफ शेख :-**

तुमच्या मताशी सहमत आहे की निरर्थक ठरला. महासभेत एखादा प्रस्ताव असताना तुम्ही सांगितले ते बरोबर आहे. निरर्थक ठरला प्रशासनाने अगोदर नगरसचिवाकडे प्रस्ताव द्यायला पाहिजे नव्हता. हे तुमचे आपसात ह्याला पश्चात बुध्दी म्हणतात. महासभेचे अधिकार मा. महापौराना आहेत विषय पत्रिकेवर निर्णय घ्यायचा तो अधिकार तुम्हाला नाही. हा गोषवारा यायला पाहिजे नव्हता. ७८ नंबरचा गोषवारा पाठवण्यापूर्वीच त्यांना सांगायचे की मुदत संपत आहे आपण गोषवारा पाठवू नये आणि विषय घेऊ नये तर विषय आला नसता. सभागृहात विषय आल्यानंतर ही भारताच्या इतिहासात पहिली घटना असेल महापौरानी विषय पत्रिकेवरचा विषय घेतला सभागृहात चर्चा आहे आणि प्रशासन सांगते सदरचा विषय मागे घेण्यात यावा.

**भगवती शर्मा :-**

मा. महापौर मॅडम मैं विधी विभागसे पूछना चाहता हूँ की नये नियम के अनुसार इसमे दिया है महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम स्थायी समिती का कामकाज स्थीर स्थायी समिती का कामकाजाचे नियमन करण्यासंबधीत तरतूदी "क" मध्ये पूढीप्रमाणे नमूद आहे. जेथे आयुक्तांच्या कोणत्याही प्रस्तावाच्या अधिनियमाच्या तरतुदीन्वये घटीत करण्यात आलेला कोणत्याही समितीच्या मंजूरीची किंवा मान्यतेची आवश्यकता असेल याबाबतीत समिती नगरपालिका सचिव विभागाकडे जो प्रस्ताव प्राप्त झाल्यानंतर समितीचे लगत घेण्यात आलेल्या सभेच्या दिनांकापासून ४५ दिवसाच्या आत असा कोणताही प्रस्ताव विचारार्थ घेईल आणि तो प्रस्ताव निकालात काढील. मग अशा प्रस्तावाशी निगडीत बाब अशा सभेच्या कार्यसुचीवर घेतलेली असो किंवा नसो तसे न केल्यास अशा प्रस्तावाला समितीने मंजुरी किंवा मान्यता दिली असल्याची मान्यता मांडण्यात येईल असा प्रस्ताव आशयाच्या अहवाल आयुक्तांकडून पाठविण्यात येईल. ४५ दिन के बाद के अंदरमे नये नियम के अनुसार प्रस्ताव अगर स्थायी समिती नही लेती है या महासभा नही लेती है तो वो प्रस्ताव मंजूरी है ऐसा माना जाता है और वो मान कर के आयुक्त उस प्रस्ताव को राज्य शासन के पास मंजुरी के लिए भेजता है। यही नियम है मॅडम और इस प्रस्ताव के साथ में ऐसा ही हुआ है जब आपने स्थायी समिती के पास में भेजा तो ४५ दिन के अंदर में उन्होंने वे प्रस्ताव नही लिया। इसलिए इस प्रस्ताव को मान्यता जो प्रशासनने गोषवारा दिया उसको मान्यता मिली ऐसा मंजुर आयुक्त को समझ कर के इस नियम के तेहत राज्य सरकार के पास भी भेजना चाहिए की महासभा के पास भेजना चाहिए। देना चाहिए आपको राज्य शासन के पास में और आपने भेजा महासभा में। इसके लिए आप यह प्रस्ताव वापिस ले रहे है ना। विधी मॅडम आप बुक देख लिजीए वो क्लिअर कट आप उसी के कारण से वापस ले रहे है जो ४५ दिन के अदंर में वो मंजुर माना जाता है और वो नही किया बोल करके आपने इस प्रस्ताव को वापस लिया, इस



सत्यप्रत

(वासुदेव शिरवळकर)
नगरसचिव
मिरा भाईंदर महानगरपालिका

ॲक्ट के कारण से यह ॲक्च्युअल महासभा का विषय नही रह गया। यह विषय आयुक्त और राज्य सरकार के बीच का रह गया है।

**विधी अधिकारी :-**

सर स्थायी समितीचे कामकाज नियम ३ वाचायचे आहे तुम्हाला त्याच्यामध्ये के त्यामध्ये असं लिहीलेलं आहे अशा प्रस्तावाला समितीने मंजुरी किंवा मान्यता दिली असल्याचे मानण्यात येईल आणि तशा आशयाचा अहवाल आयुक्तांकडून महानगरपालिकेला पाठविण्यात येईल.

**भगवती शर्मा :-**

मतलब उसको मंजुरी मिला है यह अधिकार आयुक्त का है। ४५ दिन के अंदर में अगर स्थायी समिती नही लेती है या महासभा नही लेती है तो नियम इस के के अंदर में वो प्रस्ताव को आयुक्त को अधिकार दिया है कि वो मंजुर करके उसको महानगरपालिका के पास भेज दिया जाए। वह तो मंजुर विषय है ना यह खाली एक अवलोकन है।

**सुहास रकवी :-**

एक तो ऐसा है की इन्होंने जो विषय है वो रिटर्न लिया है। वो कौनसे कायदे के अनुसार हमारी एक मांग है उन्होंने कौनसे कायदे से वो विषय पिछे लिया है त्यानंतर ४५ दिवसांचे स्थायी समितीचे ३ क खाली अधिकार म्हणतात तर ३ क चा ४५ दिवसांचा मुदत गेल्यानंतर ११ ऑगस्ट २०१६ ला स्थायी समितीची मान्यता घेतली गेली. त्याच्यावर आमचा ठराव झालेला आहे. तो ठराव झाल्यानंतर सुध्दा विषय आलेला आता पुन्हा हा त्याने विषय मागे कसा घेतला.

**भगवती शर्मा :-**

विधी मॅडम इसमें स्पष्ट लिखा हुआ है कामकाज नियम के अंदर में ४५ दिन में अगर विषय नही लिया जाता है तो वो मंजूर समझा जाए। यह आयुक्त का अधिकार है। आयुक्त उसके बाद के अंदर में उसके उपर में कारवाई करता है। यह एक विषय के अंदर में अवलोकन कर लो एक जानकारी समझ लो यह विषय पे कोई ठराव नही होता है है क्योंकी ऑलरेडी इसको नियम के अनुसार ३ के के अनुसार आयुक्त को यह अधिकार दिया गया है की उसको उन्होंने मंजुर कर लिया। तो उनको मंजुर करने के बाद में इस महासभा को कोई राईट नही रह जाता ना की उस विषय के उपर में प्रस्ताव पे मंजुरी दे की असहमती जताए। अब इसके बाद में इसके आगे प्रोसेस है की आयुक्त उस प्रस्ताव को राज्य शासन के पास मंजुरी के लिए भेजते है। वो जी.आर. के अंदर में क्लिअर कट लिखा हुआ है तो यह विषय आपको वापस लेने का मुद्दा ही नही था। आपने वो विषय वापस ले करके वो जो लेटर लिखके वो गलती किया। यह विषय खाली महासभा को सूचनार्थ इस नियम के अनुसार इसमें कोई ठराव नही होता।

**विधी अधिकारी :-**

सर या संदर्भात अस झाल होत १०/८/१६ ला मा. तत्कालीन आयुक्तांनी हा विषय नगरसचिवांकडे दिला होता आणि लगेचच ११/८/२०१६ ला मा. स्थायी समितीने निर्णय घेतलेला आहे आणि त्यामुळे तो जो विषय आताचा आहे विषय क्र. ७८ तो निरर्थक ठरल्यामुळे इन्फ्रक्चर झाल्यामुळे आम्ही तो विषय ड्राप करण्यास विनंती आम्ही नगरसचिवांकडे केलेली आहे. निरर्थक ठरल्यामुळे म्हणजे याच्यामध्ये निर्णय काही अपेक्षित नाही. निर्णय ऑलरेडी स्टॅन्डिंग कमिटीने घेतलेला आहे. आणि ते आम्ही अवगत करत आहोत. स्टॅन्डिंग कमिटीने १८ ऑगस्टला निर्णय घेतलेला आहे.

**भगवती शर्मा :-**

यह विषय ऑलरेडी मंजुर हो चुका है। नियम ३ के के अनुसार इसमें देखिए वडके मॅडम लास्ट के पॅरेग्राफ में क्लिअरकट लिखा है महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम स्थायी समिती कामकाज ३ स्थायी समिती कामकाज नियमन करण्यासंबंधी तरतूदी के अनुसार सदर प्रस्ताव पर कारवाई करणेस ४५ दिवसांपेक्षा अधिक कालावधी झाल्याचे दिसून येत आहे त्यामुळे स्थायी समितीचे कामकाजाचे नियमन करण्यासंबंधीत तरतूद के नुसार श्री. सचिन चवाथे यांचा बडतर्फीच्या प्रस्तावाला समितीने मंजूरी किंवा मान्यता दिलेली असल्याच्या मान्यता येऊन श्री. सचिन चवाथे यांना बडतर्फ करण्यात येत आहे.

**नरेंद्र मेहता :-**

मा. महापौर मॅडम, खरं म्हणजे आपण वेगळ्याच विषयावर चाललो आहे. आयुक्त साहेब एखादा विषय आपण महासभेला एक कालमर्यादा ठरलेली आहे. स्थायी समितीला कालमर्यादा ठरलेली आहे. त्या कालमर्यादात निर्णय नाही झाला तर आपण ते अधिकाराचा वापर करुन निर्णय घेऊ शकतात. याचं मिनिंग असं नाही की तुम्ही त्यांच्याकडे जाऊच शकत नाही असं नाही. इट्स ऑपशनल. असे अनेक विषय आहेत आपण अनेकदा सभागृहात देतात पण आपल्याला वाटते सभागृहात गेले आपण ३ महिन्यापेक्षा जास्त होल्ड केलेला आहे. स्थायी समितीमध्ये ४५ पेक्षा जास्त केलेलं आहे. त्याच मिनिंग इललिगलीटी होत नाही. आयुक्तांनी ४५ दिवसांच्या अगोदर वापर केला तर इललिगलीटी ४५ दिवसानंतर आयुक्त महोदयांना वाटलं की महासभेपुढे द्यायचं तर त्याच्यात काही इललिगलिटी नाही. स्थायी समितीपुढे ४५ दिवसानंतर जरी गेला तरी दॅट इज नॉट इललिगल थिंग दे हॅव टेकन द डिसीजन तसं आहे कारण ते तुमच्याकडूनच गेलेले आहे. आयदर यू शूल्ड रिवोक इट आणि तो निर्णय घ्यायला पाहिजे होता पण नाही तुम्ही बोललात हे स्टॅन्डिंगने निर्णय घ्यावे मग ते इललिगल काही नाही. राहिला चवाथेचा विषय स्थायी समितीने निर्णय घेतलेला आहे. तुम्हाला वाटत असेल तो ठराव योग्य आहे. त्याची आरामात शहानिशा करुन चौकशी करा. तुम्हाला वाटतात



सत्यप्रत

(वासुदेव शिरवळकर)
नगरसचिव
मिरा भाईंदर महानगरपालिका

ते अधिकार नव्हते तुम्ही करायला पाहिजे होतं त्या पध्दतीने निर्णय घ्या. आम्ही ठराव मांडलेला आहे. हे सगळ आम्ही का भोगावं आणि या विषयाला मला ठराव सुध्दा मांडायची गरज नाही मी सूचना सुध्दा मांडू शकतो की, आयुक्त महोदय ज्यांनी हे सगळ केलं त्याला का शिक्षा नाही. त्यांनी हे जे केलं त्याला काही शिक्षाच नाही का? हे ठरावाच्या माध्यमाने सभागृहाची भावना व्यक्त करतो. हा कायद्यातला भाग आहे. ज्याने अशा प्रकारची चुक केली. आयुक्तांना अधिकार आहे वारंवार. ते निलंबित करायचं. म्हणून आम्ही हे मांडल. आपका जो भी विषय है कमिशनर साहब आराम से।

**भगवती शर्मा :-**

साहब आपको में नियम बता रहा हूँ। नियम के उपर में एक लाईन और जोडके उनको बता रहे हो की उसके बाद में भी आपको अधिकार है। वैसा अधिकार नही है उनको, इनको यह है की मंजुरी उसको मानी जाती है ऐसा एक प्रस्ताव किया जाता है।

**नरेंद्र मेहता :-**

आम्ही एक नाही तुम्हाला २५ विषय काढून दाखवणार जे कालमर्यादा गेल्यानंतर ते विषय महासभेने............

**भगवती शर्मा :-**

अभी वो आयुक्त साहब आए उनको नही मालुम है विधी विभाग सामने है, उपायुक्त है।

**नरेंद्र मेहता :-**

९० डेज महासभेला विषय दिले आणि ९० दिवस झाले तर १०० दिवशी महासभा निर्णय घेऊ शकत नाही आयुक्तांनी शिफारस केली तर का आयुक्तच करतील ते निर्णय? अस थोडी आहे. आयुक्तांना एखाद वाटलं की सभेपूढे निर्णय व्हावा. इट इज ९० डेज. मी सभागृह आहे इसलिए ९० डेज वापर रहा हूँ। सभागृहात ९० दिवसांचा आयुक्त मोकळे निर्णय घ्यायला. परंतु आयुक्तांना वाटले नाही. प्रशासनाला वाटले नाही सभागृहापुढे तर १२० दिवसाने घ्या ना काय फरक पडतो? असे अनेक विषय आहेत. विषय स्थायी समितीकडे देणं आणि ४५ दिवसात निर्णय घेणं याच्यात पण तफावत आहे. म्हणजे स्थायी समितीपुढे गेलं पाहिजे असं नाही की तुम्ही ठेवलं आहे आणि ४५ दिवसात दिलचं नाही. आणि बोलले ४५ दिवस म्हणजे ते झाल तसाही भाग नाही. तरी आम्ही काय सांगतो साहेब की आता भगवती शर्मा गृहित धरतो त्यांच म्हणणं बरोबर आहे. तरी आता आपण कुठलंही निर्णय वेगळ काही देत नाही ना आम्ही. तुम्ही त्या अँगलने शहानिशा त्याचं बरोबर असेल तर आपल्या अधिकाराचा वापर करुन तो निर्णय आपण घ्या. आपल्याला वाटते स्थायीने ठराव केला तो निर्णय आपण घ्या. आपल्याला वाटते स्थायीने ठराव केला तो बरोबर आहे तो निर्णय आपण घ्या.

**भगवती शर्मा :-**

आयुक्त साहब हमने जो आपको गोषवारा दिया है उसके अनुसार जो लिखा हुआ है "३ के" के अनुसार जो अधिकार आपको प्राप्त है हम उस अधिकार के तहत के अंदर में आपको कारवाई करने के लिए कह रहे है।

**नरेंद्र मेहता :-**

ठिक आहे आयुक्त साहेब तुमच्या अधिकारानुसार तुम्ही करावं.

**भगवती शर्मा :-**

उसी के अनुसार आप कारवाई करे यह हमारा ठराव।

**मा. महापौर :-**

ठिक है आयुक्त अपने अधिकार के हिसाब से करेंगे।

**भगवती शर्मा :-**

नही नही यह ठराव करेंगे लेकिन अब उन्होंने ठराव दे दिया वो ठराव वापिस करो उसके नुसार कारवाई करेंगे।

**नरेंद्र मेहता :-**

मैंने क्या बोला हमने ठराव किया है वो आयुक्त को नही लगे नही करे ना।

**भगवती शर्मा :-**

ऐसे थोडी होता है।

**मा. महापौर :-**

आप अपना ठराव लगा दिजीए ना।

**नरेंद्र मेहता :-**

भगवती शर्माजी कोई गैरसमज नही आम्ही त्या चवाथे किंवा स्थायी समिती किंवा आयुक्त यांचा कुठलाही त्या ठरावामध्ये उल्लेख केला नाही. तो ठराव बरोबर आहे बरोबर नाही आम्ही काही म्हटलचं नाही. दॅट ऑल रिमिडाइज ओपन विथ यू. यू कॅन टेक युअर डिसीजन. जे भगवती शर्माजी सांगतात ती सूचना त्या ठरावामध्ये काही हरकत नाही बिकॉज ही इज सेईंग गूड. सुचनेसहीत मंजूर.

**भगवती शर्मा :-**

आपकी भी सूचना हमारी भी सूचन, दोनो सूचना।

सत्यप्रत



(वासुदेव शिरवळकर)
नगरसचिव
मिरा भाईंदर महानगरपालिका

**प्रकरण क्र. ७८ :-**

तत्कालीन बडतर्फ करण्यात आलेले जनसंपर्क अधिकारी श्री. सचिन चवाथे यांचे प्रकरणाबाबत.

**ठराव क्र. ७६ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेत विविध पदांची भरती करताना आस्थापना विभागात मोठ्या प्रमाणात अनियमितता झालेली आहे. याविषयाबाबत खालील सुचना मांडत आहे.

१) सचिन सुधाकर चवाथे भरतीच्या वेळी पात्र नव्हते सदर प्रकरणी अधिक माहिती घेतली असता परिक्षा नियंत्रक व सामान्य प्रशासन प्रमुख गोविंद परब यांनी निष्काळजीपणा केलेला आहे. त्यांनी सचिन चवाथे यांचा प्रथम व द्वीतीय अर्ज ते पात्र नसताना स्विकारला आहे. त्यापैकी नारी एकता उन्नतीचे प्रमाणपत्र जोडलेल्या अर्जामध्ये गुन्हा नोंद असल्याचे दिसून येत आहे. तसेच त्यांची दोन्ही प्रमाणपत्रे बोगस/खोटी व मान्यता प्राप्त विद्यापिठाची नसताना ती सत्य व खरे भासवून/सांगुन महानगरपालिकेची दिशाभुल केलेली आहे. सदर प्रकरणी विनोद शेवंते हे न्यायालयात गेले असता पटणा विद्यापिठाने सदर प्रमाणपत्र बोगस असल्याचे प्रतिज्ञापत्र कोर्टात दिल्यामुळे महानगरपालिकेची कोर्टात नाचक्की झालेली आहे. सदर प्रकरणी तत्कालीन आयुक्त श्री. विक्रम कुमार यांनी सचिन चवाथे यांना सेवेतून बडतर्फ करुन भाईंदर पोलिस स्टेशनमध्ये गोविंद परब व इतर अधिकारी यांच्यावर गुन्हे दाखल केलेले आहे. अशाप्रकारे केलेल्या दुसऱ्या एका भरती प्रकरणी भुषण दाडगीदास (एक्स-रे टेक्शीयन) व गोविंद परब यांच्यावर गुन्हे नोंद आहे.

२) तसेच मणीजंगु लिंगम सफाई कामगार यांची सेवा दि.३१/०१/२०१६ रोजी संपुष्टात आली होती व त्यांना त्या दिवशी निवृत्त करणे आवश्यक असताना देखील आस्थापना लिपिक दिपक जाधव, आस्थापना अधिक्षक नरेंद्र चव्हाण, मुख्यलिपिक अन्नपुर्णा आवडेकर व सहाय्यक आयुक्त (सा.प्र.) गोविंद परब यांनी आपल्या पदाचा गैरवापर करुन आर्थिक फायद्याकरीता त्याची सेवा १० वर्षे वाढवून सेवा पुस्तीकेतील जन्मतारखेत खाडाखोड केलेली आहे. महाराष्ट्र नागरी सेवाशर्ती नियम १९८१ कलम (३८) सुचनेनुसार शासकीय सेवेत प्रवेश केल्याच्या तारखेपासुन ५ वर्षाच्या कालावधीनंतर शासकीय कर्मचाऱ्याने आपल्या सेवा पुस्तकात किंवा सेवा पटलात नोंदलेल्या जन्म तारखेमध्ये फेरबदल करण्यासाठी दिलेल्या अर्जावर सामान्यतः विचार केला जावू नये अशाप्रकरणामध्ये उच्च न्यायालयाने डर्बन स्टँडर्ड कं. लि. विरुध्द रिन बधु ए.आय.आर.१९९५ मध्ये निर्णय दिलेला आहे असे असताना प्रशासनाची दिशाभुल केलेली आहे.

३) तसेच निल अल्फेड डिसोजा यांना अनुकंपातत्वावर लिपिक या पदावर भरती करताना सेवा नियमा प्रमाणे लिपिक या पदाची शैक्षणिक पात्रता व अर्हता, मराठी टायपिंग नसताना तसेच सेवा नियमानुसार १० टक्के अनुकंपा तत्वावर भरती करावयाची असताना शासन निर्णय दि.०६/१२/२०१० हा निर्णय महानगरपालिकेला लागु होत नसताना त्याच्या आधारे लिपिक पदी सरळ सेवेने मजुरी लिपिक पदास न घेता २८ पदे अतिरीक्त भरती केली व निल अल्फेड डिसोजा यांना अनुकंपा तत्वावर लिपिक या पदावर अतिरीक्त नियुक्त करण्यात आली. सदर प्रकरणात निल डिसोजा यांच्या विषयी विनोद शेवंते यांनी तक्रार करताच मा. आयुक्त यांनी सदर व्यक्तीला पदावनत करण्याचा निर्णय घेतला होता. परंतु त्या निर्णयाला सदर व्यक्तीने कामागार न्यायालयात न्याय प्रविष्ट केलेले आहे.

अशाप्रकारची अनेक प्रकरणे आस्थापना विभागामध्ये व सहाय्यक आयुक्त (सा.प्र.) या पदावर गोविंद परब असताना संगनमताने केली असल्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे गोविंद परब यांना निलंबित करुन आजपर्यंत त्यांनी केलेल्या सेवा कालावधीमधील कामकाजाची विभागीय चौकशी करण्यात यावी मी ठराव मांडत आहे.

**सुचक :- श्री. नरेंद्र मेहता** **अनुमोदन :- श्री. अश्विन कासोदरीया**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ७९, भाईंदर (प.) येथील मॅक्सेस मॉल जवळील पोलीस स्टेशन समोरील चौकाचे वंदन चौक म्हणून नामकरण करणेबाबत.

**नरेंद्र मेहता :-**

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम अनुसुची 'ड' मधील प्रकरण अकरा (दोन) अन्वये रस्त्यांना नावे देण्याचा अधिकार मा. महासभेचा आहे. भाईंदर (प.) येथील मॅक्सेस मॉल जवळील पोलिस चौकी समोरील ४५.०० मीटर रुंद रस्त्यावरील चौकाचे नामकरण आजपर्यंत झालेले नाही. सदर चौकास "वंदन चौक" असे नामकरण करण्यास ही महासभा मंजूरी देत आहे.

**सुरेश खंडेलवाल :-**

माझे अनुमोदन आहे.

सत्यप्रत
(स्वाक्षरी)
(...)
नगरसचिव
मिरा भाईंदर महानगरपालिका

प्रकरण क्र. ९२८ मा. स्थायी समिती सभा
दि. १८/०३/२०२०

# मिरा भाईंदर महानगरपालिका

स्व इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग,
भाईंदर (प.), ता.जि. ठाणे, 401 101.
दुरध्वनी क्र. 28192828/28193087.

जा.क्र.मनपा/आस्था/1393 /2019-20

दि. 20/01/2020

प्रति,
महानगरपालिका सचिव,
मिरा भाईंदर महानगरपालिका.

मिरा भाईंदर महानगरपालिका
नगरसचिव विभाग
स.प./न.प./म.प.
आवक क्र. 960/2019-20
दिनांक:- 20/ 1 /2020

विषय :- बडतर्फ करण्यात आलेले तत्कालीन जनसंपर्क अधिकारी श्री. सचिन चवाथे यांना मा. उच्च न्यायालयात दाखल केलेल्या न्यायप्रविष्ठ प्रकरणात माहिती मिळणेबाबत.

संदर्भ :- 1. मा. उच्च न्यायालयाचा दि.15/11/2019 रोजीचे निर्णय.
2. जा.क्र.मनपा/विधी/465/2019-20, दि.30/11/2019 रोजीचे पत्र.

महोदय,

विषयांकित प्रकरणी मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या आस्थापनेवर जनसंपर्क अधिकारी या पदावर श्री. सचिन चवाथे यांची दि.24/01/2011 रोजी नियुक्ती करण्यात आली होती. परंतु त्यांनी नियुक्तीच्या वेळेस महानगरपालिकेस दिलेली शैक्षणिक पात्रतेचे प्रमाणपत्र खोटे आढळयावरून दि.02/08/2011 रोजी श्री. सचिन चवाथे यांना जनसंपर्क अधिकारी या पदावरून बडतर्फ करण्यात आले होते. सदर निर्णया विरूद्ध श्री. सचिन चवाथे यांनी मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे रिट याचिका क्र.7280/2011 दाखल केले असता दि.09/10/2013 रोजी श्री. सचिन चवाथे यांना महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमन चे कलम 56(4) अन्वये बडतर्फी आदेशाच्या विरूद्ध अपील दाखल करण्याचे मुभा देऊन सदरची रिट याचिका निकाली काढली होती. सदर आदेशानुसार श्री. सचिन चवाथे यांनी मा.स्थायी समिती यांच्याकडे कलम 56(4) अन्वये अपील दाखल केले असता दि.11/08/2016 रोजी मा. स्थायी समितीने ठाणे जिल्हा न्यायालयात प्रलंबित प्रकरणातील निर्णयाच्या अधीन राहून व न्यायालयाने दिलेल्या निर्णयानुसार प्रशासनाने नियम व कायदा तपासून श्री. सचिन चवाथे यांना जनसंपर्क अधिकारी या पदावर हजर करून घेण्यासाठी योग्य ती कार्यवाही करणेबाबत ठराव पारित केला आहे. सदर ठराव पारित करून देखीलही महानगरपालिका प्रशासन सदर ठरावाच्या अनुषंगाने कार्यवाही करत नसून व श्री. सचिन चवाथे यांना नियुक्तीचे आदेश देत नसल्यामुळे श्री. सचिन चवाथे यांना मा. उच्च न्यायालयात संदर्भिय याचिका दाखल केली आहे.

संदर्भिय याचिका दि.15/11/2019 रोजी मा. उच्च न्यायालय यांच्या समोर सुनावणीला आली असता मा. न्यायालयाने खालीलप्रमाणे आदेश पारित केले आहे. :-

1. दि.11/08/2016 रोजी स्थायी समिती-अपीलीय प्राधिकरण यांनी पारित केलेला ठराव रद्द करण्यात येत आहे आणि सदरचे प्रकरण स्थायी समितीकडे याचिकेदार यांच्या अपीलावर कायद्याच्या तरतूदीच्या अनुषंगाने पुन:श्च नव्याने निर्णय घेण्याकरिता वर्ग करण्यात येत आहे. सदरचा निर्णय हा स्थायी समितीने सदर आदेश पारित झाल्यापासून 3 महिन्याच्या आत घेण्यात यावा.

D:\आस्थापना विभाग\सचिन चवाथे\ऑल लेटर्स.doc

सत्यप्रत

(वासुदेव शिरवळकर)
नगरसचिव
मिरा भाईंदर महानगरपालिका

2. येथे स्पष्ट करण्यात येत आहे की, मा. न्यायालयाने रिट याचिकेमधील मेरीट्समध्ये न जाता याचिकेमधील दोन्ही पक्षकार यांचे मुद्दे व अधिकार खुले ठेवण्यात आलेले आहे. वरीलप्रमाणे निर्णय देऊन मा. उच्च न्यायालयाने सदरची याचिका निकाली काढलेली आहे.

तरी मा. उच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशानुसार याचिकादार यांच्या अपिलावर कायद्याच्या तरतूदीच्या अनुषंगाने पुन:श्च नव्याने निर्णय घेण्याकरिता वर्ग करण्यात येत आहे. सदरचा निर्णय हा स्थायी समितीने सदर आदेश पारित झाल्यापासून 3 महिन्याच्या आत घेण्यात यावा ही विनंती.

(मा.आयुक्त यांचे मान्यतेने)

(डॉ. सुनिल लहाने)
अतिरिक्त आयुक्त
मिरा भाईंदर महानगरपालिका

सत्यप्रत
(वासुदेव शिरवळकर)
नगरसचिव
मिरा भाईंदर महानगरपालिका

D:\आस्थापना विभाग\सचिन चवाये\ऑल लेटर्स.doc

निकाली प्र
७४१

U/C

४८/२०१९
H.C.

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## विधी विभाग

जा.क्र./मनपा/विधी/४६५/2019-20

दि.२० /११/२०१९

प्रति,

मा.सहा.आयुक्त,

आस्थापना विभाग,'

मिरा भाईंदर महानगरपालिका

विषय :- बडतर्फ करण्यात आलेले तत्कालीन जनसंपर्क अधिकारी श्री.सचिन चवाथे यांनी मा.उच्च न्यायालयात दाखल केलेल्या न्यायप्रविष्ठ प्रकरणात माहिती मिळणेबाबत.

संदर्भ :- 1) मा.स्थायी समिती सभा दि.11/08/2016 चे प्रकरण क्र.47,
2)मा. उच्च न्यायालय, मुंबई येथील रिट पिटीशन क्र.469/2019 श्री.सचिन सुधाकर चवाथे विरूध्द मिरा भाईंदर महानगरपालिका

महोदय,

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या आस्थापनेवर जनसंपर्क अधिकारी या पदावर श्री.सचिन चवाथे यांची दि.24/01/2011 रोजी नियुक्ती करण्यात आली होती. परंतु त्यांनी नियुक्तीच्या वेळेस महानगरपालिकेस दिलेली शैक्षणिक पात्रतेचे प्रमाणपत्र खोटे आढळ्यावरून दि.02/08/2011 रोजी श्री.सचिन चवाथे यांना जनसंपर्क अधिकारी या पदावरून बडतर्फ करण्यात आले होते. सदर निर्णयाविरूध्द श्री.सचिन चवाथे यांनी मा.उच्च न्यायालय, मुंबई येथे रिट याचिका क्र.7280/2011 दाखल केले असता दि.09/10/2013 रोजी श्री.सचिन चवाथे यांना महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे कलम 56(4) अन्वये बडतर्फी आदेशाच्या विरूध्द अपील दाखल करण्याचे मुभा देऊन सदरची रिट याचिका निकाली काढली होती. सदर आदेशानुसार श्री.सचिन चवाथे यांनी मा.स्थायी समिती यांच्याकडे कलम 56(4) अन्वये अपील दाखल केले असता दि.11/08/2016 रोजी मा.स्थायी समितीने ठाणे जिल्हा न्यायालयात प्रलंबित प्रकरणातील निर्णयाच्या अधीन राहून व न्यायालयाने दिलेल्या निर्णयानुसार प्रशासनाने नियम व कायदा तपासून श्री.सचिन चवाथे यांना जनसंपर्क अधिकारी या पदावर हजर करून घेण्यासाठी योग्य ती कार्यवाही करणेबाबत ठराव पारित केला आहे. सदर ठराव पारित करून देखीलही महानगरपालिका प्रशासन सदर ठरावाच्या अनुषंगाने कार्यवाही करत नसून व श्री.सचिन चवाथे यांना नियुक्तीचे आदेश देत नसल्यामुळे श्री.सचिन चवाथे यांनी मा.उच्च न्यायालयात संदर्भिय याचिका दाखल केली आहे.

संदर्भिय याचिका दि.15/11/2019 रोजी मा.उच्च न्यायालय यांच्या समोर सुनावणीला आली असता मा.न्यायालयाने खालीलप्रमाणे आदेश पारित केले आहे :-

Scanned by CamScanner

(७)

1) दि.11/08/2016 रोजी स्थायी समिती-अपीलीय प्राधिकरण यांनी पारित केलेला ठराव रद्द करण्यात येत आहे आणि सदरचे प्रकरण स्थायी समितीकडे याचिकेदार यांच्या अपीलावर कायद्याच्या तरतूदीच्या अनुषंगाने पुन:श्च नव्याने निर्णय घेण्याकरिता वर्ग करण्यात येत आहे. सदरचा निर्णय हा स्थायी समितीने सदर आदेश पारित झाल्यापासून 3 महिन्याच्या आत घेण्यात यावा.

2) येथे स्पष्ट करण्यात येत आहे की, मा. न्यायालयाने रिट याचिकेमधील मेरीट्समध्ये न जाता याचिकेमधील दोन्ही पक्षकार यांचे मुद्दे व अधिकार खुले ठेवण्यात आलेले आहे. वरीलप्रमाणे निर्णय देऊन मा.उच्च न्यायालयाने सदरची याचिका निकाली काढलेली आहे. तरी वरीलप्रमाणे मा.उच्च न्यायालयाने पारित केलेल्या निर्णयाची माहिती आपण मा.स्थायी समितीस देण्यात यावी ही विनंती.

Seenadke

विधी अधिकारी
मिरा भाईंदर महानगरपालिका

सोबत :- आदेशाची प्रत

सत्यप्रत
(वासुदेव शिरवळकर)
नगरसचिव
मिरा भाईंदर महानगरपालिका

2/12/19
1.00 PM
पोच
लिपीक (आस्थापना)
मिरा भाईंदर महानगरपालिका

Scanned by CamScanner

(८)

EXPERIMENT : No.

Page No.
Date

प्रेषक: सचिन सुधाकर चवाथे
मिरा- भाईंदर महानगरपालिका
दि० 2।12।2019

प्रति,

मा० आयुक्त सो.

मिरा- भाईंदर महानगरपालिका

विषय: मा० उच्च न्यायालयाच्या आदेशान्वये मा० स्थायी समिती मध्ये नव्याने निर्णय घेण्याबाबत.

संदर्भ: (WP NO- 469- 2019 दि० 15 November 2019

महोदय,

वरिल संदर्भिय विषयान्वये आपणास विनंती पुर्वक अर्ज करते कि मा० स्थायी समिती 11 ऑगस्ट 2016 अन्वये मला कामावर हजर करुन घेण्यास कोणतीही हरकत नसल्याचे म्हटले असुनही, मला कामावर हजर करुन घेतले नाही.

त्यामुळे नाईलाजास्तव मला मा० उच्चन्यायालयात धाव घ्या लागली. मा. उच्च न्यायालयाच्या आदेशान्वये पुन्हा स्थायी समिती ने निर्णय घेण्याचे आदेश प्राप्त झाले आहेत.

मा० उच्च न्यायालयाच्या निर्णयानुसार मा० स्थायी समिति कार्यवाही व्हावी हि विनंती

आपल्या सहकार्याची अपेक्षा!

आपला विश्वासू

सचिन चवाथे

सोबत: मा० उच्च न्यायालयाचे आदेश.

प्रत माहितीस्तव
मा० सचिव सो.
मिरा भाईंदर महानगरपालिका

सत्यप्रत
नगरसचिव
मिरा भाईंदर महानगरपालिका

Sundaram

Teacher's Sign. :

IN THE HIGH COURT OF JUDICATURE AT BOMBAY
CIVIL APPELLATE JURISDICTION
WRIT PETITION NO. 469 OF 2019

Shri Sachin Sudhakar Chawathe ......Petitioner
versus
Mira Bhayander Municipal Corporation and anr. .....Respondents

Mr. N. V. Bandiwadekar, advocate for the petitioner.
Mr. N. R. Bubna, advocate for respondent Nos.1 and 2.

CORAM : RANJIT MORE &
P. N. DESHMUKH, JJ.

DATE : 15th NOVEMBER, 2019.

P. C. :

Heard Mr. Bandiwadekar, learned counsel for the petitioner and Mr. Bubna, learned counsel for the Corporation.

2. In pursuance of advertisement dated 27th August, 2009, after conducting written examination and oral interview, the petitioner was appointed to the post of Public Relation Officer. The essential qualification for this post was (a) Degree in any branch from any recognized University and (b) Diploma in Journalism and Mass Communication. The petitioner filed two applications for seeking appointment. In one application, he relied upon Diploma in Journalism and Mass Communication from Patna University and in another application, he relied upon Diploma in Journalism and Mass



"Disclaimer Clause : Authenticated copy is not a Certified Copy"

Communication from Nari Ekta Unnati Mandal, Kalyan, Dist. Thane. The claim of the petitioner is that the same is Government recognized University.

3. When it was found that the diploma obtained from Patna University, on which, the petitioner relied was forged one, the services of the petitioner came to be terminated. The case of the petitioner, on the contrary, is that the Corporation gave him an appointment on the said post relying upon the Diploma in Journalism and Mass Communication Nari Ekta Unnati Mandal, Kalyan, Dist. Thane.

4. Initially, the petitioner approached this Court by filing petition No.7280 of 2011. Since the remedy of appeal was available to the petitioner under Section 56 (4) of the Maharashtra Municipal Corporation Act, 1949, this Court declined to entertain the petition. However, the Court granted liberty to the petitioner to avail appropriate remedy of appeal.

5. In pursuance of the above liberty, the petitioner filed an appeal before the Standing Committee of respondent No.1 – Corporation. The said appeal came to be disposed of by resolution dated 11th August, 2016.



"Disclaimer Clause : Authenticated copy is not a Certified Copy"

6. Mr. Bandiwadekar, learned counsel for the petitioner, contended that in view of the appellate order of the Standing Committee, it is obligatory on respondent Nos.1 and 2 to reinstate the petitioner and since they have not complied with the resolution, he has approached this Court seeking directions to respondents to implement the said resolution. Mr. Bubna, learned counsel for the respondents, on the contrary, disputed the contention of Mr. Bandiwadekar. Mr. Bubna submitted that the Standing Committee, by the said order, did not set-aside the termination order nor there is an order of reinstatement and, therefore, the petition is devoid of any merit. He also submitted that prosecution is also pending against the petitioner in Thane District Court regarding forged Diploma obtained by him from Patna University.

7. In the light of rival submissions, we have perused the appellate order viz. Resolution of Standing Committee dated 11th August, 2016. The resolution reveals that the Standing Committee has noted the facts of the present case and ultimately concluded that subject to the outcome of court case pending in Thane District Court as well as complying with the Rules and Regulations, it has no objection if the petitioner is allowed to resume the duties to the post of Public Relation Officer. Thus, in our considered view, the appellate order of the Standing Committee is very vague. The Standing Committee has not set-aside the termination order of the petitioner nor has it given direction to the Corporation to reinstate

सत्यप्रत



मिरा भाईंदर महानगरपालिका

"Disclaimer Clause : Authenticated copy is not a Certified Copy"

(90)
84850



the petitioner. The Standing Committee has merely opined that it has no objection to the petitioner resuming to the subject post subject to the outcome of the case pending in Thane District Court as well as complying with the rules and regulations.

8. The grievance of the petitioner is that, he cannot challenge this order inasmuch as his appeal was not dismissed and Corporation also disputes the contention of the petitioner that his appeal was allowed by the aforesaid order.

9. In the above circumstances, we are constrained to remand the matter to the Standing Committee to reconsider the petitioner's appeal afresh. We, accordingly, dispose of the petition by passing following order :

(1)The impugned resolution dated 11th August, 2016, passed by the Standing Committee-Appellate Authority of respondent No.1 is quashed and set-aside and the matter is remanded back to the Standing Committee to take fresh decision on the petitioner's appeal in accordance will law as expeditiously as possible and preferably within a period of three months from the date of receipt of this order.

सत्यप्रत



मिरा भाईंदर महानगरपालिका

"Disclaimer Clause : Authenticated copy is not a Certified Copy"

(99)

84851



(2)It is made clear that we have not gone into the merits of matter and all rights and contentions of the respective parties are kept open.

The writ petition stands disposed of.

[P. N. DESHMUKH, J.]

[RANJIT MORE, J.]

सत्यप्रत

(वासुदेव शिरवळकर)

मिरा भाईंदर महानगरपालिका

TRUE COPY

Section Officer
High Court, Appellate Side
Bombay 400 032



"Disclaimer Clause : Authenticated copy is not a Certified Copy"

# मिरा-भाईंदर महानगरपालिका

**मा. स्थायी समिती सभा दि.16/03/2020**

**प्रकरण क्र.128 :-** बडतर्फ करण्यात आलेले तत्कालीन जनसंपर्क अधिकारी श्री. सचिन चवाथे यांना मा. उच्च न्यायालयात दाखल केलेल्या न्यायप्रविष्ठ प्रकरणात माहिती मिळणेबाबत.

**ठराव क्र.902 :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या आस्थापनेवर जनसंपर्क अधिकारी या पदावर श्री. सचिन चवाथे यांची नियुक्ती करण्यात आली होती. परंतु नियुक्तीच्या वेळेस त्यांनी महापालिकेस सादर केलेले शैक्षणिक प्रमाणपत्र खोटे असल्याचे आढळल्यावरून श्री. सचिन चवाथे यांना बडतर्फ करण्यात आले होते. सदर बडतर्फीच्या निर्णयाविरोधात श्री. सचिन चवाथे यांनी मा. उच्च न्यायालयात, मुंबई येथे रिट याचिका दाखल केली असता श्री. सचिन चवाथे यांना महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 56(4) अन्वये बडतर्फीच्या आदेशाविरुध्द मा. स्थायी समितीकडे अपिल करण्याची मुभा असल्याने तिथे अपिल करावे असा निर्णय मा. उच्च न्यायालयाने देवून रिट याचिका निकाली काढण्यात आली होती. त्यानुसार श्री. सचिन चवाथे यांनी मा. स्थायी समितीकडे कलम 56(4) अन्वये अपिल दाखल केली असता मा. स्थायी समितीने ठाणे जिल्हा न्यायालयात प्रलंबित प्रकरणातील निर्णयाच्या अधीन राहून व न्यायालयाने दिलेल्या निर्णयानूसार प्रशासनाने नियम व कायदा तपासून श्री. सचिन चवाथे यांना जनसंपर्क अधिकारी या पदावर हजर करुन घेण्यासाठी ठराव पारित केला होता.

परंतु मा. स्थायी समिती मध्ये ठराव पारित करुनही महापालिका प्रशासनाने श्री. सचिन चवाथे यांना नियुक्त करुन घेतले नाही. त्यामुळे सचिन चवाथे यांनी पुन्हा मा. उच्च् न्यायालयात याचिका दाखल केली असता न्यायालयाने पुन्हा मा. स्थायी समितीकडे कायद्याच्या तरतुदीच्या अनुषंगाने पुन:श्च नव्याने निर्णय घेण्याकरीता वर्ग करण्यात आला व सदरचा निर्णय स्थायी समितीने आदेश पारित केल्यापासून 3 महिन्याच्या आंत निर्णय घेण्यास कळविले आहे.

तरी मा. उच्च् न्यायालयाने दिलेल्या आदेशानूसार महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 56(4) अन्वये प्रशासनाने श्री. सचिन चवाथे यांची जनसंपर्क अधिकारी या पदावर दि.02/08/2011 पासून पुर्न:स्थापित करण्यात यावे व त्यांची सेवा नियुक्ती दिनांकापासून सलग धरण्यात यावी व नियमानूसार पुर्न:स्थापित दिनांकापासून वेतन व इतर अनुषंगिक लाभ देण्यात यावे असा मी ठराव मांडत आहे.

सुचक :- श्री. ध्रुवकिशोर पाटील

अनुमोदन :- अशोक तिवारी (rahul shah) श्री. राकेश शाह

**सभापती,**
**स्थायी समिती सभापती,**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**